फेब्रुवारी २०१६ / पाने ६० / किंमत ₹ १०

# लोकराज्य



## मेक इन इंडिया वीक

१३-१८ फेब्रुवारी, मुंबई

मेक इन महाराष्ट्र

# पर्व नवे संपन्नतेचे



# प्रजासत्ताक दिन चिरायू होवो...



शिवाजी पार्क येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त सशस्त्रदलाचे निरीक्षण करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव.



शिवाजी पार्क येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त उपस्थित सैन्याधिकारी व मान्यवरांना शुभेच्छा देताना
मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय.

वर्ष ६७ वे | अंक ८ | फेब्रुवारी २०१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर–म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — सुधाकर गायकवाड

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण – ०२२–२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग

### उद्योगात आघाडी, गुंतवणुकीत नंबर वन

देशविदेशातील विविध उद्योग समूहांना राज्यातील उद्योगांची ओळख व्हावी, यासाठी मुंबई येथील बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स येथे दि.१३ ते १८ फेब्रुवारी २०१६ दरम्यान 'मेक इन इंडिया' सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य सरकारने गेल्या वर्षभरात घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे उद्योगवाढीत आणि गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र क्रमांक एकचे राज्य बनले आहे. ६



### मुख्यमंत्र्यांची वॉर रूम

प्रशासनातील महत्त्वाच्या समस्या तत्काळ सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वॉर रूम स्थापन केली आहे. त्यामुळे अनेक महत्त्वाचे निर्णय वेगाने होत आहेत. १०

### ... रायगडाला जेव्हा जाग येते



रायगड येथे आयोजित महोत्सवामुळे प्रतिशिवसृष्टी साकार झाली. त्याचा विशेष वृत्तांत... २४

### नियम पाळा, संकट टाळा

वाहतूक सुरक्षिततेचे नियम न पाळणारे स्वत:बरोबर इतरांनाही संकटात टाकतात. अशा वेळी आपण वाहतुकीचे नियम पाळले तर जीवित हानी टाळता येते. सांगताहेत **परिवहन मंत्री दिवाकर रावते...** २८



सप्तपदी स्वच्छतेची

देवळाली, कागल आणि पन्हाळा शहरांमध्ये झालेल्या उत्कृष्ट स्वच्छता अभियानाच्या यशकथा. ३०



### सामर्थ्य मराठीचे...

कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी २७ फेब्रुवारी रोजी दरवर्षी मराठी भाषा संवर्धन दिन साजरा केला जातो. यानिमित्त मराठी भाषा विभागाने गेल्या वर्षभरात भाषा संवर्धनासाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा... ३६

### संधी शिक्षणाची, संधी उन्नतीची

आदिवासी विकास विभागांतर्गत शिक्षणासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजना ३८

### याशिवाय

प्रेरणा
भ्रमंती
दिल्लीतील महाराष्ट्र
आपले सरकार
सीएम ट्विटर

### वैविध्यपूर्ण

नवीन वर्षाचा जानेवारी २०१६ चा अंक आवडला. स्वच्छ, सुंदर, समृद्ध, स्मार्ट आणि सुरक्षित महाराष्ट्रासाठी राज्य शासन घेत असलेले ठोस निर्णय व त्याची अंमलबजावणी याचा सविस्तर वृत्तांत लोकराज्यमध्ये वाचायला मिळाला. मंत्रिमहोदयांचे संकल्पही आवडले.


**– विनय निकम, नवी मुंबई**




### आनंददायी

लोकराज्यचा डिसेंबर २०१५ चा अंक वाचून आनंद झाला. महामानवाचे विश्वस्मारक, सिंहावलोकन २०१५ आणि इच्छाशक्तीला प्रयत्नांचे बळ व इतर लेख खूप वाचनीय आहेत.

**– मधुकर जोशी,**
**सातारा (खुर्द) जि. नांदेड**




### संग्राह्य

शासन व जनता यातील दुवा म्हणजे लोकराज्य. शासनाच्या महत्त्वाच्या उपक्रमांना सामान्य जनतेपर्यंत त्वरित पोहोचवण्याचे काम लोकराज्य करीत आहे. लोकराज्यचे अभिनंदन...

**– तुकाराम ठोंबरे, रामनगर, जालना**

### अष्टपैलू


लोकराज्य सर्वस्तरांत लोकप्रिय आहे. लोकराज्यमधून प्रसिद्ध होणारे लेख यूपीएससी, एमपीएससी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खूपच लाभदायी ठरतात. त्याचबरोबर विविध पर्यटनस्थळांची माहिती मिळते. संस्कृती सदरामधून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडते.

**– सुहास पाडवी**

### दर्जेदार

लोकराज्यचा डिसेंबर २०१५ हा अंक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सार्वजनिक जीवनाबद्दल माहिती देणारा होता. याशिवाय या अंकात सोलापूर आणि नागपूर जिल्ह्यातील उपक्रमांचा सहभाग तसेच विविध मंत्री कार्यालयांचा वार्षिक आढावा जनतेप्रती बांधिलकी व्यक्त करणारा होता. दर्जेदार आणि माहितीपूर्ण साहित्यकृतीसाठी संपादकांचे अभिनंदन.


**– ए. बी. धुळाज, उपायुक्त, नागपूर**




### हक्काचे व्यासपीठ

लोकराज्यमधील शासकीय योजनांसंदर्भातील सर्व माहिती अतिशय मौलिक, वैचारिक, अभ्यासपूर्ण असते. त्याचप्रमाणे विविध योजनांची माहिती या मासिकातून नागरिकांना मिळते. सामान्य नागरिकांच्या समस्या व तक्रारींना न्याय मिळण्यासाठी आपले सरकार हे हक्काचे व्यासपीठ आहे.

**– जालिंदर रिठे,**
**चिखलठाणा, औरंगाबाद**




### ज्ञानात भर

मंत्रिमंडळाचे निर्णय, उपक्रम व कामकाजाची माहिती लोकराज्यच्या अंकातून मिळते. हा अंक वाचनाचा आनंद व ज्ञानात भर घालणारा आहे. हे उपयुक्त मासिक घरोघरी असावे. ऑक्टोबर २०१५ चा अंक अधिक आवडला. यातील स्वच्छता अभियानाविषयीची सखोल माहिती आवडली. स्मार्ट शहराविषयीची माहिती, संस्कृती या सदरातील माहेरचा गोडवा 'भोंडला' मला भावले. कोकणातील लोकनृत्य नमन, जाखडी, भजन, कोळीनृत्य, भारुड याविषयी माहिती द्यावी.

**– वाय. पी. गुरव, खोरनिनको, ता.लांजा, जि. रत्नागिरी**

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

---

### वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# अग्रेसर महाराष्ट्र

या महिन्यात मुंबईमध्ये 'मेक इन इंडिया' सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी देशात औद्योगिक आणि गुंतवणूक वाढीसाठी 'मेक इन इंडिया' या अभियानाच्या मार्फत प्रभावी प्रयत्न चालवले आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी 'मेक इन महाराष्ट्र' या उपक्रमाद्वारे चालना दिली आहे. 'मेक इन इंडिया वीक' या देशपातळीवरील प्रतिष्ठेच्या कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी महाराष्ट्रावर सोपवून, भारत सरकारने 'मेक इन इंडिया' उपक्रमात आपले राज्य बजावत असलेल्या अत्यंत महत्त्वाच्या कामगिरीवर मोहर उमटवली आहे. 'मेक इन महाराष्ट्र' या उपक्रमांतर्गत गेल्या वर्षभरात महाराष्ट्रात गुंतवणुकीचे अनेक प्रकल्प आले आहेत. देशविदेशातील मोठ्या कंपन्यांकडून होणाऱ्या १ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून ५० हजारांहून अधिक रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी राज्यात निर्माण होणे अपेक्षित आहे. 'मेक इन महाराष्ट्र' उपक्रमावर आधारित विशेष लेख या अंकात आम्ही समाविष्ट केला आहे.

'आपले सरकार' वेबपोर्टल सेवेचा विस्तार २६ जानेवारीपासून सर्व जिल्ह्यांसाठी करण्यात आला आहे. लोकाभिमुख व पारदर्शक प्रशासनासाठी टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. या संदर्भातील विशेष लेख या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे.

वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने, सार्वजनिक उद्योगांच्या सामाजिक जबाबदारीबाबत एका विशेष उपक्रमाचे आयोजन राजभवनात करण्यात आले होते. याविषयीचा विशेष वृत्तांत आम्ही या अंकात समाविष्ट केला आहे. सांस्कृतिक मंत्री श्री. विनोद तावडे यांच्या नेतृत्वाखाली रायगडावर भव्य महोत्सवाचे आयोजन नुकतेच करण्यात आले. या महोत्सवाद्वारे प्रतिशिवशृष्टी उभारण्यात आली. रायगडास पुन्हा जाग आल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या अभिनव अभियानावर आधारित वृत्तांत आम्ही या अंकात घेतला आहे.

राज्यात आता स्वच्छ महाराष्ट्र अभियानाने गती घेतली आहे. या अंकातील कागल, पन्हाळा आणि देवळाली नगरपरिषदांनी स्वच्छता तसेच हागणदारीमुक्तीसाठी केलेल्या प्रयत्नांवर आधारित यशकथा; इतर नगरपरिषदांसाठी प्रेरणादायी ठरतील, अशी खात्री वाटते.

मराठी भाषा दिवसानिमित्त विशेष लेख या अंकात सामील केला असून शासनाने मराठी भाषेच्या विकासाठी घेतलेल्या विविध निर्णयांचा त्यात ऊहापोह करण्यात आला आहे.

गेल्या महिन्यात ८९ व्या पिंपरी-चिंचवड येथील मराठी साहित्य संमेलनासोबतच नांदेड-माळेगाव यात्रा, दिल्ली हाट, रायगड महोत्सव, सरस महालक्ष्मी, मंत्रालय मुंबई या ठिकाणी लोकराज्यचे विशेष स्टॉल उभारण्यात आले होते. त्यास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. यावरून लोकराज्यची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येते. जय महाराष्ट्र, दिलखुलास आणि महान्यूज या आमच्या इतर माध्यमांनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

हा अंक आमच्या वाचकांना आवडेल, अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**

# उद्योगात आघाडी, गुंतवणुकीत

**देशविदेशातील विविध उद्योग समूहांना राज्यातील उद्योगांची ओळख व्हावी, यासाठी मुंबई येथील बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथे दि. १३ ते १८ फेब्रुवारी २०१६ दरम्यान ‘मेक इन इंडिया’ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य सरकारने गेल्या वर्षभरात घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे महाराष्ट्र उद्योग वाढीत आणि गुंतवणूकीमध्ये क्रमांक एकचे राज्य बनले आहे.**

**प्रसाद इनामदार**

देशाच्या विकासाचे इंजिन महाराष्ट्र आहे आणि त्याला गती द्यायची असल्यास उद्योगावाढीला प्रोत्साहन देण्याची गरज ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘मेक इन इंडिया’ ची घोषणा केली. त्या दिशेने आवश्यक ती सर्व पावले उचलली. त्याचे दृश्य परिणाम आता दिसत आहेत. महाराष्ट्र, गुजरात आणि ओडिसापेक्षा विदेशी गुंतवणूक आणि स्थानिक गुंतवणुकीत पुढे गेला आहे. महाराष्ट्र हे क्रमांक एकचे राज्य बनले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची सूत्रे स्वीकारल्यापासून राज्यात गुंतवणूक वाढावी आणि रोजगारनिर्मिती व्हावी, यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम हाती घेतला. उद्योगांना लागणाऱ्या परवानग्या आणि अटी कमीत कमी केल्या. कामगार नियमांत सुधारणा करून ते उद्योग आणि कामगारांच्या हिताचे होण्याकडे लक्ष दिले. त्याचे परिणामही दिसू लागले. गेल्या वर्षभरात अनेक उद्योगांशी झालेले करार आणि त्यातून झालेली गुंतवणूक यामुळे महाराष्ट्र हा उद्योगांसाठी आणि उद्योगवाढीसाठी क्रमांक एकचेच राज्य असल्याचे पुन्हा अधोरेखित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची सूत्रे हाती घेण्यापूर्वी राज्यातील उद्योग विश्वात प्रचंड नाराजी होती. लालफितीच्या कारभारामुळे अनेक उद्योगांनी गुजरातसारख्या राज्यात स्थलांतर वा विस्ताराची योजना आखली होती. एका बाजूला सलग दुष्काळाची झळ आणि दुसऱ्या बाजूला उद्योगांची खुंटलेली वाढ यामुळे रोजगाराच्या संधी कमी निर्माण होत होत्या. देशाच्या विकासाचे ‘ग्रोथ इंजिन’ असलेल्या महाराष्ट्राची स्थिती अशी असल्याने त्याचा एकूणच सकल उत्पादन दरावर (जीडीपी) परिणाम झाला होता. त्यामुळे देशाचा सकल उत्पादन दर ८ किंवा ९ च्या आसपास ठेवायचा झाल्यास त्यात महाराष्ट्राच्या विकासदराने भरीव भर घालणे आवश्यक होते. त्यामुळे आजार काय आहे हे ओळखून त्यावर उपाय करण्यास श्री. फडणवीस यांनी सुरुवात केली. उद्योगांना अनेक जाचक अटींमधून जावे लागत होते, अनेक अनावश्यक आणि कालबाह्य परवानग्या घ्याव्या लागत होत्या, त्यांची संख्या कमी करणे महत्त्वाचे होते. श्री. फडणवीस यांनी तातडीने पावले उचलून ७६ परवानग्यांची संख्या ३७ वर आणली. विविध प्रकल्पांच्या मान्यतेमध्ये असलेल्या अडचणी दूर करण्यात आल्या. गेल्या वर्षभरात ३४ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली तर लघु उद्योगांसाठी असलेल्या अधिनियम १९४८ मध्ये महत्त्वपूर्ण बदल केल्यामुळे १४ हजार ३०० कारखान्यांना इन्स्पेक्टर राजमधून मुक्ती मिळणार आहे.

कारखान्यांची व्याख्या करताना विजेवर चालणाऱ्या आणि विजेशिवाय चालणाऱ्या कारखान्यात कामगारांची संख्या अनुक्रमे १० व २० वरून ३० आणि ४० अशी करण्यात आली.

राज्यात पायाभूत सुविधा वाढीवर भर देताना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी विविध निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या पहिल्या दाव्होस दौऱ्यातही त्यांनी महाराष्ट्राची बलस्थाने जागतिक व्यासपीठावरून विशद केली. या वेळी त्यांनी जनरल इलेक्ट्रिक, नेस्ले, पेप्सिको, लॉरियल, इस्पात, जिट्रो, मित्सुई, नोवार्टिस, सॅक्रन, कॉम्मीझेर, यांसारख्या उद्योगांच्या प्रमुखांशी वा प्रतिनिधींशी चर्चा केली. महाराष्ट्र कसा उद्योगस्नेही आहे हे पटवून दिले. त्याचे दृश्य परिणाम दिसू लागले असून महाराष्ट्रात रुपये ६० हजार कोटींहून अधिक गुंतवणूक झाली असून गुंतवणुकीचा वेग वाढत आहे. दाव्होसनंतर मुख्यमंत्र्यांनी चीन, जर्मनी, अमेरिका, इस्त्रायल यांसारख्या देशांना भेटी देऊन उद्योजकांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास त्यांनी उद्युक्त केले.






**‘मेक इन इंडिया’ वीक, मुंबई**

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ‘मेक इन इंडिया’ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला जगभरातील उद्योजकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. जगभरातील कंपन्यांना देशात निर्मिती क्षेत्रातील संधी, येथे निर्माण होणाऱ्या नाविन्यपूर्ण उत्पादनांची तसेच गुंतवणूकस्नेही राष्ट्राची ओळख व्हावी म्हणून ‘मेक इन इंडिया वीक’चे १३-१८ फेब्रुवारी २०१६ दरम्यान मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात नाविन्यपूर्ण कल्पनांची देवाणघेवाण, औद्योगिक भरारीमध्ये व्यावसायिक क्षेत्र व नागरिकांचा सहभाग, एशिया बिझिनेस फोरम अंतर्गत आर्थिक आव्हानांवर चर्चासत्रे, ‘मेक इन इंडिया’ पुरस्कार सोहळा, भारतीय कलाकुसर, तंत्रज्ञान आणि संस्कृतीचे प्रदर्शन आदींची रेलचेल असेल. हा सप्ताह मुंबईत होणे म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ‘मेक इन महाराष्ट्र’ या उपक्रमाच्या यशस्वीतेवर केंद्र सरकारने केलेले शिक्कामोर्तबच आहे.**

# नंबर वन

### महाराष्ट्र गुजरातपेक्षा पुढे

गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रापुढे असणाऱ्या गुजरातला मागे टाकत महाराष्ट्राने विदेशी आणि स्थानिक गुंतवणुकीत आघाडी घेतली आहे. 'असोचॅम' अर्थात असोसिएट चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री ऑफ इंडिया (Assocham) ने यावर शिक्कामार्तब केले आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि ओडिसा या तीन राज्यांनी गुंतवणुकीत आघाडी घेतली आहे. या तीनही राज्यात मिळून गेल्या पाच वर्षात देशातील २६.६ टक्के गुंतवणूक झाली आहे. २००९ च्या तुलनेत १०५ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत गेल्या पाच वर्षात देशातील २१ राज्यात १५४ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून त्यात महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक १० टक्के आहे. महाराष्ट्रात १५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून २०१४ पासून गुंतवणुकीचा वेग आणखी वाढला आहे. त्यामुळे महाराष्ट्राने आपण आघाडीवर असल्याचे निर्विवादपणे सिद्ध केले आहे.

### परदेशी दौऱ्याचा फायदा

उद्योग क्षेत्रातील मरगळ दूर व्हावी, आणि गुंतवणूक आणि पर्यायाने रोजगार संधीत वाढ व्हावी, यासाठी मुख्यमंत्र्यांनी आपल्या परदेश दौऱ्यात उद्योगपतींना राज्यात गुंतवणूक करण्यासाठी उद्युक्त केले. 'बॉश' सारख्या कंपनीशी करार करून महाराष्ट्रातील आयटीआयमध्ये तरुणांना प्रशिक्षित करण्यासाठी सहकार्य मिळवले. यामुळे एका बाजूला गुंतवणूक वाढीकडे लक्ष आणि दुसऱ्या बाजूला त्याचा फायदा राज्यातील सर्वसामान्य तरुणांना व्हावा याकडे लक्ष दिले आहे. परदेश दौऱ्यातील अनेक करारांमुळे राज्यात गुंतवणूकपूरक वातावरण निर्माण झाल्याने होणार आहे. त्याचा फायदा स्थानिकांना रोजगारांच्या प्रत्यक्ष संधी निर्माण होऊन होणार आहेच, त्याशिवाय या मोठ्या प्रकल्पांमुळे येथील तरुणांना या प्रकल्पासाठी लागणाऱ्या छोट्या साधनांची निर्मिती करता येणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीत वाढ होणार आहे.

### पायाभूत सुविधांवर भर

राज्यात उद्योगवाढीसाठी पायाभूत सुविधांची आवश्यकता ओळखून श्री. फडणवीस यांनी रस्ते आणि रेल्वेचे जाळे विस्तारण्यास प्राधान्यक्रम दिला आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास जयगड ते डिगणी हा रेल्वेमार्ग येत्या एप्रिलपासून सुरू होत आहे. यामुळे जयगड बंदर कोकण रेल्वेशी जोडले जाईल. बंदरे, रस्ते आणि रेल्वे जाळ्याने जोडल्यास कच्च्या आणि पक्क्या मालाची वाहतूक सोपी आणि सहज होण्यास मदत होणार आहे. याबरोबर मुंबई, नागपूर हा द्रुतगती मार्ग वेगाने करण्यावर या सरकारने भर दिला आहे.




**अमेरिका दौऱ्यावर असताना महाराष्ट्र ट्रेड डेव्हलपमेंट कॉन्फरन्समध्ये अमेरिका व भारतीय नागरिकांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**



वाहन उत्पादनात आघाडीवर असलेल्या जनरल मोटर्स कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उद्योगमंत्री सुभाष देसाई.

**'इज ऑफ डुईंग बिझिनेस' ही संकल्पना राबवून 'मेक इन महाराष्ट्र'ची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. त्याचे दृश्य परिणाम दिसत असून जनरल मोटर्ससारख्या कंपनीने महाराष्ट्रात ६ हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. फॉक्सकॉन या कंपनीने येत्या पाच वर्षात सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. यासारख्या उद्योगांना महाराष्ट्र हे योग्य ठिकाण वाटते हेच 'इज ऑफ डुईंग बिझिनेस' चे फलित आहे. या कंपन्यांच्या विस्तारामुळे आणि गुंतवणुकीमुळे रोजगारांच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत.**



अमेरिका दौऱ्यावर असताना न्यू जर्सीचे गव्हर्नर क्रिस क्रिस्टी यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उद्योगमंत्री सुभाष देसाई. या दौऱ्यादरम्यान ब्लॅकस्टोन, सिस्को, कोकाकोला यासारख्या आघाडीच्या उद्योगसमूहांसोबत महत्त्वाचे सामंजस्य करार झाले.

## जमीन संपादनातील अडथळे दूर

उद्योगांना जमिनीची आवश्यकता असते. त्याचवेळी पिकाऊ जमीन ही शेतीसाठीच वापरली जावी या उद्देशाने सरकारने जमीनविषयक स्वतंत्र धोरण आखले आहे. यानुसार बिनशेती वापरातील आरक्षित जमिनीकरिता बिनशेती परवानगी देण्याच्या कार्यपद्धतीत सुलभीकरण करण्यात आले आहे. डिसेंबर २०१४ मध्येच विकास योजनेत समाविष्ट असलेल्या व बिनशेतीसाठी आरक्षित असलेल्या जमिनीसाठी बिनशेती वापरासाठी परवानगीची आवश्यकता नाही. त्यामुळे विकास प्रकल्पांना जमीन मिळणे सहज शक्य होणार आहे.

## कामगारांच्या हिताकडे लक्ष

'मेक इन महाराष्ट्र'ची संकल्पना यशस्वीरीत्या राबवतानाच कामगारांच्या हिताकडे राज्य शासनाने लक्ष दिले आहे. त्याचबरोबर उत्पादित वस्तूंच्या गुणवत्तेवरही लक्ष ठेवण्यात येणार आहे. त्यासाठी कारखान्यांची तपासणी नियमितपणे केली जाणार आहे. उद्योगवाढीच्या वेगात कामगारांचे हित आणि गुणवत्तेकडे दुर्लक्ष होणार नाही, याकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. कारखान्यांच्या तपासणीसाठी कामगारांच्या संख्येनुसार वर्गवारी करून स्वैर पद्धतीने तपासणी करण्याचे नियोजन आहे. कामगार कायद्याच्या अंमलबजावणीवर लक्ष देताना त्यात प्रामुख्याने किमान वेतन अधिनियमाची अंमलबजावणी, कामगारांच्या तक्रारींचे निराकरण, कामगार संघटनांच्या तक्रारींचे नियोजन,

न्यायालयीन प्रकरणे, बाल कामगार आणि तत्सम बाबींची तपासणी केली जाईल.

### लघु आणि मध्यम गटातील उद्योजकांसाठी सुविधा कक्ष

शासनाच्या 'मेक इन महाराष्ट्र' या योजनेला मूर्तरूप देण्यासाठी राज्यातील मोठ्या उद्योजकांसाठी राज्य पातळीवर निर्माण केलेल्या यंत्रणेच्या धर्तीवरच लघु आणि मध्यम गटातील उद्योजकांसाठी विभाग स्तरावर सुविधा कक्ष सुरू करण्याच्या निर्णयामुळे लघु आणि मध्यम गटातील उद्योजकांना त्यांचे प्रश्न सोडवण्यास मदत होणार आहे.

विदर्भात नागपूर आणि अमरावती विभागासाठी हा कक्ष नागपूरमधील उद्योग सहसंचालक कार्यालयात तर राज्यातील इतर विभागांसाठी म्हणजे पुणे, औरंगाबाद, नाशिक आणि ठाणे येथील उद्योग सहसंचालक कार्यालयात गटातील उद्योजकांना आपले प्रश्न मांडता येऊ शकतात. एखादा उद्योग सुरू करायचा म्हणजे विविध परवाने, अनेक विभागांची ना हरकत प्रमाणपत्रे आणि इतरही अनेक बाबींची पुर्तता करणे आवश्यक असते. ती करता करता उद्योजकांची दमछाक होते व अखेर निराश होऊन तो उद्योग सुरू करण्याचा विचार सोडून देतो, असा आजवरचा उद्योग–क्षेत्रातील अनुभव आहे. त्यामुळेच उद्योजकांसाठी सर्व परवाने, ना हरकत प्रमाणपत्रे आणि इतर बाबींची पूर्तता करण्यासाठी एक खिडकी योजना असावी, अशी उद्योजकांची मागणी होती. 'मेक इन महाराष्ट्र'च्या निमित्ताने राज्य शासनाने ती पूर्ण करून राज्य पातळीवर गुंतवणूकदार सुलभता कक्ष सुरू करण्यात आला होता. याच धर्तीवर लघु व मध्यम गटातील उद्योजकांसाठी विभाग स्तरावर कक्ष सुरू करावा, अशी मागणी पुढे आली होती. कारण, या उद्योजकांचे कार्यक्षेत्र त्या विभागापुरतेच मर्यादित असल्याने त्यांना त्यांच्या कामासाठी मुंबईला जाणे अडचणीचे होते. ही बाब लक्षात घेऊनच विभागस्तरावर सुलभता कक्ष व समिती स्थापन करण्याचा निर्णय जुलैच्या शेवटच्या आठवड्यात उद्योग खात्याने घेतला. त्यानुसार प्रत्येक महसूल विभागातील उद्योग सहसंचालक कार्यालयात एक कक्ष व समिती काम करणार आहे. उद्योग सहसंचालक हे समितीचे अध्यक्ष, तर औद्योगिक विकास महामंडळ, प्रदूषण नियंत्रण मंडळ, महसूल, महावितरण, कामगार आणि स्थानिक स्वराज्य संस्था प्राधिकरणातील अधिकाऱ्यांचा समितीत समावेश असेल.

उद्योजकांच्या अडचणी दूर करणे, विविध शासकीय विभागांशी समन्वय साधणे आणि शासनाकडून दिल्या जाणाऱ्या सवलतींची माहिती देणे, विविध परवाने, ना–हरकत प्रमाणपत्रे जलद गतिने मिळावी, यासाठी प्रयत्न करणे आदी कामे समिती व कक्षाच्या कार्यक्षेत्रात येणार असून उद्योजकांकडून आलेल्या तक्रारींचा निपटारा विभाग पातळीवर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तांत्रिकदृष्ट्या तक्रारींचा निपटारा शक्य नसेल तर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे या तक्रारी वर्ग केल्या जातील. एकूणच विभाग पातळीवरची कामे राज्य पातळीवर येऊ नये, हा या समितीचा उद्देश असून यातून उद्योग सुरू करण्याची प्रक्रिया गतीने होणार आहे.

**(लेखक हे कोल्हापूर सकाळमध्ये ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

## महाराष्ट्राची आघाडी



**''गेल्या वर्षसव्वा वर्षात महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्राने मोठी झेप घेतली आहे. इतर राज्यांच्या तुलनेत उद्योगांसाठी महाराष्ट्रच योग्य कसा हे आम्ही उद्योगपतींच्या मनावर बिंबवण्यात यशस्वी झालो आहोत. पूर्वी उद्योग सुरू करण्यासाठी अनेक परवाने लागायचे. आता या प्रक्रियेत सुलभता आणली आहे. या परवान्यांची संख्या अजून कशी कमी करता येईल यावर काम करतोय. 'मेक इन महाराष्ट्र'ला गतिमान केल्याशिवाय 'मेक इन इंडिया'चे स्वप्न साकार होणार नाही, याची आम्हाला जाणीव आहे. त्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून देशविदेशातील मोठ्या कंपन्यांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे 'मेक इन इंडिया' अभियानात महाराष्ट्र सर्वात आघाडीवर आहे.''**

मेक इन महाराष्ट्र

## नवी दिशा, नवी गती

- उद्योगवाढीसाठी सुलभ व गतिमान प्रक्रिया अमलात. औद्योगिकीकरणाला गती देण्यासाठी ६७ परवानग्यांची संख्या कमी करून ३७ वर आणण्यात आली.
- लघुउद्योगांना चालना देण्यासाठी तसेच उद्योग सुलभतेसाठी कारखाने अधिनियमन १९४८ मध्ये बदल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.
- माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरण २०१५ जाहीर
- उद्योग स्थापन करण्यासाठी आवश्यक सर्व परवानग्या एक महिन्याच्या आत देण्यासाठी अधिकाऱ्यांच्या शक्तिप्रदान गटाची निर्मिती
- १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी 'मैत्री' या वेबपोर्टलच्या माध्यमातून सर्व परवानग्या एकाच ठिकाणी
- माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात ५०,००० कोटी गुंतवणूक अपेक्षित असून दहा लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.
- मायक्रोसॉफ्टच्या माध्यमातून देशातील तीन डाटा सेंटर्सपैकी दोन सेंटर्स मुंबई व पुणे येथे सुरू
- औद्योगिक क्षेत्रात लघुउद्योगांना भूखंड, गाळे व पायाभूत सुविधा देणे, व्हेंचर कॅपिटलची २०० कोटी रुपयांची उभारणी
- वर्षभरात ३४ विशाल प्रकल्पांना मान्यता. त्यांच्या माध्यमातून २० हजार ८०३ कोटी रुपये एवढी गुंतवणूक व २० हजार २०४ व्यक्तींना रोजगाराच्या संधी अपेक्षित आहेत.



# मुख्यमंत्र्यांची वॉर रूम

**आणीबाणीचा प्रसंग, अचानक उद्‌भवलेली नैसर्गिक आपत्ती, अशा परिस्थितीत शासनाची कसोटी लागते. समस्या तत्काळ सोडवण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करते. जेथे समस्येवर बिनचूक तोडगा निघतो त्या ठिकाणाला 'वॉर रूम' म्हटले जाते. 'वॉर रूम' हा आधुनिक व्यवस्थापन शास्त्रामधील परवलीचा शब्द आहे. नव्या व्यवस्थापन शास्त्राला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकार स्थापनेनंतर आपल्या कार्याचा भाग बनवले आहे. हे सरकार वेगळे का आहे, या सरकारच्या कामाची पद्धत वेगळी का आहे, शासनाच्या कामाची गती का वाढली आहे, या प्रश्नांचे अतिशय सकारात्मक व नेमके उत्तर हवे असेल तर एकदा मंत्रालयातील सातव्या माळ्यावर असणाऱ्या 'वॉर रूम' चे कार्य जाणून घेणे योग्य ठरेल !**

**प्रवीण टाके**

'वॉर रूम' ही एक अशी संकल्पना आहे, ज्या ठिकाणी राज्याच्या सर्वोच्च प्राथमिकतेच्या विषयांचा अहोरात्र पाठपुरावा केला जातो. संकल्पनांना व प्रकल्पांना विक्रमी वेळेत पूर्ण करण्याचे या ठिकाणी पेपर वर्क केले जाते. उदाहरणार्थ मुंबई मेट्रो प्रकल्प, नागपूर मेट्रो प्रकल्प, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सागरी किनारपट्टी रस्ता प्रकल्प, मुंबई ट्रान्सहार्बर लिंक प्रकल्प, गोसीखुर्द, बेंबळा, लोअर वर्धा सिंचन प्रकल्प अशा कितीतरी प्रकल्पांना गती मिळाल्याचे चित्र पाहायला मिळते किंवा याबाबतचे वृत्त नियमित कानावर येते. वॉर रूमच्या माध्यमातून सातत्यपूर्ण पाठपुराव्याचीही निष्पती आहे.

### 'वॉर रूम' चे काम कसे चालते ?

प्रकल्प मंजूर करणे, पर्यावरण व अन्य परवानगी मिळवणे, निधी मिळवणे, प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणे, लोकार्पण करणे, कामाची समीक्षा करणे, अशा अनेक स्तरावर या वॉर रूममध्ये कामे होतात. मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिवांपासून सर्व वरिष्ठ अधिकारी राज्यापुढील प्रमुख प्रकल्पाच्या मागे असतात. केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणे, विविध मंत्रालयातून मंजुरीसाठी नवी दिल्लीत ठाण मांडून राज्यातील विविध कार्यक्रमाचे विक्रमी वेळेत प्रकल्प पूर्ण करणे, आदी कार्य या ठिकाणी होते. स्वत: मुख्यमंत्री याचा कायम आढावा घेतात.



निवडले गेले आहेत त्याच वेळी ग्रामीण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी सिंचन प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात ठरवलेल्या प्राथमिकतेला लक्षात घेऊन वॉर रूममधील तज्ज्ञांचे चमू या प्रकल्पांची सद्य:स्थिती जाणून घेतात. त्याला गती देण्यासाठी कोणते प्रयत्न करायचे याची दिशा ठरवतात. प्रकल्पाचे पुनर्विलोकन, प्रकल्पाचे अपेक्षित यश, आणि यशासाठी आवश्यक उपाययोजना सुचवतात. जेव्हा अचानक एखादा विषय राज्यापुढे उभा ठाकतो तेव्हा तो विषयही या वॉर रूममध्ये चर्चेला येतो. या ठिकाणी या विषयावर संपर्क आणि वेळेत समाधान शोधण्यात येते. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव दर आठवड्यात किमान ४ ते ५ प्रकल्पांबाबत वॉर रूममध्ये आढावा घेतात. महिन्यात एकदा मुख्यमंत्री स्वत: या प्रमुख प्रकल्पांची स्थिती जाणून घेतात. या बैठकीला राज्याच्या सर्व सचिवांची आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती असते. या बैठकीत जागेवरच प्रश्न सोडवले जातात आणि दिशा दिली जाते. अशाप्रकारे महिन्याचा आढावा मुख्यमंत्री घेतात, आठवड्याचा आढावा मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव घेतात तर रोजचा आढावा मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी घेतात. त्यामुळे या वॉर रूमचे कार्य २४x७ दिवस चालते. सतत मुख्यमंत्र्यांच्या लक्षात या विषयांची सद्य:स्थिती असते.

### वॉर रूमची आवश्यकता काय ?

शासकीय प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अनेक विभाग कार्यरत असतात. या विभागांमधील आपापसातील समन्वयाअभावी नेमका प्रकल्प पुर्णत्वास जाण्यास विलंब होतो.ही कमी पूर्ण करण्यासाठी एका छताखाली उच्चाधिकार प्राप्त अधिकाऱ्यांची टीम मुख्यमंत्र्यांनी वॉर रूमच्या स्वरूपात गठित केली आहे. या ठिकाणच्या समन्वय व पाठपुराव्याने अनेक प्रकल्प नजीकच्या काळात मूर्त रूपात उतरणार आहेत.

### मुख्यमंत्री आढावा कसा घेतात ?

मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात यासाठी तज्ज्ञांची एक टीम कार्यरत असते. अजेंड्यावर असणाऱ्या प्रमुख विषयांवर जवळपास २७ प्रमुख प्रकल्पांवर आजमितीला लक्ष वेधण्यात आले आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासामध्ये समतोल विकासाचे महत्त्व असते.त्यामुळे समतोल विकास साधण्यासाठी हा प्रत्यक्ष लाभ देणाऱ्या प्रकल्पांचा यात समावेश आहे. उदा. राज्याच्या शहरी भागातील परिणामकारक विकासासाठी पायाभूत सुविधा, पर्यटन आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक सेवा केंद्रांना जेथे चालना मिळेल, असे प्रकल्प

### वॉर रूमची कार्यपद्धती कशी ?

वॉर रूममधील बैठक ही अन्य शासकीय बैठकींपेक्षा अगदी वेगळी असते. बैठकीची कार्यक्रम पत्रिका निश्चित असते. चर्चा केवळ मुद्द्यांवरच होते. विशेष म्हणजे विषय हाताळताना झालेल्या उशिरासाठी, विलंबासाठी संबंधित अधिकाऱ्यांवर तिथल्या तिथेच जबाबदारी निश्चित केली जाते. थोडक्यात मुद्द्यांवर चर्चा, समर्पक उपाययोजना आणि जबाबदारीची निश्चिती या त्रिसूत्रीवर लगेच विषय निकाली काढला जातो. या गतिमान प्रक्रियेमुळेच मुख्यमंत्री केवळ एका बैठकीत अवघ्या २ तासात २७ प्रकल्पांवर निर्णय घेऊ शकतात.

## वॉर रूमचे ठळक विषय

- मुंबई (मेट्रो-२, मेट्रो-३ आणि मेट्रो-७), नागपूर मेट्रो
- वांद्रे-कुर्ला व्यापारी संकुल येथील आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र
- सैफी बुरानी अपलिफ्टमेंट ट्रस्ट (SBUT), भेंडी बाजार पुनर्विकास प्रकल्प
- नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र विकास (NAINA)
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ
- सौरऊर्जा सिंचन पंप
- घारापुरी लेणींचा पर्यटन विकास (एलिफंटा केव्ह)
- मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल)
- गृहनिर्माण प्रकल्प
- सागरी किनारपट्टी रस्ता
- छत्रपती शिवाजी महाराज स्मारक
- चित्रपट नगरीचे अद्यावतीकरण
- राज्यातील सिंचन प्रकल्प

### वॉर रूमची कार्यसिद्धी काय ?

वॉर रूमची स्थापना १५ मे २०१५ रोजी झाली. अल्पावधीत या वार रुमच्या यशाची पताका महाराष्ट्राभर झळकली. सिंचन प्रकल्पांना मिळालेल्या गती, त्यासाठी निघालेले अध्यादेश, गतीने कामाला लागलेली यंत्रणा, सागरी किनारपट्टी मार्ग, ट्रान्स हार्बर लिंक मार्गाला मिळालेल्या पर्यावरण विभागाच्या परवानग्या, ३ मेट्रो प्रकल्पाच्या जमीन अधिग्रहणाच्या सुटलेल्या समस्या अशा कितीतरी यशकथा या वॉर रूमने लिहिल्या आहेत. महाराष्ट्राच्या शिरपेचात नव्या उपलब्धी आणि अनेक नव्या प्रकल्पांची पुर्तता नजीकच्या काळात दृश्य स्वरूपात दिसावी, अशा प्रकारची पायाभरणी वॉर रूमध्ये झाली आहे. लवकरच हे प्रकल्प उभे राहणार आहेत.

संपर्क : ०९७०२८५८७७७



# आपले संविधान, आपले सामर्थ्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १७ डिसेंबर, १९४६ रोजी घटना समितीमध्ये केलेल्या पहिल्या भाषणामध्ये मांडलेले विचार अतिशय महत्त्वाचे आहेत. ते असे म्हणतात की, प्रजासत्ताक हा शब्द वादाचा केंद्रबिंदू असल्याचे जाणवते. मात्र, सार्वभौमत्व लोकांमधून निर्माण होते. या महान देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक भविष्यकालीन संरचनेबद्दल व उज्ज्वल भवितव्याबद्दल माझ्या मनात तिळमात्रदेखील शंका नाही. मात्र, आज आपण राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विभागलेले आहोत, याची मला जाणीव आहे. मला पूर्ण खात्री आहे की, अनुकूल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करू शकणार नाही. विभिन्न जाती व संप्रदाय असले तरी आपण एकसंध झाल्याशिवाय राहणार नाही.

**भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मा. मुख्यमंत्र्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधान या विषयावर विधानसभेत केलेल्या भाषणाचा संपादित अंश....**

पहिल्याच भाषणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सभागृहाला जिंकले होते. मसुदा समितीचा अध्यक्ष असलेल्या या अभ्यासू व्यक्तीमध्ये अनन्यसाधारण प्रतिभा व देशाला दिशा देण्याची ताकद असल्याची कल्पना सभागृहाला आली. या संविधानसभेतील त्यांची भाषणे आजही आपल्या सर्वांकरिता पथदर्शी आहेत. अशाच एका भाषणात ते म्हणतात की, लोकशाहीतील कार्यपालिकेला दोन अटी पूर्ण कराव्या लागतात. ती स्थिर आणि उत्तरदायी असली पाहिजे. तथापि या दोन्ही अटींची सारख्याच प्रमाणात पूर्तता करू शकणारी प्रणाली दुर्दैवाने आजवर विकसित झालेली नाही. आपल्याला एकतर अधिक स्थैर्य परंतु कमी उत्तरदायित्व असलेली प्रणाली लाभेल किंवा अधिक उत्तरदायित्व परंतु कमी स्थैर्य असणारी प्रणाली मिळेल. अमेरिकी आणि स्विस प्रणालीमध्ये अधिक स्थैर्य परंतु कमी उत्तरदायित्व आहे. याउलट ब्रिटिश प्रणालीत अधिक उत्तरदायित्व परंतु कमी स्थैर्य आहे.

आपल्या प्रणालीत काय महत्त्वाचे आहे? या सभागृहामध्ये बसल्यानंतर सामान्य माणसांचे मत या ठिकाणी मांडता येते. कार्यपालिकेला त्याकरिता जबाबदार धरता येते. प्रश्नांच्या माध्यमातून कार्यपालिकेचे उत्तरदायित्व सिद्ध करता येते. पुरवणी मागण्या व अर्थसंकल्प अशा आर्थिक प्रस्तावांच्या माध्यमातून कपात सुचवता येते. आपण स्वीकारलेल्या लोकशाहीमध्ये कार्यपालिकेला उत्तरदायित्वाचा सामना करावा लागतो, हे डॉ. आंबेडकर यांनी स्वीकारलेल्या तत्त्वामुळेच! या सभागृहामध्ये सामान्यांचा आवाज सत्ताधारी व विरोधी पक्षाला सभागृहात मांडता येतो. सामान्यांनाही हा विश्वास आहे की, आपले प्रश्न विधानसभेपर्यंत पोहोचले की, त्यावर काही ना काही उत्तर मिळू शकते. घटनेच्या स्वरूपाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, इतिहासाला दोन

प्रमुख प्रकारच्या घटना ज्ञात आहेत. एकात्मिक आणि संघराज्यात्मक. एकात्मिक घटनेची दोन वैशिष्ट्ये आहेत. मध्यवर्ती राज्यसत्तेचे सर्वश्रेष्ठत्व आणि दुय्यम राज्यसत्तांच्या सार्वभौमत्वाचा अभाव. याउलट संघराज्यात्मक घटनेची दोन वैशिष्ट्ये म्हणजे मध्यवर्ती राज्यसत्ता आणि दुय्यम राज्यसत्ता यांचे सहअस्तित्व आणि प्रत्येक सत्ता आपापल्या निर्देशित क्षेत्रात सार्वभौम असणे.

### एकच नागरिकत्व

डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, एकाच भूखंडावर एक इमारत असावी, तिच्या भोवती अनेक छोट्या इमारती असाव्यात आणि त्या सर्व परस्परांपासून भिन्न दिसाव्यात. तसेच मध्यवर्ती अथवा राज्य सरकार यांचे स्वरूप आहे. आपल्या देशामध्ये वेगवेगळी राज्ये असली तरी त्यांचे अस्तित्व राहील पण नागरिकत्व मात्र एकच राहील. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला देशाच्या अंतर्गत कोणत्याही प्रांतात सारखेच अधिकार राहतील. प्रस्तावित भारतीय घटनेत दुहेरी राज्यसत्ता असून त्यामध्ये एकच नागरिकत्व देण्यात आले आहे. संपूर्ण भारतासाठी एकच नागरिकत्व असणार आहे. ते भारतीय नागरिकत्व असेल, राज्य नागरिकत्व ठेवण्यात आले नाही. प्रत्येक भारतीयाला तो कोणत्याही राज्याचा निवासी असला तरी, नागरिकत्वाचे समान अधिकार आहेत. ते असेही म्हणाले होते की, १०० वर्षांपेक्षा अधिक काळ विविध देशांच्या घटना तयार करण्यासाठी गेल्या आहे. त्यांच्या घटनेत जे काही चांगले आहे ते घेण्याकरिता लाज कशाला वाटली पाहिजे. आमच्या संस्कृतीने वेळोवेळी जगातील चांगले स्वीकारले आहे. राज्यघटना तयार करताना जगात जे चांगले आहे, ते आम्ही स्वीकारले आहे. पण हे आम्ही अंधतेने स्वीकारलेले नाही. ते स्वीकारत असताना त्यामागची तत्त्वे आम्ही समजून घेतली आणि त्यातील या देशाला, समाजाला आणि समाजव्यवस्थेला लागू होतील, अशीच तत्त्वे आम्ही स्वीकारली. म्हणून खऱ्या अर्थाने सामान्य माणसाला या राज्यघटनेने अधिकार दिले आहेत. संधीची समानता आपल्याला का दिली? कारण या देशामध्ये खूप मोठा समाज वंचित होता. अशा प्रकारच्या वंचित समाजाला वर्षानुवर्षे, दशकानुदशके, शतकानुशतके खूप भेदभावाला सामोरे जावे लागले होते. ज्याला मिळाले आहे आणि ज्याला मिळाले नाही यांच्यात असमानता ठेवली असती तर ज्यांना मिळाले आहे तेच पुढे गेले असते आणि ज्यांना मिळाले नाही असे कधीच पुढे गेले नसते. म्हणून राज्यघटनेच्या माध्यमातून आरक्षणाचे तत्त्व स्वीकारले आहे. ते अतिशय महत्त्वाचे आणि वैज्ञानिक तत्त्व आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक या चारही बाबींवर मागासलेपण असणाऱ्यांना आपण प्राधान्याने आरक्षण दिले आहे.

डॉ.आंबेडकरांनी पहिल्यांदा ५० वर्षाकरिता आरक्षण ठेवले होते. संसदेमध्ये श्री. वाजपेयी यांचे सरकार असताना आरक्षणासंदर्भात आढावा घेण्यात आला. त्यावेळी सगळ्यांचे एकमत झाले की, आज आपला समाज मोठ्या प्रमाणात वंचित आहे. त्यांच्याकरिता सामाजिक आरक्षण ठेवले पाहिजे. अशा प्रकारे आरक्षणाला मुदतवाढ देण्याचे काम वाजपेयी सरकारने केले. समाजातील एकही व्यक्ती भेदभावग्रस्त असेपर्यंत हे आरक्षण आपल्याला ठेवावेच लागेल, ते ठेवलेच पाहिजे. त्याशिवाय आपला देश पुढे जाऊ शकणार नाही, हे आपण सर्वांनी मान्य केले पाहिजे.

### आर्थिक तरतुदी

आपल्या संविधानामध्ये आर्थिक बाबींवर तरतुदी केलेल्या आहेत. त्या एवढ्या चांगल्या आहेत की, कोणत्याही राज्याला अधिकाराप्रमाणेच काही जबाबदाऱ्यादेखील दिल्या आहेत. देशाने व राज्याने फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी ॲण्ड बजेट मॅनेजमेंट (एफआरबीएम) कायदा तयार केला. राजकोषीय उत्तरदायित्व विधेयक आपण तयार केले. हे विधेयक तयार करण्याची वेळ केंद्र व राज्य शासनावर कधी तरी येईल, याची कल्पना डॉ.आंबेडकरांना त्या काळात होती. त्याचा उल्लेखही त्यांनी केला व तशी व्यवस्थादेखील राज्यघटनेच्या माध्यमातून केली. केंद्र व राज्य शासनाला ज्या वेळी जाणवले की, आपल्यावर बंधन घालून घेतले पाहिजे. त्यावेळी त्यांनी कायद्याच्या माध्यमातून आपल्यावर बंधन घालून घेतले. राज्यघटनेमध्ये आज आपण १०० पेक्षा अधिक सुधारणा केल्या असतील. पण राज्यघटनेची मूळ तत्त्वे एवढी मजबूत आहेत, की कोणत्याही प्रश्नाचे उत्तर त्यामधून मिळू शकते.



### अर्थतज्ज्ञ बाबासाहेब...

**डॉ. आंबेडकरांच्या लंडनस्थित घराच्या लोकार्पणाच्या निमित्ताने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे जाण्याची संधी मिळाली. तेथील प्राध्यापकांनी आम्हाला सांगितले की, आमच्या येथील रेअर व रेव्हर्ट स्कॉलर हे डॉ. आंबेडकर होते. त्यांनी लिहिलेले प्रबंध हे या संस्थेत आजही संदर्भित केले जातात.**

**डॉ. आंबेडकर हे मोठे अर्थतज्ज्ञ होते. खरे म्हणजे त्यांच्या संविधान तयार करण्याच्या कृतीमुळे त्यांनी अर्थतज्ज्ञ म्हणून केलेल्या कार्याचा आपण उचित प्रमाणात गौरव करू शकलो नाही. डॉ. आंबेडकर हे रुपयाच्या परिवर्तनीयतेवर अधिकारवाणीने भाष्य करणाऱ्यातील एक होते. आज परिवर्तनीयतेबद्दल बोलताना त्याचा आर्थिक परिणाम काय होईल व भारत हा कशा प्रकारे आर्थिक महासत्ता बनू शकतो यासंदर्भात त्यांनी केलेले लिखाण अतिशय पथदर्शी आहे.**

## मूलभूत ढाचा

सर्वात महत्त्वाची गोष्ट ही आहे की, या राज्यघटनेचा मूलभूत ढाचा बदलता येत नाही. केशवानंद भारती प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, राज्यघटनेचा मूलभूत ढाचा बदलण्याचा अधिकार संसदेलादेखील नाही. ती संसद आहे, घटना समिती नाही. घटना समितीने तयार केलेल्या मसुद्यावर संसद तयार झालेली आहे. त्यामुळे राज्यघटनेचा मूलभूत ढाचा बदलण्याचा अधिकार संसदेला नाही. त्यानंतर ज्या ज्या वेळी लोकशाहीवर संकट आले, त्या त्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने



केशवानंद भारती केसच्या आधारे ते दूर करण्याचे काम केले. आपल्याला मी लक्षात आणून दिले पाहिजे की, या देशामध्ये आणीबाणी आली, त्यानंतर सन १९७१ मध्ये निवडणुका झाल्या. अलाहाबाद उच्च न्यायालयात राजनारायण यांनी दाखल केलेल्या याचिकेमुळे स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी यांची निवड रद्दबातल झाली. त्यानंतर संसदेमध्ये त्या काळात घटनादुरुस्ती आणून प्रधानमंत्री, पीठाधीश म्हणजे अध्यक्ष, राष्ट्रपती, उप राष्ट्रपती यांची निवडणूक न्यायालयाच्या कक्षेबाहेर काढण्यात आली. खरे म्हणजे लोकशाहीवर तो पहिला आघात होता. या देशाच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, मूलभूत रचनेत हे बसत नाही. अशा प्रकारे त्यावेळी केलेल्या घटनादुरुस्तीमुळे लोकशाहीचा जो संपूर्ण आत्मा संपवून टाकण्यात आला होता, तो सर्वोच्च न्यायालयाने परत केला. त्यांनी सांगितले की, अशाप्रकारची घटनादुरूस्ती करता येणार नाही. प्रधानमंत्रींची निवडणूक असो, राष्ट्रपतींची निवडणूक असो की, कोणतीही निवडणूक असो, या संविधानाने प्रधानमंत्र्यांना संविधानाच्या वरचा दर्जा दिलेला नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारतींच्या केसचा दाखला देऊन डॉक्ट्रिन ऑफ बेसिक स्ट्रक्चरच्या अंतर्गत केलेली ३९ वी घटना दुरुस्ती रद्दबातल ठरवली.

## संविधानाची महती

घटनादुरूस्ती ४२ मध्ये ३१ (घ) अनुच्छेद टाकण्यात आला होता व त्या माध्यमातून या देशाला एक बंदीशाळा बनवण्यात आले होते. या देशातील लोकशाही संपली होती. या देशातील वेगवेगळ्या विचारांच्या लोकांना जेलमध्ये टाकण्यात आले होते. पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, अशाप्रकारची तरतूद करण्याचा तुम्हाला अधिकार नाही. या देशातील स्वातंत्र्य जे डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिले आहे, ते कुठल्याही घटनादुरुस्तीच्या माध्यमातून तुम्हाला काढून घेता येणार नाही. अशाप्रकारे लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचा गळा घोटून जी लोकशाही समाप्त करण्यात आली होती त्याविरुद्ध पहिला ऐतिहासिक

**‘डॉ.आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्ताने बंधुता आणि समरसता दिवस साजरा करण्यात येतो. समरसता म्हणजे काय, तर एका कोणामध्ये तरी समरस व्हायचे, आपले स्वत:चे अधिकार सोडून द्यायचे. समरसतेचा मूलमंत्र देणारे श्री. बाळासाहेब देवरस यांनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेमध्ये अतिशय स्पष्टपणे समरसता म्हणजे काय हे सांगितले. एकसंधपणे कुठल्याही जाती तसेच धर्माचा भेदभाव न करता काम करणे म्हणजे समरसता असे त्यांनी सांगितले आहे. जात, धर्म हा भेदभाव न करता सर्वांनी मी भारतीय आहे, या भावनेतून काम करणे म्हणजे समरसता. समरस व्हायचे आहे ते व्यक्तीमध्ये नाही तर समरस व्हायचे आहे ते देशामध्ये, समरस व्हायचे आहे ते राष्ट्रवादामध्ये, समरस व्हायचे आहे ते या सार्वभौमत्वामध्ये.’**

निर्णय देण्यात आला. त्यातून जेलमध्ये बंद असलेल्या जवळपास दोन ते अडीच लाख लोकांना सोडण्यात आले. याकरिता या संविधानाची महती आपण सर्वांनी समजून घेतली पाहिजे. हा देश एकसंध आहे, कारण या देशातील भारतीयाला सहिष्णुता शिकवण्याची आवश्यकता नाही. आमचे मूळ रक्तच सहिष्णू आहे. आमचा ५ हजार वर्षांचा इतिहास सहिष्णू आहे. ज्यांना संपूर्ण जगाने बाहेर काढले त्यांना या देशाने जागा दिली. जगत के ठुकराए हुए लोगों को लो खुला मेरा द्वार, असे म्हणणारा हा देश आहे.

**ग्रीक, हूण, शक, यवन, टूटते थे भूमि पर ।**
**हारते थे हौसले, पंचनद के तीर पर ।**
**पता नहीं कहाँ हैं वे, अतीत में समा गए ।**
**काल के प्रवाह में, निज को वो मिटा गए ।**

आम्ही कोणावर आक्रमण केले नाही. मात्र या देशाने आपल्या इतिहासात अनेक आक्रमणे झेलूनही आपली संस्कृती जिवंत ठेवली आणि आक्रमणकर्त्यांनाही आपल्या हृदयात जागा दिली. त्यांच्या संस्कृतीमधील जे चांगले असेल ते घेतले. त्यामुळे या देशाला सहिष्णुता शिकवण्याची आवश्यकता नाही. हा सहिष्णू लोकांचाच देश आहे आणि सहिष्णूच राहणार आहे. या देशाची सहिष्णुता कोणी हिरावून घेऊ शकत नाही. मी शेवटी एवढेच सांगणार आहे की, या संविधानाने आपल्याला दिलेल्या अधिकारांचे पालन करताना, ते मिळवत असताना आमच्यावरील जबाबदाऱ्यांचे पालनही आम्ही केले पाहिजे. सामाजिक न्याय केवळ भाषणात असून चालत नाही, तो कृतीत असावा लागतो, तो आपल्याला कृतीतूनच प्रदर्शित करावा लागतो. समाजातला भेदभाव संपुष्टात आणण्याची जबाबदारी या संविधानाने तुमच्यावर आणि आमच्यावर टाकली आहे.

**(संपादित–संकलन : हेमराज बागूल)**

# सुशासनासाठी ई-गव्हर्नन्स @नागपूर

**सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. या काळात प्रशासन चालवताना माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून यामुळे नागरिकांची कामे सोईची व गतिमान पद्धतीने करण्याचे प्रयत्न सर्वच स्तरातून सुरू आहेत. याचे एक सिंहावलोकन आणि या माध्यमातून आगामी दहा वर्षांची वाटचाल कशी असेल याचे दर्शन १९ व्या राष्ट्रीय ई- गव्हर्नन्स परिषदेत नुकतेच घडले.**



राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये ही २ दिवसीय परिषद २० आणि २१ जानेवारी २०१६ रोजी पार पडली. याचे उद्‌घाटन झाल्यापासून एकूण सहा सत्रे झाली ज्यामध्ये ई–गव्हर्नन्सचा भारताच्या विविध भागात होत असलेला वापर आणि जगात या क्षेत्रात झालेल्या सुधारणा यांचा एक माहितीपटच जणू यानिमित्ताने खुला झाला होता.

**प्रशांत दैठणकर**

## आजवरची वाटचाल

ई–गव्हर्नन्सच्या पहिल्या परिषदेपासून, आजवर झालेल्या वाटचालीत येणारे युग हे नागरिकांना कमीत कमी वेळेत आणि शक्यतो घरूनच कामे करता येतील; या भूमिकेतून वाटचाल करील अशी अपेक्षा आहे. संगणकानंतर आलेल्या स्मार्ट फोनमुळे जग जणू तळहातावर आले आहे. पुढील काळात अधिकाधिक सेवा मोबाइलच्या माध्यमातून दिल्या जातील हे लक्षात घेऊन सर्वांनी नियोजन करण्याची गरज आहे असा काहीसा सूर या परिसंवादांमधून उमटला. ई–गव्हर्नन्स तर आवश्यकच आहे. त्यासोबत गुड गव्हर्नन्स अर्थात सुशासन ही आज काळाची गरज आणि सर्वांची ती अपेक्षादेखील आहे, असे उद्‌घाटन प्रसंगी केंद्रीय रस्तेविकास आणि जहाज बांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. त्यात लोकांच्या अपेक्षा आणि तंत्रज्ञान याची सांगड घालत गतिमान सेवा देणे याला सर्वच शासकीय यंत्रणानी प्राधान्य द्यावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## दखल महाराष्ट्राची

पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी महाराष्ट्राने गेल्या वर्षभरात पुढाकार घेऊन, केलेल्या कामांची दखल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी घेतल्याचे आवर्जून सांगितले. कागदपत्रांचे स्वप्रमाणन (सेल्फ सर्टिफिकेशन) आणि स्वयंघोषणापत्र (सेल्फ ॲफिडेव्हिट) बंद करण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय युवा पिढीला आवश्यक होता. यामुळे वेळ आणि पैसा वाचणार आहे. असे सांगतांना आपल्या काळात हे किती किचकट आणि वेळखाऊपणाचे काम होते या बाबत स्वत:च्या अनुभवाचा किस्सा त्यांनी सांगितला. जगात ई–गव्हर्नन्सच्या वापरात आपल्या देशाचा क्रमांक ११८ वा आहे. त्यामुळे पहिल्या १० मध्ये येणे हे पहिले उद्दिष्ट राहणार आहे. इस्टिनिया, डेन्मार्क सारख्या देशात नागरिकांच्या सेवा थेट घरूनच मिळविता येतात. ई–गव्हर्नन्सचा वापर या देशात ८९ टक्के इतका आहे, हे उल्लेखनीय आहे. लाभार्थ्यांच्या खात्यात आर्थिक लाभ पोहचवण्यासाठी मोबाइल तंत्राचा वापर करण्यापासून, येणाऱ्या काळात प्रथम अनिवासी भारतीय व पुढे सर्व भारतीयांना मोबाइलवर मतदान करण्याइतके तंत्र उपलब्ध आहे. त्याची सांगड त्याच्या प्रत्यक्ष वापराशी घालण्याचे आव्हान सर्वांसमोर राहणार आहे.

सामान्य व्यक्तींची साधी साधी कामे वेळेत पूर्ण होत नाहीत. त्यामुळे जनमानसात चीड आहे. ही चीड दूर करण्यासाठी नव्या तंत्राचा आधार घेण्याची गरज आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समारोप प्रसंगी सांगितले. राज्याच्या ४० सेवा सध्या ई–गव्हर्नन्सच्या माध्यमातून दिल्या जात आहेत. लवकरच ही संख्या १५० वर नेली जाईल असे ते म्हणाले.

नागपूरातल्या वर्धारोडवरील लि–मेरियनच्या परिसरात मुख्य मंडपालगत विविध विभागांचे स्टॉलदेखील लावण्यात आले होते. ई–गव्हर्नन्समध्ये टॉप टेनचे उद्दिष्ट साध्य करू, असा निर्धार ३०० प्रतिनिधींपैकी प्रत्येकाने परत येताना निश्चितपणे केला असेल.

**(लेखक हे गडचिरोली जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९८२३१९९४६६**

## विशेष मुलाखत

**गृहनिर्माण, खनिकर्म आणि कामगार यासारख्या महत्त्वाच्या खात्यांबरोबरच कॅबिनेट मंत्री प्रकाश महेता रायगड जिल्ह्याचे पालकमंत्रिपदही तितक्याच सक्षमपणे सांभाळत आहेत. '२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत त्यांच्या प्रयत्नांनी मुंबईत येत्या पाच वर्षात जवळपास १९ लाख घरे तसेच बरेच वर्षे रखडलेला धारावी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प लवकरच प्रत्यक्षात उतरणार आहे. ग्रामीण भागासाठीच्या बऱ्याच विखुरलेल्या योजनादेखील 'सर्वांसाठी घरे' या योजनेच्या अखत्यारित आणण्याचा त्यांचा विचार आहे. त्याशिवाय कामगारविषयक कायद्यामध्ये विशेष सुधारणा करून 'मेक इन महाराष्ट्र'ला पूरक वातावरण निर्माण करण्याचे महत्त्वाचे कामही ते करीत आहेत. वर्षातील कामाचा आणि या पुढील वाटचालीचा त्यांच्याकडून घेतलेला हा आढावा...**



# सर्वांसाठी घरे

मृदुला वरसकर

**'सर्वांसाठी घरे' या योजनेबद्दल विस्ताराने सांगा.**

ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी योजना आहे. २०२२ मध्ये आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होतील. त्याचे औचित्य साधून सर्वांना घर मिळावे, यासाठी भारत सरकार गरजू लाभार्थ्यांना आर्थिक मदत करेल. यात नवीन घरे तसेच दुरुस्तीची गरज असलेली जुनी घरे यांचा समावेश असेल. 'प्रधानमंत्री आवास योजने'ची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. परवडणाऱ्या घरांची निर्मिती असा या योजनेचा उद्देश असून राज्यातील ५१ शहरांचा त्यात समावेश करण्यात येणार आहे.

**वाढत्या किंमतीमुळे घर घेणे ही सर्वसामान्यांसाठी अशक्य गोष्ट झाली आहे. यावर काय उपाययोजना करणार आहात?**

होय, हे नक्कीच एक मोठे आव्हान आहे. '२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' या योजनेंतर्गत राज्य सरकार येत्या पाच वर्षांत १९ लाख घरे बांधणार आहे. खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रांबरोबर भागीदारी करून, क्रेडीटलिंक अनुदानाद्वारे ही योजना साध्य होईल. म्हाडा, सिडको, एमएमआरडीएच्या ताब्यातील जमिनी राज्य सरकार सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर स्वत: विकसित करणार आहे. तसेच आधी म्हटल्याप्रमाणे 'प्रधानमंत्री आवास योजना' अंतर्गत गरिबांसाठी एक ते दीड लाख रुपयांपर्यंत मदत करण्यात येईल.

**मुंबई आणि उपनगरात सीआरझेड २, नो डेव्हलपमेंट झोन, मिठागरांच्या जमिनीमुळे विकासाला अडचणी येत आहेत. यावर उपाय काय?**

मुंबईचा बराचसा भाग या जमिनींतर्गत येतो. त्यामुळे मुंबईच्या विकासात बरीच आव्हाने आहेत. सध्या आम्ही केंद्र सरकारबरोबर या जमिनीवर घरे बांधण्याबाबत विचारविनिमय करत आहोत. लवकरच या बाबतीत निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.

**गृहनिर्माण नियामक प्राधिकरणला सशक्त बनवण्याबाबत प्रयत्नशील आहात का?**

लवकरच त्यांना सिव्हिल कोर्टप्रमाणे अधिकार मिळतील. त्यानुसार विकासकाने प्रकल्प पूर्ण करण्यास विलंब लावल्यास गृहनिर्माण नियामक प्राधिकरण, प्रकल्पाच्या १० टक्के किमतीएवढा प्रकल्प ग्राहकाच्या नावावर करण्याची परवानगी देऊ शकेल आणि ग्राहक तेवढा हिस्सा मार्केटमधे विकू शकेल. तसेच त्यांना डिफॉल्टर्सना दंड ठोठावणे आणि तुरुंगवासाची शिक्षा देण्याचेही अधिकार असतील, अशी तरतूद आम्ही करत आहोत.



**कामगार मंत्री म्हणून आपण 'मेक इन महाराष्ट्र'साठी काय करणार आहात?**

उद्योगधंदे नीट चालण्यासाठी कामगारांचा

महत्त्वाचा वाटा असतो. 'मेक इन महाराष्ट्र'देखील त्याला अपवाद नाही. २०२५ पर्यंत जगात ३०० दशलक्ष कामगार तयार होतील आणि त्यापैकी २५ टक्के भारतातून असतील असा अंदाज आहे. महाराष्ट्रात भरपूर मनुष्यबळ आहे आणि त्यांना पोषक वातावरण आणि चांगल्या सुविधा देणे महत्त्वाचे आहे. आम्ही नुकतीच फॅक्टरी ॲक्टमध्ये सुधारणा करून तिमाही ओव्हर टाइमची मर्यादा ७५ तासांवरून वाढवून ११५ तासांवर आणली आहे. तसेच महिला कामगारांना रात्रपाळी करण्याची परवानगीही दिली आहे. तसेच पूर्वी मजूर २५० दिवस भरल्याशिवाय रजा घेऊ शकत नसत. ती अट आता फक्त ९० दिवसांवर आणली आहे.

औद्योगिक विवाद अधिनियम (इंडस्ट्रियल डिस्पुट ॲक्ट) मधील सेक्शन २ आणि २५ मध्ये सुधारणा करून कामगारांची भरपाई रक्कम वाढवण्याचा विचार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त व नियमितस्वरूपी कामगार कामाकडे वळतील आणि टिकून राहतील. त्यामुळे राज्यातील उद्योगजगतामध्ये अनुकूल वातावरण निर्मिती होईल.

## नवीन कामगार कायद्यात कोणते महत्त्वाचे बदल आहेत?

- **यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र आयोगाची निर्मिती**
- **महाराष्ट्र दुकान व आस्थापना कलम (शॉप ॲण्ड एस्टॅब्लिशमेंट्स ॲक्ट) १८ मधून वगळून दुकाने बाराही महिने चालू ठेवण्याची परवानगी**
- **कंत्राटदारांना परवाने देताना ठरावीक आणि कडक वेळमर्यादा**
- **कामगार विभागाचा बीपीआर तसेच संगणकीकरण पूर्ण. ऑनलाइन सेवेसाठी एक पोर्टल सुरू**
- **माथाडी सल्लागार समितीत सुधारणा**
- **ऊस कामगारांसाठी स्वतंत्र त्रिदलीय समिती.**

### आपल्या सरकारला नुकतेच वर्ष झाले, पुढील चार वर्षांतील आपली वाटचाल कशी असेल?

गृहनिर्माण क्षेत्राचा विचार केला तर 'सर्वांसाठी घरे' या योजनेंतर्गत इडब्लुएस/एलआयजीमध्ये मोठ्या प्रमाणावर घरे निर्माण करण्यात येतील. तसेच रियल इस्टेट क्षेत्रातील विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्न केले जातील. अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तींना परवडणारी घरे उपलब्ध करून देणार आहोत. कामगार क्षेत्रातही आम्ही दुकाने व आस्थापना कायदा, कंत्राटी कामगार कायदा, माथाडी कायदा, मालक व कर्मचारी दोघांना उपयुक्त अशा योग्य सुधारणा करत आहोत. महत्त्वाकांक्षी 'सर्वांसाठी घर' आणि 'मेक इन महाराष्ट्र' योजना यशस्वी करण्यासाठी सर्व सहकार्य आणि प्रयत्न आम्ही करू.

### मुंबईतील रखडलेले विविध प्रकल्प आणि त्यावरील उपाय योजनांबद्दल काय सांगाल?

**गिरणी कामगारांसाठी घरे :** म्हाडांतर्गत ६९४८ घरे बांधण्यात आली आहेत. यापैकी २३ घरे संयुक्त महाराष्ट्र चळवलीतील हुतात्म्यांच्या वारसदारांना देण्यात आली तर ५५७३ एवढी घरे गिरणी कामगारांना देण्यात आली. बाकीच्या नऊ मिलच्या जमिनीवर ६७९४ अपार्टमेंट्स बांधण्यात आली आहेत. शहरी विकास (अर्बन डेव्हलपमेंट) अंतर्गत एमएमआरडीएमधील हाऊसिंग कॉप्लेक्समधे कामगाराना ५० टक्के घरे देण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**पोलिसांना घरे :** म्हाडा आणि महाराष्ट्र स्टेट पोलीस हाऊसिंग कॉर्पोरेशनच्या भागीदारीने मोठ्या प्रमाणावर घरे बांधण्यात येत आहे. मुंबईसह इतर विभागातही पोलिसांसाठी लवकरच घरांची व्यवस्था करण्यावर आमचा भर आहे.

**बीडीडी आणि बीपीटी चाळी पुनर्वसन :** सर्व बीडीडी कर्मचाऱ्यांसाठी स्वस्तात घरे बांधण्याचा विचार अंतिम टप्प्यात आहे. बीपीटी चाळीचे पुनर्वसन केल्यास १ लाख घरे निर्माण होतील, याबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव दिलेला आहे.



**धारावी पुनर्विकास योजना:** धारावी पुनर्विकास प्रकल्पाला गती दिली जात आहे. झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या ४ लाख घरांचे काम लवकरच सुरू केले जाणार आहे, यासाठी जागतिक पातळीवरून निविदादेखील मागवण्यात आल्या आहेत. हा प्रकल्प येत्या ७ वर्षात मार्गी लावण्याचा आमचा मानस आहे.

**निर्वासित छावणी पुनर्विकास :** मोडकळीस आलेल्या सायन कोळीवाडा, चेंबूर, ठाणे येथील ६० वर्षे जुन्या इमारतींचा पुनर्विकास व क्लस्टर डेव्हलपमेंट सुरू असून लवकरच सुरक्षित घरे देण्यासाठी कार्यवाही सुरू आहे.

**(लेखिका विविध विषयांवर लिहिणाऱ्या मुक्त पत्रकार आहेत.)**
**संपर्क : ०९७६८१२९३९८**

# प्रत्येक क्षण सत्कारणी

**अत्यंत विनम्र, मितभाषी, शांत आणि सुस्वभावी ही वैशिष्ट्ये राज्याचे परिवहन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), कामगार, वस्त्रोद्योग आणि पदूम विभागाचे राज्यमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री विजय देशमुख यांची आहेत. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये कमालीचे लोकप्रिय असलेले श्री. देशमुख यांचा दिवसभराचा कामाचा झपाटा कसा असतो, याचा हा वृत्तांत...**

**इर्शाद बागवान**

'एक दिवस मंत्र्यांसोबत' या सदरासाठी लिखाण करण्याच्या उद्देशाने एका मंगळवारी सकाळी साधारणत: ९ वाजण्याच्या सुमारास मी राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), परिवहन, कामगार, वस्त्रोद्योग आणि पदूम विभागाचे राज्यमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री विजय देशमुख यांचे मंत्रालयासमोरील शासकीय निवासस्थान गाठले. देशमुख साहेब बंगल्यातील कार्यालयीन दालनात नागरिकांना भेटत होते, निवेदने स्वीकारत होते, आवश्यक वाटेल तिथे खासगी सचिव, स्वीय साहाय्यकांना सूचना देत होते आणि भेटण्यासाठी आलेल्या माणसाचे समाधान करण्याचा प्रयत्न करत होते.

श्री. देशमुख हे 'सॉफ्ट स्पोकन पर्सन' म्हणून ओळखले जातात. अत्यंत विनम्र, मितभाषी, शांत आणि सुस्वभावी असलेले देशमुख साहेब आपल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबतही तितक्याच सहजतेने संवाद साधतात. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्याबाबत नेहमीच आदर आणि प्रेम वाटत आले आहे. कर्मचाऱ्यांकडून प्रेमाने काम करून घेतल्यास ते अधिक चांगले आणि प्रभावी होते, असे ते नेहमी म्हणतात. अभ्यागतांची गर्दी ओसरल्यानंतर देशमुख साहेबांनी त्यांचे खासगी सचिव श्री. बाविस्कर व विशेष कार्य अधिकारी श्री. शास्त्री यांच्याकडून दिवसभरात करावयाच्या कामकाजाचा आढावा घेतला. महत्त्वाचे टपाल पाहिले. सोलापुरातील काही महत्त्वाच्या प्रश्नांसंदर्भात देशमुख साहेब आज मंत्रालयात मुख्यमंत्र्यांसह इतर काही मंत्र्यांना भेटणार होते. त्या संदर्भातील पत्रे तयार करण्याबाबत त्यांनी खासगी सचिव व विशेष कार्य अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. साधारण साडेदहाच्या सुमारास ते मंत्रालयाकडे रवाना झाले.

मंगळवार हा मंत्रिमंडळ बैठकीचा दिवस असल्याने मंत्रालयात बरीच गर्दी होती. सकाळी ११ वाजता मंत्रिपरिषदेची बैठक सुरू झाली. राज्यमंत्री देशमुख साहेब या बैठकीसाठी उपस्थित राहिले. या बैठकीच्या समाप्तीनंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सोलापूर जिल्ह्यात खरिपानंतर पाण्याअभावी रब्बी पिकेही वाया गेल्याने जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी केली. मुख्यमंत्री महोदयांना या संदर्भातील पत्र देऊन जिल्ह्यात चारा छावण्या आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत, अशी विनंती करणारे निवेदन दिले. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत उपविजेते ठरलेले सोलापूर जिल्ह्यातील विक्रांत जाधव यांना पोलीस दलात नोकरी देण्यात यावी, अशी विनंतीही याप्रसंगी त्यांनी मुख्यमंत्री महोदयांना पत्र देऊन केली. या दोन्ही मुद्द्यांवर सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी देशमुख साहेबांना दिले. त्यानंतर राज्याचे महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांचीदेखील भेट घेऊन त्यांनाही सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळासंदर्भात पत्र दिले आणि जिल्ह्याची भीषण टंचाई परिस्थिती त्यांना सविस्तरपणे विषद केली.

मंत्रालयात साहेबांचा भरगच्च कार्यक्रम होता. नियोजनाप्रमाणे सुनावण्यांपासून त्यांनी मंत्रालयातील कामकाजाला सुरुवात केली. बुलडाणा जिल्ह्यातील एका प्रकरणात एका मत्स्य व्यवसाय संस्थेला १६ लाख रुपये ठेका रक्कम भरूनसुद्धा मच्छीमारी करता आली नव्हती. शिवाय भरलेली ठेका रक्कमही त्यांना परत मिळत नव्हती. याबाबतीत त्यांनी मच्छीमारांचे संपूर्ण म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. गरीब मच्छीमारांनी आपली शेतजमीन विकून





सहकार मंत्र्यांकडे बैठकीसाठी रवाना झाले. सहकार मंत्र्यांकडील सूतगिरण्यांच्या अडीअडचणींसंदर्भातील बैठकीमध्ये त्यांनी हिरिरीने भाग घेतला व अडचणीत असलेल्या सूतगिरणी व्यवसायास मदत करण्याची भूमिका ठामपणे मांडली. या बैठकीनंतर उद्योग राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील यांच्या दालनात सोलापुरातील कुंभारी येथे नवीन एमआयडीसी सुरू करण्यासंदर्भातील मागणीबाबत स्वत: त्यांना जाऊन भेटले व सोलापूर शहरामध्ये अक्कलकोट रोड, कुंभारी येथे नवीन एम.आय.डी.सी. उभारणे शहराच्या दृष्टीने कसे आवश्यक आहे, याबाबत सविस्तर चर्चा केली.

या ठेक्यासाठी पैसे भरले होते. यासंदर्भात देशमुख साहेबांनी अधिकाऱ्यांचेही म्हणणे ऐकून घेतले आणि न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे मच्छिमार संस्थेस त्यांचे पैसे परत द्यावे किंवा त्यांना मासेमारी करू द्यावी, असे निर्देश त्यांनी या वेळी दिले. शासकीय कामकाज करत असताना सर्वसामान्य लोकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी दिले. यानंतर आणखी काही सुनावण्या घेऊन त्यांनी त्या-त्या प्रकरणात अत्यंत न्यायोचित भूमिका घेतली आणि सुनावण्यांसाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून दिला.



कामगार वर्गाबाबत त्यांना नेहमीच कमालीचा जिव्हाळा आणि आत्मीयता वाटत राहिली आहे. कामगारांविषयीची त्यांची तळमळ आणि सकारात्मक दृष्टिकोन यानंतर झालेल्या एका बैठकीत मला पाहता आला. आदिती फार्मास्युटिकल्स कंपनीतील कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क कंपनीकडून मिळत नसल्याबाबतची कामगार व कामगार संघटनांची तक्रार श्री. देशमुख यांनी शांतपणे ऐकून घेतले. स्वत: या मुद्द्याची नोंद करून घेतली. संबंधित कंपनी ही कामगार कायद्यांची अंमलबजावणी करीत नसल्यास त्यांच्याविरुद्ध नियमाप्रमाणे कारवाई करून कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्याबाबत त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

आदल्या रात्री देशमुख साहेब साधारण १० तासांचा प्रवास करून सोलापूरहून मुंबईला आले होते. पण दिवसभराच्या कामकाजात या प्रवासाचा कुठलाही थकवा किंवा कंटाळा त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. दिवसभराच्या कामाच्या ओघात त्यांनी त्या दिवशी जेवणही घेतले नाही. दालनात भेटण्यासाठी आलेल्या प्रत्येक व्यक्तीला भेटलेच पाहिजे असा त्यांचा शिरस्ता आहे, त्यामुळे सुनावण्या संपल्यानंतर ते ताबडतोब बैठकीच्या दालनातून थेट हॉलमध्ये गेले व त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या सर्व अभ्यांगताना भेटून त्यांचे प्रश्न समजून घेतले / निवेदने स्वीकारली व उचित कार्यवाही करण्याबाबत खासगी सचिव / विशेष कार्य अधिकारी यांना निर्देश दिले. त्यानंतर काही लोकप्रतिनिधी यांच्या भेटी घेतल्या व चर्चा केली. प्रत्येक येणाऱ्या व्यक्तिला पाणी दिले का, चहा दिला का असे आत्मीयतेने ते विचारत होते. त्यानंतर साधारण ३.३० वाजण्याच्या सुमारास ते सूतगिरण्यांच्या अडी-अडचणींसंदर्भातील बैठकीसाठी सहकार मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्याकडे रवाना झाले. मी सहकार मंत्र्यांकडे जाणार असून कार्यकर्ते, नागरिकांपैकी कोणाचे त्यांच्याकडे काम असल्यास माझ्यासोबत चला, असे त्यांनी आवर्जून सगळ्यांना सांगितले आणि ते

कार्यकर्ते आणि नागरिकांच्या कामासाठी स्वत: संबंधित मंत्र्यांकडे जाऊन कामाचा पाठपुरावा करण्याची देशमुख साहेबांची पद्धत आहे. मंत्रालयातील दिवसभराच्या कामकाजात विविध पाच ते सहा मंत्र्यांच्या भेटी घेऊन त्यांनी लोकांचे विविध प्रश्न मार्गी लावले. सायंकाळी बंगल्यावर परतल्यानंतर पुन्हा कार्यकर्ते, नागरिक, शिष्टमंडळे यांच्या गाठीभेटी घेतल्यानंतर दिवसभरातील विविध फाईली पाहण्यास त्यांनी सुरुवात केली. खाजगी सचिव आणि विशेष कार्य अधिकाऱ्यांशी चर्चा करून विविध फाइलींवर त्यांनी निर्णय घेतले. फाइल्सवर निर्णय घेताना इ. छोट्याछोट्या गोष्टी ते समजून घेत होते. सलग साधारण १६ तास काम करूनही त्यांच्या चेहऱ्यावर कुठल्याही प्रकारचा कंटाळा दिसत नव्हता. रात्री साहेबांचा निरोप घेताना एवढे काम न कंटाळता हसतमुखाने व शांतपणे आपण कसे काम करता, हा माझ्या मनात दिवसभर घोळणारा प्रश्न मी सहज विचारला असता, देशमुख साहेबांनी हसतच सांगितले की, पक्षाने मला हे पद जनतेच्या कल्याणसाठी दिले असून या पदावरील माझा प्रत्येक क्षण हा जनतेचा आहे असे मी समजतो व माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सारखेच महत्त्व देऊन त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करतो. त्यामुळे या दिवसभराच्या कामातून मला कुठलाही कंटाळा किंवा थकवा न येता उलट नवीन ऊर्जा मिळते व



दिवसअखेर आपण सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यात आपला खारीचा वाटा उचलला, याचे समाधानही मिळते.

**(लेखक हे विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०७७३८७९३७२२**



# शिवशाही: एसटीचा कायापालट

**महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यातील मराठी जनतेच्या हृदयात श्रद्धेने विसावलेले शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीदिनानिमित्त एसटीने लोकोपयोगी योजनांना सुरुवात केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी सामान्य माणसाच्या आयुष्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थान असणाऱ्या एसटीने कात टाकल्याचे जाहीर केले.**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीदिनानिमित्त आयोजित भावपूर्ण कार्यक्रमामध्ये सामान्य जनतेच्या हितार्थ झटणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांसाठी अनेक महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या. राज्यात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर महाराष्ट्र बदलल्याचा संदेश एसटीमार्फत गावागावांत जाऊ द्या, असे आवाहन या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले तर महाराष्ट्राची रक्तवाहिनी असणाऱ्या एसटीच्या कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजना खऱ्या अर्थाने बाळासाहेबांना आदरांजली ठरतील. सर्वसामान्यांना परवडेल अशा दरात शिवशाही या नावाने सुरू करण्यात आलेली एसटी बस ही केवळ बस न ठरता महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यात शिवशाही अवतरली आहे असा संदेश देणारी लोकवाहिनी ठरो, अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिवाकर रावते यांच्या कल्पनेतून साकारलेल्या या योजनांना शुभेच्छा दिल्या.

नव्या चकचकीत गाड्यांचे लोकार्पण करणाऱ्या या कार्यक्रमाला सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत, उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री रवींद्र वायकर, जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे, ग्रामविकास राज्यमंत्री दीपक केसरकर, खा. अरविंद सावंत, आ. नीलम गोऱ्हे, वारिस पठाण, भाई जगताप, परिवहन व बंदरे विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव गौतम चटर्जी, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल आदींसह मोठ्या प्रमाणात एसटी अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

एसटीच्या कर्मचाऱ्यांनी जनतेप्रती असणाऱ्या दायित्वाला जपत आपला एक दिवसाचा पगार (६ कोटी २६ लाख ३१ हजार ४८९ रुपये) मुख्यमंत्री सहायता निधीला दिला. त्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी यावेळी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी जाहीर केलेल्या लोकोपयोगी योजना या बाळासाहेबांच्या सामान्य जनतेप्रती असणाऱ्या स्नेहाचे प्रतीक असल्याचे ते म्हणाले.


### हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कन्यादान योजना

एस.टी. महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलींच्या आर्थिक भवितव्यासाठी ही योजना सुरू करण्यात येणार असून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलीला तिच्या वयाच्या २१ व्या वर्षी विवाहासाठी रुपये १ लाख दिले जाणार आहेत. या योजनेंतर्गत १ एप्रिल २०१६ पासून पुढे

जन्मास येणाऱ्या कन्यांच्या नावे एसटी महामंडळातर्फे १७ हजार ५०० रुपये इतकी रक्कम मुदत अथवा दामदुप्पट योजनेत एसटीमार्फत बँकेत ठेवण्यात येईल.

## हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अपघात सहायता निधी योजना

या योजनेंतर्गत एसटीच्या अपघातामध्ये मृत झालेल्या व्यक्तीच्या वारसास दहा लाख रुपये, कायमचे अपंगत्व आलेल्या व्यक्तीला पाच लाख रुपये, अंशत: विकलांग झालेल्या व्यक्तीस २ लाख ५० हजार रुपये व तात्पुरते अपंगत्व आलेल्या व्यक्तिस एक लाख रुपये देण्यात येणार आहेत. या योजनेस लागणारा निधी निर्माण करण्यासाठी एसटीमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सरसकट तिकिटावर एक रुपये नाममात्र अधिभार आकारण्यात येणार आहे. एक रुपयात दहा लाखाचा विमा असे योजनेचे स्वरूप आहे.



## हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना

या योजनेंतर्गत आत्महत्याग्रस्त कुटुंबातील कर्ता पुरुष मयत झाल्यास कायमस्वरूपी उपजीविकेचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने परिवहन विभागातर्फे मयत शेतकऱ्यांच्या विधवा महिलांना विशेष बाब म्हणून ऑटोरिक्षा परवाने देण्यात येणार आहेत. तसेच ऑटोरिक्षाकरिता १०० टक्के कर्ज पुरवठा करण्यात येणार आहे. ऑटोरिक्षा परवाना धारकांकडे परवाना व बॅच असणे आवश्यक आहे. तथापि या योजनेद्वारे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवांसाठी ही अट शिथिल करण्यात आली आहे.

## हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अतिविशेषोपचार रुग्णालय

एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्यांना उच्च दर्जाची व अतिविशेष सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी पुणे येथील मध्यवर्ती ठिकाणी महामंडळाचे अद्ययावत रुग्णालय उभारण्यात येणार आहे. या रुग्णालयात सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा, चाचण्या व तपासण्या करण्याची सोय असेल. या रुग्णालयाची उभारणी बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर करण्यात येणार असून १०० खाटांच्या या रुग्णालयामध्ये एसटी महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी २५ टक्के खाटांचे आरक्षण देऊन त्यांना मोफत उपचार देणे बंधनकारक असेल.

## हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मोटार वाहन अभियांत्रिकी महाविद्यालय

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एकूण सुमारे १८ हजार बसेस राज्यभरात विविध मार्गावर प्रवासी वाहतूक करत असतात. दुरूस्ती व देखभालीसाठी राज्यात २५० आगार कार्यशाळा आणि विशेष दुरुस्तीसाठी, बसेस बांधणीसाठी ३ मध्यवर्ती कार्यशाळांची आस्थापना आहे. व्यवस्थापन कोटा राखीव ठेवल्यास या कार्यशाळांमध्ये ऑटोमोबाइल इंजिनिअरची आवश्यकता असून महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना स्वयंचलन अभियांत्रिकीचे शिक्षण देण्यासाठी नवी मुंबई येथील महामंडळाच्या जागेमध्ये ए.आय. सी.टी.ई. च्या निकषानुसार प्रतिवर्षी ६० प्रवेश याप्रमाणे २४० विद्यार्थी क्षमता असलेले स्वयंचलित अभियांत्रिकी ऑटोमोबाइल इंजिनिअरिंग महाविद्यालय वसतिगृहासह उभारण्यात येईल.

## नवीन रिक्षा परवान्यासाठी ऑनलाइन लॉटरीत महिलांना ५ टक्के आरक्षण

राज्य नवीन रिक्षा परवान्यासाठी ऑनलाइन लॉटरीत महिलांना ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले असून महिलांकरिता अबोली रंगाची रिक्षा सुनिश्चित करण्यात आली आहे. परवान्यांसाठी पुरेशा महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास हे परवाने राखीव ठेवून जशा उमेदवार उपलब्ध होतील, तसे त्यांना प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी या तत्त्वावर जारी करण्यात येणार आहेत.

**टीम लोकराज्य**

## 'शिवशाही' बस सेवा

**एसटी महामंडळातर्फे सामान्य जनतेला शिवशाही बस प्रकल्पाद्वारे सुरक्षित आणि सुखकर प्रवास उपलब्ध होणार आहे. सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या व्यवहार्य दरामध्ये ५०० वातानुकूलित बसेस सुरू केल्या जाणार असून या बसेस एप्रिल २०१६ पर्यंत प्रवाशांच्या सेवेसाठी महामंडळाच्या ताफ्यात दाखल होतील. वाढत्या खासगी वाहतुकीला शह देण्यासाठी तसेच प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी या गाड्यांमध्ये अत्यंत आरामदायी आसने, वाचनासाठी दिवे, सीसीटीव्ही कॅमेरे, वाय-फाय, जीपीएस, मोबाइल व लॅपटॉप चार्जर्सची सोय असेल. त्याचबरोबर आसनाला व शयनयानाला ९ इंची एलइडी स्क्रिन असेल. या बसेस मराठवाडा, विदर्भ, कोकणातील प्रवाशांना राज्यातील सर्व प्रमुख शहरांशी जोडतील अशा पद्धतीने वेळापत्रक तयार करण्यात येत आहे.**



# उद्योजकांचे सामाजिक दायित्व




**राज्यातील खासगी, सार्वजनिक कंपन्या आणि वित्तीय संस्था यांचा कंपनी सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून (सीएसआर) सक्रिय पाठिंबा आणि सहभाग मिळवण्यासाठी वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चांगल्या बदलासाठी अमूल्य सहभाग ही संकल्पना घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून उद्योजकांचा सामाजिक दायित्व निधी आणि महाराष्ट्र शासनाच्या विकास कामांचा प्राधान्यक्रम यांची सांगड यातली गेली. अशा प्रकारे आयोजित होणारा हा पहिलाच मोठा शासकीय कार्यक्रम होता.**

**डॉ. सुरेखा मुळे**

'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एके दिवशी देणाऱ्याचे हात घ्यावे' या विंदा करंदीकरांच्या कवितेमधील ओळींना सार्थ ठरवणारा कार्यक्रम अलीकडेच राजभवनात संपन्न झाला. तारीख होती ८ जानेवारी २०१६. राज्यपाल सी. विद्यासागर राव आणि वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून शासनाने राज्यातील खासगी आणि सार्वजनिक कंपन्या आणि वित्तीय संस्था यांना सोबत घेऊन समन्वयाचे एक दमदार पाऊल टाकले, ज्याचे या क्षेत्राकडूनही जोरदार स्वागत झाले.

शासन, खासगी-सावर्जनिक कंपन्या-वित्तीय संस्था यांच्या सहभागातून विविध क्षेत्रातील अपेक्षित विकास कामांच्या पूर्ततेसाठी करावयाच्या संयुक्त प्रयत्नांचा भाग असलेला हा कार्यक्रम त्यामुळे लक्षवेधी ठरला.

### मागे वळून पाहताना...

अलीकडच्या काळात खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग जगताला कायद्याने सामाजिक दायित्व निधीचे बंधन घालण्यात आले असले तरी फार पूर्वीपासून महाराष्ट्रात विविध नामवंत व्यक्ती, संस्था आणि उद्योजकांनी या क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्याचे पाहायला मिळते. माहीम आणि बांद्र्याला जोडणारा माहीम कॉजवे हा १८४५ मध्ये जमशेटजी जीजूभाय यांच्या पत्नी लेडी जमशेटजी यांनी दान केलेल्या भल्यामोठ्या रकमेतून बांधला गेला होता. मुंबईतील जे जे हॉस्पिटल, जे जे स्कूल ऑफ आर्टस, गेट वे ऑफ इंडिया, डेविड ससून लायब्ररी, द मसिना हॉस्पिटल, पुण्याचे ससून हॉस्पिटल यांसारख्या अनेक वास्तूंबरोबर अनेक शाळा, रुग्णालये आणि निराधार मुलांची बालगृहे या सामाजिक दायित्व निधीतूनच उभी राहिल्याचे दिसते.

### वनविंडो सीएसआर सेल

राज्यपालांनीही तसा उल्लेख आपल्या भाषणात केला. राज्यातील सीएसआर प्रकल्पांना गती देण्यासाठी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सिंगल विंडो सीएसआर सेल स्थापन करण्याची सूचना त्यांनी शासनास केली. सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करा असे सांगताना राज्यपालांनी घनकचरा-सांडपाणी व्यवस्थापन, नद्यांची स्वच्छता, नवीकरणीय ऊर्जास्रोतांचा विकास यासारख्या क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचे असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी शासनाच्या जलयुक्त शिवार सारख्या योजनेत खाजगी-सार्वजनिक उद्योग क्षेत्राने आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनदेखील केले.

### उद्योगजगताला संपूर्ण सहकार्य

राज्यातील सीएसआर प्रकल्पांसाठी मुख्यमंत्री कार्यालयात विशेष कार्य अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाईल. हा अधिकारी शासन आणि उद्योगजगत यांच्यामधील दुवा म्हणून काम करील असे मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले. सामाजिक दायित्व निधी कार्यक्रमांतर्गत उद्योग जगताकडून जे प्रस्ताव शासनाकडे सादर होतील त्यावर तातडीने निर्णय घेतले

जातील, त्यासाठी उद्योगजगताला अपेक्षित असलेले सर्व सहकार्य राज्य शासनाकडून दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. ते म्हणाले की, उद्योगजगत आजही राज्यात सीएसआर कार्यक्रमांतर्गत अनेक लोकोपयोगी काम करत आहे. त्यांचे हे काम अधिक प्रभावीपणे होण्यासाठी आणि दिशादर्शक ठरण्यासाठी आयोजित केलेला हा कार्यक्रम निश्चित उपयुक्त ठरेल. सीएसआर प्रकल्पांसाठी राज्यात एक स्वतंत्र संकेतस्थळ सुरू करण्यात येऊन या संकेतस्थळावर शासनाच्या प्राधान्यक्रमातील सीएसआर प्रकल्पांची माहिती उद्योगजगताला उपलब्ध करून दिली जाईल.

### सीएसआर निधी मिळवण्यात महाराष्ट्र अग्रेसर

या कार्यक्रमासाठी केपीएमजी संस्था ही सहभागी नॉलेज पार्टनर संस्था म्हणून काम करत होती. त्यांनी सादर केलेल्या सीएसआर २०१५ या अहवालानुसार महाराष्ट्र हे देशातील इतर १० राज्यांच्या तुलनेत सीएसआर निधी मिळवणारे प्रथम क्रमांकाचे राज्य असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### खर्चनिधीवर एक नजर

महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी या क्षेत्राचे योगदान खूप मोठे आहे. असे असले तरी अहवालातील काही बाबी या विशेष लक्षात घेण्यासारख्या आहेत. सर्वेक्षण केलेल्या मोठ्या १०० पैकी ८७ कंपन्यांनी देशात सीएसआर निधींतर्गत २०१४-१५ मध्ये ६४९० कोटी रुपये खर्च करणे अपेक्षित होते. त्यापैकी ५११५ कोटी रुपयांचा निधी विविध प्रकल्पांवर खर्च झाला आहे, तर एकूण खर्चापैकी जवळपास ५० टक्के निधी शिक्षण आणि आरोग्याच्या क्षेत्रात खर्च झाला आहे.

### कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यात योगदान द्यावे

वित्त मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सामाजिक दायित्व निधी खर्च करताना ज्या जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक कमी आहे त्या जिल्ह्याकडे खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या आणि वित्तीय क्षेत्राने अधिक लक्ष देण्याची गरज आहे. तसे झाल्यास तेथील स्थानिक गरजांची पूर्तता होऊन खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विषमतामुक्त समाजाचे स्वप्न साकार होईल. वित्तमंत्र्यांनी उद्योगजगताच्या दातृत्वाचा यावेळी गौरव केला. ते म्हणाले की, कष्ट करून पैसा कमावणे आणि तो स्वत:साठी खर्च करणे हा माणसाचा स्वभाव आहे. पण स्वत: कमावलेले पैसे इतरांसाठी खर्च करणे ही आपली संस्कृती आहे. उद्योगजगताने ही संस्कृती नेहमीच जपली आहे असे सांगताना, त्यांनी उत्तम आरोग्यासाठी उत्तम पर्यावरण आवश्यक असल्याचेही सांगितले. वृक्ष लागवड, कौशल्य विकास, अंगणवाड्यांचा विकास, स्वच्छता, यासारख्या कार्यक्रमात ही उद्योगजगत सीएसआर प्रकल्पांतर्गत उत्तम योगदान देऊ शकते. राज्यात जवळपास ९७ हजार अंगणवाड्या आहेत त्यांना स्मार्ट आणि डिजिटलाइजड करण्याचा शासनाचा प्रयत्न असून या कामातदेखील उद्योगजगताने योगदान द्यावे, अशी अपेक्षा वित्तमंत्र्यांनी व्यक्त केली.

अशा कार्यक्रमांचा प्राधान्यक्रम निश्चित करून व्यापक जनहितासाठी हे प्रकल्प खाजगी-सार्वजनिक क्षेत्रास उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मंत्रालयात सामाजिक दायित्व कक्ष स्थापन केला आहे.

**(लेखिका या विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)**

MAHA CSR 2016

COLLABORATING FOR CHANGE

### असा हवा सहभाग

- स्वच्छ भारत अभियान (नागरी- नगर विकास विभाग- स्वच्छ महाराष्ट्र- घरगुती/ सामुदायिक/ सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम, ग्रामीण-पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग- दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी शौचालय, बंद शौचालयांचे कार्यान्वयीकरण).
- घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन - (नागरी- नगर विकास विभाग, ग्रामीण- ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग. ग्रामपंचायतस्तरावर घनकचरा व्यवस्थापन- कचराकुंडी, घंटागाडी, गांडूळ खत, कुंड पुरवठा, घरगुती सांडपाणी व्यवस्थापन (टेंभुर्णी-नांदेड पॅटर्न))
- वन संवर्धन- वन आणि पर्यावरण विभाग
  वनांखाली क्षेत्र २० टक्क्यांहून वाढवून ३३ टक्क्यांपर्यंत नेणे
  व्याघ्र व वन्यजीव संरक्षण आणि संवर्धन
  कांदळवनांचे (खारफुटी)संवर्धन, किनाऱ्यावरील शाश्वत उपजीविकेकरिता साहाय्य, धोक्यात आलेल्या सागरी प्राणी प्रजातींचे संवर्धन
  बिगर वन व अवनती झालेल्या वनजमिनींमध्ये पुनर्वनीकरण करण्याकरिता त्रिपक्षीय करार
- अंगणवाडी विकास- महिला व बालविकास विभाग
  स्मार्ट अंगणवाडी, ई-लर्निंगची सुविधा, महिला सबलीकरणाकरिता कौशल्य विकास कार्यक्रम, महिला मनुष्यबळ सुदृढ व निर्णयक्षम बनविणे
- कौशल्य विकास- कौशल्य व उद्योजकता विकास विभाग
  कौशल्य विकासाकरिता पूरक निधी पुरवठ्यात भागीदारी
  उद्योजकता आणि स्वंयरोजगार- प्रशिक्षणार्थींना टूल किटस पुरवणे
  नोकरी मेळावे, कॅम्पस इंटरव्हयू इ. चे आयोजन
  कौशल्य विकास संस्थांचा दर्जा उंचावणे
  कौशल्य विकास संस्थांमधील प्रशिक्षण शाखातील बळकटीकरण करण्यासाठी अद्ययावत यंत्रसामूग्रीचा पुरवठा करणे
  पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे जसे वसतिगृहाचे नूतनीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय
- नवीकरणीय ऊर्जा-ऊर्जा विभाग
  वृद्धाश्रमामध्ये सौर पंप स्थापित करणे
- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
  वारसास्थळे, स्मारके दत्तक घेणे, जतन करणे
- आदिवासी क्षेत्रात मोबाइल कनेक्टिव्हिटीमध्ये सुधारणा करणे- माहिती व तंत्रज्ञान विभाग
- आदिवासी क्रीडा अकादमी- आदिवासी विकास विभाग
  आदिवासी महोत्सव साजरा करणे



# ...रायगडाला जेव्हा जाग येते

अनिरुद्ध अष्टपुत्रे

राष्ट्रीय महामार्गावर जिथे एक रस्ता महाड शहरात जातो त्याच्या विरुद्ध दिशेला आहे नातेखिंड जी आपल्याला थेट घेऊन जाते रायगडाच्या पायथ्याशी पाचाड गावापर्यंत. दुर्गप्रेमींचे जथ्येच्या जथ्ये मिळेल त्या वाहनांनी, चालत, धावत रायगडाच्या दिशेने जाताना दिसत होते. एरव्ही किल्लेप्रेमींसाठी रायगड नवीन नाही पण एरव्ही मी बघितलेल्या या गर्दीत रायगडाला पहिल्यांदाच भेट देणारे बरेच जण होते. आणि का असणार नाही? रायगड महोत्सवाच्या घोषणेपासून केवळ शिवप्रेमीच नव्हे तर पार इतिहास संशोधकांपासून ते विद्यार्थी, आसपासचे ग्रामस्थ, देशविदेशातील दुर्गप्रेमी या घोषणेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची वाट पाहत होते. केवळ १० महिन्यात हे प्रत्यक्ष साकारून राज्य सरकारने देशात कुठेही झाला नाही असा नावीन्यपूर्ण सोहळा घडवून, छत्रपतींना मानवंदना दिली आणि एका अभूतपूर्व अनुभूतीला सुरुवात झाली.

रायगडाच्या पायथ्याशी रोपवे बेस स्टेशनला आपला नंबर कधी येईल याची वाट पाहत बसलेले एक जोडपे आणि त्यांचा मुलगा चुळबुळ करीत बसले होते. किल्ल्यावर होणाऱ्या बहारदार कार्यक्रमांसाठी सहभागी होणारे कलाकार पहिल्यांदा रोपवेने जाणार होते. त्यात काही तलवारी- ढाली- भाले सांभाळणारे मावळे होते तर काही सजूनधजून जाणाऱ्या महिला कलाकार यांची गर्दी होती. हे जोडपे ट्रेकिंगमध्ये रुची ठेवणारे पण त्यांना जायचे होते रोपवेने. सहज त्यांना या महोत्सवाविषयी विचारले तर ते म्हणाले, 'देशात अशा पद्धतीचा महोत्सव बहुधा पहिल्यांदाच साजरा होतोय. आम्हाला गडकिल्ल्यांची खूप आवड आहे. रायगडही एक दोनदा चढलोय पण प्रत्यक्ष शिवकालीन इतिहास किल्ल्यावर बघायला आणि अनुभवायला मिळणार आहे म्हणून आम्ही खास सुट्टी टाकून आलोय.' खरोखरच, रायगड हा काही आपल्यासाठी नवा नाही. कुठल्या न कुठल्या निमित्ताने आपण रायगड पहिला आहे पण त्या काळातील वातावरण कसे होते त्याची नुसती कल्पनाच आपण आतापर्यंत केली होती. विशेष म्हणजे हा आगळावेगळा महोत्सव घडवण्यात भारतीय पुरातत्त्व खात्याची मोठी भूमिका आहे. त्यांनी सर्व आवश्यक असणाऱ्या विविध परवानग्या त्वरित दिल्या आणि राज्याच्या सांस्कृतिक विभागाला असा वैशिष्ट्यपूर्ण महोत्सव आयोजित करणे सोपे झाले.

रोपवेमध्ये बसल्यावरही किल्ल्यावर पोहोचायला जो काही ५-७ मिनिटांचा अवधी लागला तेवढ्या वेळात किल्ल्यावर कसे वातावरण असेल त्याची चित्रे डोळ्यासमोर आली. तसेच होते सगळे काही. अपेक्षेपेक्षाही नयनरम्य आणि अविस्मरणीय वातावरण पाहून मन स्तिमित

होऊन गेले. हिवाळ्याचे दिवस असल्याने आणि सकाळची वेळ असल्याने थंड हवेच्या झुळका मन एकीकडे प्रसन्न करीत होत्या तर दुसरीकडे जणू काही आपण शिवरायांच्या काळात प्रत्यक्ष त्यांच्या दरबारात आलो आहे या भावनेने ते उत्कटही होत होते. महादरवाजा सुंदर सुंदर फुलांनी नटविला होता. त्यावर भगवे झेंडे डौलाने फडकत होते. सभामंडप, राणीवसा, अष्टप्रधान मंडळ, बाजारपेठ, होळीचा माळ, समाधिस्थळ... जिकडे पाहावे तिकडे मावळ्यांच्या वेशातील सैनिक आणि शिवकालीन भरजरी पोशाखानी नटलेल्या स्त्रिया दिसत होत्या. रायगडावरील बाजारपेठ तर वैशिष्ट्यपूर्ण आहे. घोडेस्वरांना घोड्यावरून न उतरता वस्तू खरेदी करता याव्यात या हेतूने उंचच्या उंच ओटे असलेल्या या बाजारात त्या काळातल्या घोंगड्या, कंदील, शस्त्रे, लाकडी, बांबूचे सामान असे मांडून ठेवलेले साहित्य सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. सभामंडपही खुलला होता. त्या काळातील आसने, त्यावर विराजमान पेहरावातली मंडळी, विविध ठिकाणी शिवस्तुती गाताना शाहीर, वासुदेव, भारुडकर आणि गोंधळी...आणि हे सगळे ज्याच्यासाठी चालले आहे त्या सिंहासनावर आरूढ छत्रपती शिवरायांच्या हुबेहूब भूमिकेतील अमोल कोल्हे हा गुणी कलावंत! किल्ल्याचा प्रत्येक भाग शिवकालीन राजवाड्याचा वैभवी इतिहास कथन करीत होता.

शिवराज्याभिषेकाचा सोहळा पाहताना तर गडावरील प्रत्येकाच्या डोळ्याचे पारणे फिटले. गडावर फिरून हे सगळे पाहायला ३-४ तास लागले तरी थकवा कुठेही जाणवत नव्हता. मध्येच एखाद्या तटबंदीशेजारी एखादा पोतराज दिसे तर दुसरीकडे वारकऱ्यांची दिंडी जाताना पाहायला मिळे. कुठे ढोलताशा आणि तारपा नृत्य तर कुठे कव्वालीची मैफिल. शिवकाळ हुबेहूब जागवला होता नितीन देसाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी.

फुलांनी सजवलेली मेघडंबरी आणि त्यातील सिंहासनावर आरूढ शिवरायांची मूर्ती आज नेहमीपेक्षा अधिक तेज:पुंज वाटत होती. त्यांच्या डोळ्यासमोरचा विस्तीर्ण माळ त्यांच्या आयुष्यातले रायगडावरचे प्रसंग जिवंत करीत होता!

रायगडावर हा सगळा उत्साह कमी आहे की, काय असा जल्लोष



पायथ्याशी पाचाड गावात उभारलेल्या शिवसृष्टीमध्ये सुरू होता. भेट देणाऱ्या उत्साही शिवप्रेमींना रायगड किल्ल्यावर जावे की आधी ही शिवसृष्टी पाहावी अशी द्विधावस्था झाली होती. या ठिकाणीदेखील शिवकालीन जीवनाची प्रतिकृती उभारण्यात आली होती. गवताने




शाकारलेल्या झोपड्या, मंदिरे, दरवाजे, आतील रस्ते, यातून फिरताना आपण त्याकाळातल्या एखाद्या खेड्यातून फिरतोय असा भास होत होता. या झोपडीवजा दालनांमध्ये अनेक शासकीय विभागांची दलाने होती. त्यात माहिती व जनसंपर्कचे लोकराज्य दालन होते, मराठी भाषा, पुरातत्त्व खाते, एमटीडीसी, सांस्कृतिक कार्य, पुराभिलेख अशी रेलचेल होती. शिवकालीन किल्ल्याच्या प्रतिकृती, नाण्यांचा संग्रह पाहून विशेषत: विद्यार्थी अचंबित होत होते. पोलादपूरच्या एका शाळेची सहल तिथे आली होती. त्यातला एक मुलगा जे म्हणाला ते अतिशोयक्ती वाटले तरी खरे होते. तो म्हणाला की, 'इतिहासाच्या पुस्तकात शिवाजीचा नुसता धडा होता पण इथे आल्यावर आम्हाला प्रत्यक्ष शिवरायांना भेटल्याचा आनंद मिळाला, धड्यातील शिवाजी महाराज जिवंत झाले.' इथेही एक भव्य व्यासपीठ उभारून तिथे कीर्तन, पोवाडा, मुलाखती, प्रश्नमंच, संध्याकाळी शिवराज्याभिषेक सोहळा असे कार्यक्रम आखले होते. सकाळी १० ते रात्री १० ही शिवसृष्टी शिवमय होऊन जाईल याची पुरेपूर व्यवस्था आयोजकांनी केली होती.

शिवसृष्टीच्या बाहेर सुमित्राबाई नावाची आजी टेबल टाकून दोसा आणि चटणी विकतांना दिसली. आम्ही विचारले, 'बाई तुम्ही इतर काही गावरान पदार्थ ठेवण्याऐवजी दोसा कसा ठेवला' आणि काही विकला जातोय का? तर त्यावर ती म्हणाली, 'आज आठ दिवस झाले पाहा, इथे सगळेच हाटीलवाले झुणका भाकर ठिवतात. मी आणि सुनेने ठरिवल काहीतरी अलग करायचं. ती दोसा चांगला बनिवती. २० रुपयाला प्लेट हाय. दिवसाला ७०-८० प्लेटा जातात. धा बारा हजाराची कमाई झाली बगा. आता रविवारम्होतूर जास्तच होईल.' आम्ही चकित झालो. उद्घाटनाच्या दिवशी सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे नेमके हेच म्हणाले होते. हा महोत्सव एकीकडे शिवरायांची थोरवी जगभर पोहचवणार आहे. दुसरीकडे यानिमित्ताने पर्यटन व्यवसाय वाढून आसपासच्या गावांमधील लोकांसाठी आर्थिक उन्नतीचे साधन देणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर एक मिशन म्हणून गड किल्ल्याचे संवर्धन हाती घेणार असल्याचे सूतोवाच केल्याने ही गड किल्ल्यांची संपत्ती खऱ्या अर्थाने समाजाच्या विकासाला कारणी लागणार आहे. एकीकडे शिवकालीन महान इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आणि दुसरीकडे पर्यटनाला चालना देऊन सर्वसामान्यांच्या जीवनमानाचा स्तर वाढवणे या दोन गोष्टी साध्य झाल्या तर रायगडाला खऱ्या अर्थाने जाग आली असेच म्हणावे लागेल.


**(लेखक हे कोकण विभागाचे प्रभारी माहिती उपसंचालक आहेत.)**
**संपर्क : ०९३२३९७६२३१**



# संधी इतिहासात डोकावण्याची

**शिवकालीन संस्कृतीचा चैतन्यदायी इतिहास नव्या पिढीसमोर यावा आणि सर्वांचे प्रेरणास्थान असलेले शिवाजी महाराज यांच्या शौर्याचा आणि व्यवस्थापनाचा इतिहास सर्व जगासमोर पोहोचावा या दृष्टीने राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे २१ ते २४ जानेवारी, २०१६ दरम्यान रायगड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवामुळे रायगड जगाच्या पर्यटनाच्या नकाशावर आला...या महोत्सवाविषयी सांगत आहेत सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे....**

वर्षा फडके

**रायगड महोत्सव' हा नेमका कशाचा महोत्सव होता ?**

छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास सर्व जगापुढे यावा यासाठीच रायगड किल्ल्यावर आणि किल्ल्याच्या पायथ्यापाशी रायगड महोत्सव' आयोजित करण्यात आला होता. रायगडावर शिवकालीन वातावरण तयार करण्यात येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या सक्षम नेतृत्वातील महाराष्ट्राचे वैभव याठिकाणी प्रत्यक्ष साकारून भारतीय इतिहास व ऐतिहासिक वास्तूंची गौरवशाली परंपरा सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आम्ही केला.

**या महोत्सव आयोजनामागचा हेतू काय होता ?**

२१ ते २४ जानेवारी २०१६ या दरम्यान रायगड किल्ल्यावर आणि रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी विविध उपक्रमांचा समावेश असलेला रायगड माहेत्सव आयोजित करण्यात आला. दिनांक २१ जानेवारी



रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन झाले. त्यानंतर २२ ते २४ जानेवारी २०१६ दरम्यान हा महोत्सव सर्व जनतेसाठी खुला होता आणि या तीन दिवसात सुमारे १ लाख पर्यटकांनी या महोत्सवाला भेट दिली. शिवाजी महाराजांचे शौर्य शिवकालीन इतिहास रायगडावर पुन्हा एकदा जिवंत करण्याचा आमचा या महोत्सवाच्या माध्यमातून प्रयत्न यशस्वी झाला आहे असे मी म्हणेन.... या महोत्सवामुळे भारतीय इतिहास व ऐतिहासिक वास्तूंची गौरवशाली परंपरा सामान्यांपर्यंत पोहोचवण्यात आली.

### अन्य महोत्सवापेक्षा या महोत्सवाचे वेगळे वैशिष्ट्य काय आहे?

रायगडाच्या पायथ्याशी पाचाड येथे शिवसृष्टी उभारण्यात येणार असून तेथे शिववैभवाचे दर्शन घडवणारे अनोखे गाव वसवण्यात आले होते. या ठिकाणी शिवराज्याभिषेक सोहळा, शिवकालीन लोककला, कथाकथन तसेच शिवाजी महाराजांची गुणवैशिष्ट्ये उलगडून दाखवणारे कार्यक्रम सादर करण्यात आले. या महोत्सवामुळे इतिहासाची अनुभूती फक्त महाराष्ट्र आणि देशाच्या नव्हे तर जगाच्या पर्यटकांपर्यंत पोहोचेल, जेणेकरून ऐतिहासिक रायगड जगाच्या नकाशावर दिमाखदारपणे उमटेल असा मला विश्वास वाटतो. या महोत्सवादरम्यान संपूर्ण किल्ल्यावर पताका, माळा, अब्दगिरी, रांगोळ्या, विविध प्रतिकृती, मुखवटे, शिल्प आदींच्या साहाय्याने विविध ठिकाणी सजावट करण्यात आली होती.

### या महोत्सवासाठी काही विशेष तयारी करण्यात आली आहे का?

कलाकार तसेच पर्यटकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष काळजी घेण्यात आली होती. कलाकार आणि अन्य तांत्रिक साहाय्य करणाऱ्या अत्यावश्यक कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय करण्यात आली असून पर्यटकांसाठी विशेष बससेवा, आरोग्य सुविधा, स्वच्छतागृह, सुरक्षाव्यवस्था तसेच चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

### रायगड महोत्सवासाठी काही विशेष वेळेचे बंधन होते का ?

रायगड किल्ल्यावर सकाळी ९ पासून संध्याकाळी ५ पर्यंत महादरवाजा, सभामंडप, राणीवसा, अष्टप्रधान मंडळ, बाजारपेठ, होळीचा माळ, समाधिस्थळ या ठिकाणी शिवकालीन सजावट करण्यात आली होती. शाहीर, वासुदेव, भारूडकर आणि गोंधळी शिवस्तुती या वेळी सादर करण्यात आल्या. शिववैभवाचे दर्शन घडवणाऱ्या शिवसृष्टीत शिवराज्याभिषेक सोहळा, शिवकालीन नाणी प्रदर्शन, किल्ल्यांच्या प्रतिकृती, छत्रपती शिवाजी महाराजांच्या हस्ताक्षरातील पत्रे, इतिहास तज्ज्ञांच्या व्याख्यानमाला, लोककलांचे दर्शन, ढोलताशांची आतषबाजी, शिवकालीन कथांचे कथाकथन उलगडून दाखवणारे दृकश्राव्य कार्यक्रम, पालखी, कीर्तन, भारूड, गोंधळ असे सोहळे आयोजित करण्यात आले.

(लेखिका या विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)
संपर्क: ०९८६९३०४८४७




### रायगड महोत्सवामुळे काय साध्य झाले?

रायगड महोत्सवाच्या निमित्ताने एक नवा अध्याय सुरू झाला याचा मला अभिमान आहे. देशविदेशातील पर्यटकांना रायगडचा गौरवशाली इतिहास कळावा हा या महोत्सवामागचा उद्देश होता आणि तो उद्देश साध्य झाला आहे. राज्यातील गडकिल्ल्यांचे वैभव परत आले पाहिजे अशी माझी भूमिका असून यासंदर्भात केंद्रीय पुरातत्त्व विभागाचे मंत्री महेश शर्मा यांच्यासमवेत माझा पाठपुरावा सुरू आहे.



### गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी शासन काय करते आहे?

राज्याचे वैभव आणि इतिहासाची साक्ष असलेले गडकिल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. गडकिल्ल्यांचे वैभव परत मिळवून देण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे. गडकिल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांना मार्गदर्शन व्हावे, यासाठी पर्यटन केंद्र सुरू कण्यात येणार आहे.

# नियम पाळा, संकट टाळा

**वाहतूक सुरक्षिततेचे नियम न पाळणारे स्वत:बरोबर इतरांनाही संकटात टाकतात. अशा वेळी आपण वाहतुकीचे नियम पाळले तर जीवितहानी टाळता येते. याचा अनुभव परिवहन मंत्री दिवाकर रावते यांना नुकताच आला. त्यांच्या वाहनाला समोरून भरधाव येणारी चारचाकी धडकली. मात्र वाहतुकीचे नियम पाळल्यामुळे त्यांना इजा झाली नाही. रस्ता सुरक्षा पंधरवड्याच्या निमित्ताने या प्रसंगाविषयी तसेच परिवहन विभागाच्या अभियानाविषयी सांगताहेत परिवहन मंत्री दिवाकर रावते...**

**वाहतूक नियम पाळल्याचा झालेला फायदा तुमच्या अनुभवावरून कसा सांगाल?**

अलिकडेच माझी गाडी सेनापती बापट मार्गावरील उड्डाण पुलावरून एका दिशेने जात होती. समोरून येणारे वाहन अचानक तितक्याच वेगात ९० अंशात वळले आणि माझ्या गाडीसमोर आले. माझी गाडी जाऊन त्या वाहनावर आदळली त्या वाहनाच्या चालकाला कारण विचारले तर तो म्हणाला मी गाडी वळवली नाही, आपणहून वळाली. मी मोबाइलवर बोलत होतो. अचानक मोबाइल हातातून सुटून गाडीत खाली पडला. तो उचलायला गेलो तर हात अडकला. तो काढत असताना हिसका बसला आणि दुसऱ्या हाताने पकडलेले स्टेअरिंग अचानक वळले. माझी कार तुमच्या वाहनासमोर आडवी आली आणि अपघात झाला. त्याने वाहन चालवताना मोबाइलवर बोलून वाहतूक नियमाचा भंग केला आणि अपघात घडला. पण मी सीट बेल्ट बांधला होता. माझी गाडी त्याच्या वाहनावर आदळल्यानंतर एअरबॅग्ज फुटून बाहेर आल्या आणि मी वाचलो. म्हणजे वाहतूक नियमांचे पालन नाही केले तर काय होते आणि वाहतूक नियमांचे पालन केले तर काय होते, हे या उदाहरणावरून दिसून येते. मला एवढेच सांगायचे आहे की, वाहतूक नियमांचे पालन करा, कारण तुमच्या-माझ्या घरी आपली कुणी तरी वाट पाहतेय.

**राज्यात नुकताच रस्ता सुरक्षा पंधरवाडा साजरा झाला. एकूणच या अभियानाकडे आपण कसे बघता?**

दिनांक १० जानेवारी ते २४ जानेवारी २०१६ या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान राज्यभर राबवले. पण हा विषय फक्त पंधरवड्यापुरता महत्त्वाचा नाही तर जीवनभरासाठी महत्त्वाचा आहे. या वर्षी केंद्र शासनाने अभियानासाठी 'टाइम फॉर ॲक्शन' हे घोषवाक्य दिले आहे. म्हणजे आता रस्तासुरक्षेवर फक्त विचार नाही प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आलेली आहे.

**अलीकडे तुम्ही रस्ता सुरक्षिततेसंदर्भात खूप कडक धोरणे अवलंबिली आहेत. ती कोणती?**

हो रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने वाहन चालवताना होणाऱ्या गुन्ह्यांसाठी आम्ही कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. विहित मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालवणे, लाल सिग्नल ओलांडून पुढे जाणे, मालवाहू वाहनातून क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करणे, मालवाहू वाहनातून प्रवासी वाहतूक करणे,दारू पिऊन किंवा अंमलीपदार्थाचे सेवन करून वाहन चालवणे आणि वाहन चालवतांना मोबाइलचा वापर करणे या



गुन्ह्यांसाठी पूर्वी चालकांना फक्त दंड भरावा लागायचा आता त्यांचा परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित केला जाईल. शिवाय मद्यपान करून किंवा अमलीपदार्थाचे सेवन करून वाहन चालवणाऱ्या व्यक्तीच्या पहिल्या गुन्ह्यासाठी आम्ही न्यायालयाकडे कैदेची मागणी करणार आहोत.

**हेल्मेट सक्तीचा निर्णयही आपण घेतला आहे.**

हेल्मेट न घालणाऱ्या तसेच सीट बेल्ट न बांधणाऱ्या वाहनचालकांना यापुढे त्यांच्या गुन्ह्यासाठी किमान २ तासाच्या कालावधीसाठी समुपदेशनासाठी उपस्थित राहावे लागणार आहे. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात या सगळ्या वाहतूक नियमांचे पालन होत आहे की नाही हे पाहण्यासाठी परिवहन विभागाची ४०पथके रस्त्यावर उतरली आहेत.

**या कार्यवाहीचे आतापर्यंतचे फलित काय?**

परिवहन विभाग आणि पोलिसांच्या वतीने दि. ६ ते १५ जानेवारी २०१६ या कालावधीतील संयुक्त तपासणी मोहिमेत २१०७ वाहनचालकांचे परवाने निलंबित केले. या मोहिमेदरम्यान मालवाहू वाहनांतून क्षमतेपेक्षा जास्त भाराचा माल वाहून नेणाऱ्या ४५०, प्रवासी वाहनातून माल वाहतूक करणाऱ्या १४, अवैधप्रवासी वाहतूक करणाऱ्या ३१७, वाहन चालवताना

मोबाइलचा वापर करणाऱ्या १८५, सीट बेल्ट न वापरणाऱ्या ५७५, वाहन चालवताना हेल्मेट न वापरणाऱ्या२०८७, वाहन अति वेगाने चालवणाऱ्या १६ आणि सिग्नल तोडणाऱ्या ९१५ वाहन चालकांवर विभागाने कारवाई केली आहे. या मोहिमेत दोन दिवसात एकूण ३९ लाख ८६ हजार ४२७ रुपयांचा दंडही वसूल केला आहे.

**कायद्याच्या धाकाने वाहतूक नियमांचे पालन होईल?**

असे मानणारा मी नाही. कायद्याच्या धाकापेक्षा मानसिकता बदलण्याची खरी गरज आहे. रस्तासुरक्षा हा विषय तुमच्या–माझ्यासाठी, कुटुंबासाठी महत्त्वाचा आहे. पण लोक या गोष्टीला महत्त्व देताना दिसत नाहीत. मग कायद्याचा धाक हा दाखवावाच लागतो. खरे तर मला या मोहिमेमध्ये शून्य गुन्हे नोंदवले जावेत असे वाटते, असे झाल्यास सर्वात आनंदी होणारा पहिला मी असेन. जनतेने जर हे मनावर घेतले आणि वाहतूक नियमांचे पालन केले तर आपण अपघातांची संख्या नक्कीच कमी करू शकू.



**परिवहन विभाग आता ऑनलाइन होतो आहे म्हणे...**

हो. आता वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि दंडाला पात्र झालेल्या व्यक्तीला त्याची दंडाची रक्कम ऑनलाइन किंवा डेबिट किंवा क्रेडिट कार्डच्या माध्यमातून भरता येईल. अशी सुविधा सध्या मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात उपलब्ध करून दिली आहे. यासाठी वाहतूक पोलीसाकडे ई–चलन भरता येईल, अशा जवळपास ११ हजार मशिन्स आम्ही दिली आहेत. तुम्ही जर वाहतूक नियमांचा भंग कराल तर ई–चलन भरताना तुमचा परवाना क्रमांक या मशिनच्या माध्यमातून नोंदवला जाईल. भविष्यात जर तुम्ही पुन्हा असाच गुन्हा केला तर तुमच्या गुन्ह्यांची संख्या यात नोंदवली जाईल. तुम्ही कितीदा वाहतूक नियमांचा भंग केला हे यातून समोर येईल. लक्षात ठेवा सातत्याने गुन्हा होताना आढळल्यास तुमचा परवाना कायमस्वरूपी रद्द होऊ शकतो. खिशात डेबिट किंवा क्रेडिट कार्ड नसेल तर नियम मोडणाऱ्याला १५ दिवसांची मुदत दिली जाईल. या कालावधीत नियम मोडणाऱ्या चालकाने नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स फंड ट्रान्सफरच्या माध्यमातून बँकेतून दंडाचे पैसे वळते करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**राज्यातील आणि देशातील अपघातांमागच्या कारणांबद्दल काय सांगाल..**

देशातील अंदाजे १४.३८ कोटी वाहनांपैकी महाराष्ट्रात १.७५ कोटी वाहने आहेत. तसेच २०१४–१५ मध्ये भारतात १.३८ लाख अपघात झाले त्यापैकी ६१,८९० अपघात महाराष्ट्रात झाले आहेत. या अपघातात १२१९४ व्यक्ती मरण पावल्या, ४१,१०६ व्यक्ती जखमी झाल्या. जर मरण पावलेल्या व्यक्तींच्या वयाकडे पाहिले तर यातील जास्तीत जास्त लोक हे २५ ते ४० वयोगटातील होते, कुटुंबातील कर्ती आणि कमावती माणसे होती ती. एखादी व्यक्ती अपघातात मरण पावते किंवा जखमी होते तेव्हा त्या कुटुंबाचेच नाही तर समाजाचे आणि राष्ट्राचेही मोठे नुकसान होत असते.

**शब्दांकन : डॉ. सुरेखा मुळे**



**@मुंबई : 'अल्को बूथ'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण**

मुंबई शहरात होणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी हॉटेल, बार व पबमधील ग्राहकांनी मद्यप्राशन केल्याचे स्वयंस्फूर्तीने तपासणी करण्यासाठी तयार केलेल्या 'अल्को बूथ'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.



**@जालना : चित्रपदर्शनातून जनजागृती**

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीतर्फे आयोजित रस्ता सुरक्षा चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. 'रस्ता सुरक्षा काळाची गरज' हे यंदाचे या अभियानाचे ब्रीदवाक्य आहे. चित्र प्रदर्शनामध्ये रस्ता सुरक्षेच्या अनुषंगाने वाहन चालवताना घ्यावयाची काळजी या संदर्भातील सचित्र पोस्टर्स लावण्यात आले होते.

**@सांगली : महिलांनी काढली मोटरसायकल रॅली**



रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत सांगलीत काढण्यात आलेली महिलांची मोटर सायकल रॅली सर्वांचे आकर्षण ठरली. राजर्षी शाहू संस्थेने यासाठी पुढाकार घेतला. महिला व महाविद्यालयीन युवतींनी या फेरीत सहभागी होऊन वाहतूक नियम पाळण्याचा संदेश दिला. सर्वच महिलांनी हेल्मेट परिधान केले होते. महिलांची मोटरसायकल रॅली हा एक आगळावेगळा अनुभव होता.



**@अमरावती – चित्र प्रदर्शनातून उद्बोधन**

पोलीस आयुक्त कार्यालयाच्या वतीने आयोजित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन पालकमंत्री प्रवीण पोटे यांच्या हस्ते करण्यात आले. चित्र प्रदर्शनातून वाहतुकीचे नियम पाळण्याचे संदेश दिले गेले.

# शहरे स्वच्छ होत आहेत...

**महाराष्ट्र स्वच्छ अभियानांतर्गत विविध नगरपालिकांमध्ये अतिशय उत्साहाने अभियान राबवण्यात येत आहे. यामध्ये लोकसहभाग मोठ्या प्रमाणावर घेतला जात आहे. त्याचे दृश्य परिणाम आता उत्तमरीत्या दिसत असून अनेक शहरे कचरामुक्त आणि हागणदारीमुक्त झाली आहेत. या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील देवळाली, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल आणि पन्हाळा या नगरपरिषदांनी केलेले कार्य इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या यशकथा...**

## सुंदर आणि प्रसन्न देवळाली

देवळाली ही वर्ग–१ ची छावणी. या छावणीची स्थापना १८६९ मध्ये झाली. १९०४ मध्ये येथे इंडियन स्टाफ कॉलेजची स्थापना झाली. कालांतराने ते पाकिस्तानातील क्वेट्टा येथे स्थलांतरित झाले. पहिल्या महायुद्धादरम्यान देवळालीचा विस्तार झाला. इथल्या जुन्या इमारती त्या काळातील आठवणींना उजाळा देणाऱ्या आहेत. असा विस्तार होताना देवळालीने मात्र आपले सौंदर्य आजही जपलेले दिसते.

देवळालीची लोकसंख्या साधारणत: ५५ हजार आहे. ५० हजार नागरिक नागरी वस्तीत तर इतर छावणी भागात राहतात. दोन्ही भागातील स्वच्छतेची जबाबदारी छावणी परिषदेकडेच आहे. तुलनेने छावणी भाग अधिक स्वच्छ असला तरी नागरी भागाचे सौंदर्य तेथील स्वच्छता व हिरवळीमुळे खुलून दिसते.

### स्वच्छता सप्ताह

देवळाली छावणी परिषदेतर्फे दरवर्षी गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता सप्ताह साजरा केला जातो. जनजागृतीच्या उपक्रमांबरोबरच परिसर स्वच्छता आणि वृक्षारोपणावर भर देण्यात येतो.

यावर्षी शहराच्या मधोमध जाणाऱ्या नाल्याची संपूर्ण स्वच्छता करण्यात आली. नाल्यात कचरा टाकला जाऊ नये यासाठी दोन्ही बाजूंनी जाळ्या बसवण्यात आल्या आहेत. परिसरात ८०० झाडेदेखील लावण्यात आली आहेत. गतवर्षी लावलेल्या झाडांपैकी ७५ टक्के झाडे जगवण्यात आली आहेत.

### घनकचरा व्यवस्थापन

शहरात १३ घंटागाड्यांद्वारे घरोघरी जाऊन कचरा संकलित करण्यात येतो. नेहमी कचरा होणाऱ्या मोजक्या ठिकाणी कचराकुंड्या ठेवण्यात आल्या आहेत. नागरिकांना गाडीत कचरा टाकण्याची सवय लावून टप्प्याटप्प्याने त्यादेखील काढण्यात येणार आहेत.

व्हर्मी कंपोस्टिंग युनिट सुरू करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. प्लास्टिकवर बंदी घालण्यात आली असून जनजागृतीसाठी कापडी पिशव्या वाटपाचा उपक्रम परिषदेने राबवला.







## 'ग्रीन जीम'

**परिसरातील जुने वटवृक्ष, मोठ्या प्रमाणात होणारे वृक्षारोपण, सुंदर उद्याने यामुळे परिसराचे सौंदर्य खुलून दिसते. उद्यानातील स्वच्छता कायम ठेवताना 'ग्रीन जीम' संकल्पनेच्या माध्यमातून नव्या पिढीला स्वच्छ परिसरासाठी प्रेरित करण्याचे आणि उद्यानाचे महत्त्व त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न परिषदेतर्फे होत आहे. हिरव्यागार परिसरामुळे 'टेंम्पल हील' उद्यानात बाहेरील नागरिकही सहलीसाठी येतात आणि इथल्या स्वच्छतेमुळे प्रभावित होतात.**

### शौचालयाचा वापर

परिसरातील अतिक्रमित झोपडपट्टी भागाचा अपवाद वगळता साधारणत: १०० टक्के नागरिक शौचालयाचा वापर करतात. अतिक्रमण काढण्याची कार्यवाही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी विलास पवार यांनी सांगितले.

गावात सार्वजनिक ठिकाणी शौचालयांची व्यवस्था करण्यात येत असून ८ पोर्टेबल टॉयलेट्स बसवण्यात येत आहेत. सांडपाणी व्यवस्थापनासाठी ६४ कोटींचा भूमिगत ड्रेनेज लाइनचा प्रकल्प प्रस्तावित आहे. त्यात सांडपाण्याच्या शुद्धीकरणाचा समावेशदेखील आहे. शहरातील ८० टक्के नागरिकांना जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. उर्वरित २० टक्के भागासाठी ४ कोटींची योजना मार्चअखेर पूर्ण होणार आहे.

### नागरिकांचा प्रतिसाद मिळाला

**''शंभर टक्के कचरा संकलित करून त्यावर प्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. कचराकुंड्या पूर्णत: बंद करणार आहोत. गावातून स्वच्छतादूत निवडून जनतेला स्वच्छतेसाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. बायोडायजेस्टर प्लँट आणि कचऱ्यावर प्रक्रिया हे पुढचे पाऊल असणार आहे. ''**

**– विलास पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी**



### स्वच्छता : एक जाणीव

छावणी परिषदेच्या प्रयत्नांमुळे 'स्वच्छ भारत अभियान' अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यात मदत होत आहे. परिसरातील रुग्णालये, उद्याने, शाळा व अन्य सार्वजनिक ठिकाणे आणि बाजारपेठेतदेखील विखुरलेला कचरा फारसा आढळत नाही. विविध स्पर्धा, मॅरेथॉन, सार्वजनिक ठिकाणी सामूहिक शपथग्रहण आदींच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंतदेखील स्वच्छतेचा संदेश पोहोचवला जात आहे. शौर्य, पराक्रम आणि देशभक्तीचा संदेश देणाऱ्या छावणीने स्वच्छतेच्या माध्यमातून देशभक्तीचा अनोखा मार्ग इतरांना दाखवला आहे.

---

स्वच्छ महाराष्ट्र अभियान सप्तपदी स्वच्छतेची

## पन्हाळा

कोल्हापूर शहरापासून १८ किलोमीटरवर असलेले पन्हाळा शहर. पन्हाळा किल्यास फार मोठी ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. चार दरवाजा, तीन दरवाजा आणि वाघ दरवाजा ही या किल्याची मुख्य प्रवेशद्वारे आजही दिव्य इतिहासाची साक्ष देत आहेत. शहराला मिळालेला हागणदारीमुक्त शहराचा पुरस्कार हा पन्हाळावासीयांच्या दृष्टीनेच नव्हे तर कोल्हापूर जिल्ह्याच्या दृष्टीने ही गौरवाची बाब आहे.

### हागणदारी मुक्तीचा विडा

'सप्तपदी स्वच्छतेची' या उपक्रमातून स्वच्छ, सुंदर, समृद्ध आणि आरोग्यसंपन्न पन्हाळा शहर बनवण्याचा ध्यास घेऊन, स्वच्छता विशेषत: हागणदारीमुक्त अभियान गतिमान केले.

नगराध्यक्ष असिफ र.अ. मोकाशी व मुख्याधिकारी श्याम विठ्ठल गोसावी यांनी प्रथमपासूनच नागरिकांना या अभियानात उत्साहाने सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. त्यासाठी त्यांनी जाणीवजागृती मोठ्या प्रमाणावर केली. हे अभियान आपल्या स्वत:च्या व शहराच्या हिताचे असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकातील नागरिक या अभियानात हिरिरीने सहभागी झाला.

नागरिकांनी हागणदारीमुक्त पन्हाळा या हाकेला उत्तम साथ दिल्याने स्वच्छतेची मोहीम युद्धपातळीवर राबवणे सुलभ झाले. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. त्यातूनच हे शहर हागणदारीमुक्त झाले.

### स्वच्छतेची शपथ

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीचे औचित्य साधून भव्य एकता दौड शहरात काढण्यात आली. या दौडमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सर्वांनी स्वच्छतेची शपथ घेतली. त्यानंतर पन्हाळा शहर हागणदारीमुक्त होण्यास नवी दिशा आणि गती मिळाली.






### कचऱ्याची विल्हेवाट

या शहराला हागणदारीमुक्त कचरामुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात आली. त्या अनुषंगाने शहरात दररोज निर्माण होणारा ओला कचरा व सुका कचरा यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा करून टाकावा, एकत्र टाकू नये, यासाठी जनजागृती करण्यात आली.

ओला कचरा आणि सुका कचरा वेगवेगळा टाकल्यामुळे होणारे फायदे-तोटे नागरिकांना समजावून सांगण्यात आले. या जाणीवजागृतीमुळे नागरिकांना ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा टाकण्याचे महत्त्व पटले. त्यांनी या मोहिमेला उत्तम प्रतिसाद दिला. या प्रतिसादामुळे पन्हाळा शहर कचरामुक्त होण्यास मदत झाली.

### घर तिथे शौचालय

कचरामुक्तीला मिळालेल्या यशाने प्रेरित होऊन नगरपरिषदेने नागरिकांना प्लास्टिकमुक्तीसाठी प्रोत्साहन दिले. त्यानुसार सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक यांच्या सक्रिय सहकार्यातून प्लास्टिकमुक्तीचा संदेश घराघरापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आला. आपले शहर प्लास्टिकमुक्त व्हावे, यासाठी नगरवासीयांनी मनापासून प्रयत्न केले. त्यामुळे प्लास्टिकमुक्त पन्हाळ्याची नवी ओळख निर्माण करण्यात नगरपरिषदेला यश आले.

नगरपरिषद क्षेत्रात ६६७ कुटुंबे असून सर्व कुटुंबांना शौचालय उपलब्ध करून देण्यात नगरपरिषदेने पहिल्यापासून पुढाकार घेतला. यापैकी ५५७ कुटुंबाकडे शौचालये उपलब्ध होती. उर्वरित ११० कुटुंबांसाठी नगरपरिषदेने सार्वजनिक तसेच वैयक्तिक शौचालये निर्माण केल्याने बहुतांशी नागरिकांना स्वत:चे शौचालय उपलब्ध झाले. यातील १८ कुटुंबे शौचालय नसल्याने उघड्यावर शौचास जात होती. त्यांना शौचालयाचे महत्त्व पटवून सांगितल्याने ९ कुटुंबांनी शौचालये उभारली. उर्वरित ९ कुटुंबांना शौचालय उभारण्यासाठी नगरपरिषदेने प्रत्येकी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत स्वत:च्या फंडातून उपलब्ध करून दिली व परिणामत: त्यांच्याकडे शौचालय उपलब्ध झाले.

आता सर्वच पन्हाळकरांना शौचालयाची सुविधा उपलब्ध झाल्याने कोणालाही उघड्यावर शौचास जाण्याचा प्रश्न उरला नाही. त्यामुळे हे शहर हागणदारीमुक्त म्हणून घोषित झाले.

या नगरपरिषदेचे नगराध्यक्ष असिफ र.अ.मोकाशी व मुख्याधिकारी शाम विठ्ठल गोसावी यांनी उप नगराध्यक्ष तसेच नगरसेवक-नगरसेविका आणि शहरवासीयांना बरोबर घेऊन केलेले काम विशेष उल्लेखनीय आहे.

---

## कागल

कागल नगरपरिषदेने हागणदारीमुक्त, घनकचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिक बंदी या त्रिसूत्रीचा अवलंब करून कागल शहराला सुंदर व स्वच्छ केले. नगरपरिषदेने शासन योजना आणि लोकसहभागाचा समन्वय प्रभावीरीत्या साधला. स्वच्छ, सुंदर आणि स्मार्टसिटीच्या दृष्टीने राबवलेले स्वच्छ कागल अभियान मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाले आहे. ओला कचरा आणि सुका कचरा यांचा उपयोग उत्तमरीत्या करण्याचे नियोजन नगरपालिकेने केले आहे. कचऱ्याच्या मदतीने खत निर्मिती व वीज निर्मिती प्रकल्प राबवण्यात येत आहेत. शून्य कचरा ही संकल्पना राबवणारी कागल नगरपरिषद ही राज्यातील पहिलीच नगरपरिषद ठरत आहे.

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानातून दिशा घेऊन या नगरपरिषदेने



## घनकचरा निर्मूलन

**हागणदारीमुक्ती बरोबरच घनकचरा निर्मुलनाचे मोठे काम नगरपरिषदेने करून राज्याला एक नवी दिशा देण्याचा चालवलेला प्रयत्न कौतुकाचा विषय बनला आहे. ओल्या कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नगरपरिषदेने हाती घेतला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या नावीन्यपूर्ण योजनेतून साडेतीन कोटी रुपयांचा प्रकल्प राबवण्यात येत असून तो अंतिम टप्यात आहे. या उपक्रमातून ५ एकर जागेत कचऱ्याचे विलगीकरण केले जात आहे. शहरात तसेच नजीकच्या एमआयडीसीतून निर्माण होणारा ओला तसेच सुका कचरा 'हाऊस टू हाऊस' जाऊन १०० टक्के उचलला जात आहे. यासाठी जवळपास १४ हजार बकेट साडेसात हजार मालमत्ता धारकांना मोफत पुरवण्यात आल्या आहेत. हा कचरा जीपीएस प्रणालीच्या वाहनामार्फत दररोज उचलला जातो.**

दोन वेळा विभागीय पातळीवरील आणि एकदा राज्यस्तरीय बक्षीस पटकावले असून कागलकरांना आता स्वच्छतेची सवय जडली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेले स्वच्छ महाराष्ट्र अभियान, कागल नगरपरिषदेने मनापासून राबवले असून; हागणदारीमुक्त शहरासोबतच शून्य कचरा ही संकल्पना राबवण्याचा बहुमानही नगरपरिषद अगामी काळात पटकावेल यात मात्र, शंका नाही. यामुळेच राज्याच्या नगरपरिषद प्रशासनाच्या प्रधान सचिव श्रीमती मीता राजीवलोचन यांनी या नगरपरिषदेच्या स्वच्छताविषयक कामाचे कौतुक केले आहे.

## घर तिथे शौचालय

या शहरात घर तिथे शौचालयाची संकल्पना राबवून संपूर्ण शहर हागणदारीमुक्त बनवण्यात पुढाकार घेतला गेला. ८ हजार ३०० कुटुंबांपैकी साडेसात हजार कुटुंबाकडे शौचालये आहेत. शहरात २१९ इतकी सार्वजनिक शौचालये उभारण्यात आली आहेत. त्याचा वापर नागरिकांनी अधिकाधिक करावा यासाठी नगरपालिकेमार्फत प्रयत्न केले जात आहेत. या शौचालयांच्या स्वच्छतेसाठी विशेष काळजी घेण्यात येते.

नगरपरिषदेने उभारलेले सार्वजनिक शौचालय हे आदर्श शौचालय ठरले आहे. ते पाहण्यासाठी अन्य नगरपालिकांचे प्रतिनिधी येत आहेत. २७१ वैयक्तिक शौचालये स्वच्छ महाराष्ट्र अभियानातून निर्माण केली आहेत. १८ डिसेंबर २०१५ रोजी या नगरपरिषदेचा १०० टक्के हागणदारीमुक्तीचा प्रस्ताव, जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे. संपूर्ण हागणदारीमुक्त शहर संकल्पनेला यश मिळण्यासाठी ३ गुडमॉर्निंग पथकांची स्थापना करण्यात आली आहे. शिवाय ५० कर्मचारी विशेषत्वाने नियुक्त करण्यात आले आहेत. या सर्व प्रयत्नांमुळे लोकसहभाग वाढला. त्यातून हागणदारीमुक्तीची वाट सुकर झाली आहे.

## उत्स्फूर्त सहभाग

मुंबई-बंगळूरू या राष्ट्रीय महामार्गावर कोल्हापूर शहरानजिक या नगरपरिषदेने, स्वच्छ महाराष्ट्र अभियानात सक्रिय सहभाग घेऊन हागणदारीमुक्त कागल नगरपरिषद बनविण्याचा केलेला प्रयत्न लाखमोलाचा आहे. नगरविकास विभाग राज्यात नागरी स्वच्छता अभियान गतिमान करून नागरी भागात स्वच्छतेची सप्तपदी हा उपक्रम प्रभावीपणे राबवत आहे. त्या अनुषंगाने नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष श्रीमती संगीता प्रकाश गाडेकर, उपनगराध्यक्ष श्रीमती उषाताई सोनुले, पक्षप्रताद रमेश माळी तसेच मुख्याधिकारी प्रभाकर पत्की यांनी सर्व नगरसेवक-नगरसेविका तसेच नागरिकांना बरोबर घेऊन स्वच्छतेची सप्तपदी पूर्ण केली आहे.

**शहरातून दररोज निर्माण होणारा ओला तसेच सुका कचरा डंपिंग ग्राऊंड येथे आणला जातो. त्या ठिकाणी त्याचे काळजीपूर्वक विलगीकरण केले जाते. यामध्ये ओला कचऱ्याचा उपयोग वीजनिर्मितीसाठी करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने योग्य उपाययोजना करण्यात येत आहे. सुका कचरा गांडूळखत निर्मितीसाठी वापरला जातो. तसेच प्लास्टिक, काचा, रबर असा कचरा पुनर्वापरासाठी विकला जात आहे. त्यातून नगरपरिषदेला उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध झाला आहे.**



**दररोज साधारणत: ४ टन ओला कचरा निर्माण होतो. या कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्यासाठी, जर्मन तंत्रज्ञानाचे सहकार्य घेण्यात येत आहे. या कचऱ्यापासून ५ मेगावॅट वीज निर्मिती होऊ शकते. त्या अनुषंगाने अत्याधुनिक प्रकल्प उभा केला जात आहे. यातून निर्माण होणाऱ्या विजेमुळे शहरातील १४०० स्ट्रीट लाइट झळाळणार आहेत.**

**वीजनिर्मिती प्रकल्पामुळे नगरपरिषदेची दोन ते अडीच लाख रुपयांची दरमहा बचत होणार आहे. याबरोबरच सुक्या कचऱ्यापासून दररोज दीड टन खत निर्मिती केली जात असून हे खत शेतकऱ्यांना तीन रुपये प्रतिकिलो दराने उपलब्ध करून दिले जात आहे. या खत निर्मिती प्रकल्पामुळे नगरपरिषदेला आर्थिक उत्पन्नाचे मोठे साधनही निर्माण झाले आहे. वीजनिर्मिती व खत निर्मिती प्रकल्पामुळे कागल नगरपरिषद ही शून्य कचरा संकल्पनेची जननी ठरत आहे.**

**(टीम लोकराज्य आणि डॉ. किरण मोघे, जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक; सखाराम माने, माहिती अधिकारी, कोल्हापूर)**

# मराठी वैश्विक भाषा व्हावी

पिंपरी–चिंचवड येथे ८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उत्साहात झाले. ग्रंथ दिंडीपासून समारोपापर्यंत चार दिवस रंगलेल्या या संमेलनात अनेक विषयांवर चर्चा रंगली. सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध विषयांच्या परिसंवादाला तरुणांनी आवर्जून उपस्थिती लावली होती. उद्घाटनाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, मराठी संमेलन पंढरीची वारीच असते अन् इथला विठ्ठल असतो लेखक, कवी आणि वारकरी असतो साहित्यप्रेमी.

**विश्वाच्या कल्याणाचे दान मागणारी मराठी ही एकमेव भाषा आहे. मराठी साहित्य संमेलनांनी राज्याच्या आणि देशाच्या सीमा ओलांडल्या आहेत. विदेशातील मराठी साहित्य संमेलन यशस्वी होत आहेत. या पार्श्वभूमीवर मराठी भाषा ही ज्ञानभाषेबरोबरच वैश्विक भाषा व्हावी म्हणून मराठी सारस्वतांनी काम करण्याची गरज आहे, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी मांडली.**

साहित्य संमेलनाला एक खास पावित्र्य असते, अशी साहित्य संमेलने साहित्याला नवी दिशा दाखवणारे, नवीन विचार देणारे असतात. या व्यासपीठावरून नवे विचार लोकांपर्यंत पोहोचले पाहिजेत. साहित्य संमेलन हे साहित्याच्या व्यवहारासाठी झाले पाहिजे, साहित्यिकांनी साहित्यावर वाद–विवाद केला पाहिजे, साहित्यिकांनी साहित्यबाह्य वादापासून स्वतःला दूर ठेवले पाहिजे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपण जसे साहित्य संमेलन भरवण्यात यशस्वी झालो आहोत, तसेच संमेलनातील विचारमंथनातून आपण किती लोकांच्या डोक्यात विचारांची बीजे रुजवतो, साहित्याचा ठसा उमटवतो या दृष्टीने विचार होण्याची गरज आहे.

### मराठी व्हावी जागतिक भाषा

मराठी भाषा ही जागतिक भाषा होण्याची गरज आहे. मराठी भाषेतील साहित्य जागतिक भाषांमध्ये जाण्याची गरज आहे. जोपर्यंत मोठ्या प्रमाणात मराठी भाषेतील ग्रंथांचे आणि साहित्याचे इतर जागतिक भाषांत भाषांतर होत नाही, तोपर्यंत मराठी भाषेला वैश्विक स्वरूप प्राप्त होणार नाही असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, मराठी ही जशी वैश्विक भाषा व्हावी, तशीच ती जागतिक ज्ञानभाषाही झाली पाहिजे. ही भाषा नव्या पिढीच्या संवादाची आणि नव्या समाज माध्यमाची भाषा झाली पाहिजे. मराठी ही देशातील १० ते १२ कोटी लोकांची भाषा आहे म्हणजेच हे साहित्य संमेलन १० ते १२ कोटी लोकांचे संमेलन आहे.

महाराष्ट्रात वेगवेगळी साहित्य संमेलने होत असतात. यात जातीय, धार्मिक, विविध भाषिक, विभागीय अशा विविध संमेलनाचा समावेश



अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे

८९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

पिंपरी-चिंचवड २०१६




असतो. परंतु हे सर्व मराठी भाषिकांचे एकमेव साहित्य संमेलन आहे. एवढे भव्य आणि मोठे साहित्य संमेलन अन्य कोणत्याही भाषेत होत नाही.

### प्रचार व्हावा सकारात्मकतेचा

साहित्यिकांनी नकारात्मक प्रसिद्धीपासून दूर राहून सकारात्मकतेचा प्रचार केला पाहिजे. सकारात्मक अभिव्यक्तीला प्राधान्य दिले पाहिजे. कारण सकारात्मकतेतून समाजाला ऊर्जा मिळत असते. हल्ली नकारात्मक प्रचारातून प्रसिद्धी मिळवण्याचे फॅड निर्माण झाले आहे. माध्यमेही अशा बाबींना प्रसिद्धी देत असतात. हे थांबवण्याची गरज व्यक्त करून मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, आमची संस्कृती ही सहिष्णुतेची संस्कृती आहे. अंतिम सत्याकडे जाण्याचे मार्ग जरी वेगळे असले तरी हेतू आणि ध्येय एकच असतील तर दोन प्रवाहातील संघर्ष टाळले पाहिजेत.

### भारत सहिष्णूच

सहिष्णुता हेच भारतीयांचे वैशिष्ट्य आहे. त्याचमुळे जगभरातून लोक भारतात येतात. लेखकांनी आपल्या लेखणीतून समाजातील अपप्रवृत्तींवर टीका करावी. त्यांनी लेखणीलाच आपले शस्त्र करावे, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी केले.

संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते झाले. त्यांनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष निवडीची पद्धत बदलली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष माधवी वैद्य यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी. डी. पाटील यांनी स्वागतपर भाषणात साहित्याचा, संमेलनाच्या आयोजनामागच्या हेतूचा धांडोळा घेतला. या वेळी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष बापट, पिंपरी-चिंचवडच्या महापौर शकुंतला धराडे, ज्येष्ठ साहित्यिक गुलजार यांच्या भाषणासह ८९व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांचे अध्यक्षीय भाषण झाले. मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांचेही या वेळी भाषण झाले. या वेळी त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. श्रीपाल सबनीस यांच्याकडे सुपुर्द केली.



### स्वागत ग्रंथाचे प्रकाशन

स्वागत ग्रंथाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि श्री. शरद पवार यांच्या हस्ते झाले. विविध भाषेतील ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक सत्यव्रत शास्त्री, रेहमान राही, सिताकांत महापात्रा, प्रतिभा रॉय यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रकाशक येशू पाटील यांचाही सत्कार करण्यात आला.

### साडे तीन कोटींची पुस्तकविक्री

८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील ग्रंथप्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तीन दिवसात येथे साडेतीन कोटी रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली.

**शब्दांकन: प्रवीण कुलकर्णी**

मराठी भाषा संवर्धन दिन

# सामर्थ्य मराठीचे...

**कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी २७ फेब्रुवारी रोजी दरवर्षी मराठी भाषा संवर्धन दिन साजरा केला जातो. यानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने गेल्या वर्षभरात भाषा संवर्धनासाठी केलेल्या उपाययोजनांचा हा आढावा...**



### मराठी पुस्तक विक्रीला राजाश्रय देण्याचा प्रयत्न

मराठी पुस्तकांच्या विक्रीसाठी अल्प भाड्याने जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचा फायदा मराठी पुस्तकांची विक्री करणाऱ्यांना होणार आहे. या निर्णयाची व्याप्ती राज्यभर असणार आहे. महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायतींच्या गाळ्यांतील ५०० ते १००० चौरस फूट आकारमानाचा गाळा मराठी पुस्तकांच्या विक्रीसाठी अल्प भाड्याने देण्यात येईल.

### मराठी राजभाषा आणि अभिजातही

मराठीचा प्रभावी वापर करता यावा, यासाठी तिला राजभाषेचा दर्जा देण्यात आला आहे. आता मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी राज्य शासन पाठपुरावा करीत आहे.

### विश्वकोश आणि ज्ञानकोशाचा प्रसार

मराठी विश्वकोशाच्या एकूण प्रस्तावित २३ खंडांपैकी परिभाषेचे एकूण १ ते २० असे खंड प्रकाशित झाले आहेत. तसेच हे खंड मंडळाच्या www.vishwakosh.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. याशिवाय १ ते १७ खंड सीडी स्वरूपातही उपलब्ध आहेत. मराठी विश्वकोशाचा सूचिसंग्रह तयार करणे व नकाशा खंड तयार करणे या दोन खंडाची कामे सुरू आहेत.

### पुस्तकाचे गाव

पुस्तकाच्या गावाचा संकल्पनात्मक पातळीवर विचार सुरू आहे. वाचनप्रिय जनतेसाठी राज्यात पुस्तकांचा गाव निर्माण करण्यात येईल. त्यास अनुसरून प्राथमिक सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. सातारा जिल्ह्यातील मालगुंड किंवा महाबळेश्वर येथे पुस्तकाचे गाव निर्माण करण्याच्या दृष्टीने काम सुरू आहे.

### कायद्यांच्या नावांमधील बदल

बॉम्बे हा शब्द असलेले सुमारे १२७ कायदे मुंबई उच्च न्यायालयाच्या (बॉम्बे हायकोर्टाच्या) संकेतस्थळावर आढळतात. यापैकी ३३ कायद्यांमध्ये बॉम्बे या शब्दाऐवजी महाराष्ट्र व मुंबई अशी सुधारणा करण्यात आली आहे. उर्वरित कायद्यांमध्ये असा बदल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

### इतर निर्णय

शासकीय कार्यक्रमात यापुढे पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छाऐवजी पुस्तक देऊन करण्याचा निर्णय. यशोमुद्रा आणि यशोवेणू हे दोन मराठी फॉण्ट मुक्तस्रोत स्वरूपात (फ्री सोर्स) उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर हे फॉण्ट विनामूल्य उपलब्ध आहेत. भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर रोजी येणारा जन्मदिन यापुढे दरवर्षी 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या वर्षापासून याची सुरुवात झाली आहे.

**वर्षा फडके**

## मराठी भाषा विकासासाठी धोरण

**मराठी भाषा वैभवसंपन्न असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळेल. मराठी भाषा, संस्कृती यांचे संवर्धन करण्यासाठी ठोस योजना आखण्यात येत आहेत. मराठी भाषा संवर्धन, वाचन संस्कृती, बोलीभाषा, मराठी भाषाविषयक मंडळे, मराठी संस्कृती याबाबत कृती आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. मराठी भाषा विकासाचे धोरण ठरवण्यात येत आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली भाषा सल्लागार समितीने, मराठी भाषा भविष्यात कशी असेल हे लक्षात घेऊन याबाबतचे धोरण ठरवण्याचे काम सुरू केले आहे.**



# विशेष शिष्यवृत्ती यूपीएससी परीक्षेसाठी

**केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) अखिल भारतीय सेवांमध्ये उत्तीर्ण होण्याचे राज्यातील उमेदवारांचे प्रमाण वाढवण्यासाठी गुणवत्ताधारित विशेष शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळात घेतला आहे. यामुळे पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत अशा तीन भागात दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसह उमेदवारास प्रतिमहिना दहा हजार रुपयांचा निर्वाहभत्ता मिळणार आहे.**

यूपीएससी परीक्षेसाठी शिष्यवृत्ती या योजनेनुसार राज्यातील होतकरू आणि गुणवंत उमेदवारांना यूपीएससी परीक्षांची पूर्व तयारी करून घेणाऱ्या दिल्ली येथील नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून अर्थसाहाय्य मिळणार आहे. उमेदवारांच्या दिल्ली येथील प्रशिक्षणाच्या वास्तव्य कालावधीत प्रतिमहिना दहा हजार रुपयांप्रमाणे निर्वाह भत्ता देण्यात येणार आहे.

### शिष्यवृत्तीचे स्वरूप

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना त्या वर्षीच्या मुलाखतीपर्यंतच्या कालावधीसाठी दिल्ली येथील निवडक प्रशिक्षण वर्गांमध्ये मुलाखतीपर्यंतच्या उपलब्ध असणाऱ्या अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी भाग-१ ही शिष्यवृत्ती देण्यात येईल. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर पुढील वर्षीच्या परीक्षेसाठी या शिष्यवृत्तीचा अर्ज मुंबई येथील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होईल. निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवाराचा शासनाने निवड केलेल्या दिल्ली येथील तीनपैकी एका प्रशिक्षण संस्थेत; प्रवेशशुल्काचा भरणा शासनामार्फत केला जाईल.

या शिष्यवृत्तीचा लाभ घेणारा उमेदवार पूर्व परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याला दिली गेलेली भाग-१ ची शिष्यवृत्ती त्या वर्षासाठी समाप्त करण्यात येईल. मात्र, पुढील वर्षी तो पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाल्यास मुख्य परीक्षेसाठी त्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल. त्याचप्रमाणे असा उमेदवार मुख्य परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याची त्यावर्षीसाठीची शिष्यवृत्ती समाप्त होईल. मात्र, पुढील वर्षी तो मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यास मुलाखतीसाठीच्या शिष्यवृत्तीस पात्र राहील. त्याचप्रमाणे भाग-१ चा लाभ न घेतलेल्या मात्र चालू वर्षात पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास भाग- २ व ३ चा लाभ मिळेल. तसेच भाग-१ व २ चा लाभ न घेतलेला मात्र मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार भाग-३ च्या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ शकेल.

शिष्यवृत्तीसाठी पात्र उमेदवारास प्रशिक्षण घेतल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाची संबंधित परीक्षा देणे बंधनकारक असेल, अन्यथा त्या शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम एकरकमी शासनास परत करावी लागेल. उमेदवारास अशा आशयाचे बंधपत्र देणे आवश्यक राहील. भाग-१ शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या तथापि पूर्व परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला ही अट लागू राहणार नाही. या उमेदवाराने मुंबई येथील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या संचालकांच्या संपर्कात राहून मासिक अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तसे न करणाऱ्या उमेद्वारावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

या योजनेचे नियंत्रण व कार्यान्वयन करण्यासाठी नियंत्रण समिती व कार्यकारी समिती नेमण्यात येणार आहे. संपूर्ण योजनेचा आढावा घेण्याचे काम नियंत्रण समिती करणार असून या योजनेच्या अंमलबजावणीत काही अडचणी आल्यास त्यात उचित बदल करून त्यास मान्यता देण्याचे अधिकार या समितीस राहणार आहेत. या समितीचे अध्यक्ष नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव असतील, तर वित्त विभागाचे प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव हे सदस्य असतील. मुंबई येथील भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्राचे संचालक हे सदस्य सचिव असतील.



त्याचप्रमाणे कार्यकारी समिती ही संपूर्ण योजनेचे कार्यान्वयन करणार असून दर तीन वर्षांनी दिल्लीतील तीन संस्थांची निवड करणार आहे. या समितीचे अध्यक्ष मुंबई येथील राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्थेचे संचालक असतील, तर नाशिक आणि नागपूर येथील भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्राचे संचालक सदस्य म्हणून काम पाहतील.

#### शिष्यवृत्तीस पात्रतेचे निकष

- **महाराष्ट्राचा रहिवासी असावा.**
- **कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न दहा लाखांपेक्षा अधिक नसावे.**
- **मागील तीन वर्षांमध्ये किमान एक वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणारा असावा. तथापि, अंतिमत: यशस्वी न झालेला असावा.**
- **टीप : उमेदवाराने अर्जासह पदवी परीक्षा प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, त्या वर्षीच्या यूपीएससीच्या परीक्षेची गुणपत्रिका सादर केल्यास भाग-१ (पूर्व परीक्षा ते मुलाखत), भाग-२ (मुख्य परीक्षा) व भाग-३ (मुलाखत) अशा तिन्ही भागांचा तो प्रत्येकी एकदाच लाभ घेऊ शकतो.**

**टीम लोकराज्य**




# संधी शिक्षणाची, संधी उन्नतीची

महाराष्ट्र राज्यात एकूण ४५ अनुसूचित जमाती आहेत त्यात मुख्यत्वे भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम, कातकरी आणि माडिया गोंड या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत. धुळे, नंदुरबार, जळगांव, नाशिक व ठाणे व नवनिर्मित पालघर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती, व यवतमाळ या पुर्वेकडील वनाच्छादित जिल्ह्यांमध्ये मुख्यत: आदिवासींची संख्या अधिक आहेत. राज्याच्या लोकसंख्येच्या ९ टक्के लोकसंख्या ही आदिवासी समुदायाची आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध शैक्षणिक योजना राबवण्यात येत आहेत.

**संविधानातील मार्गदर्शक तत्त्वानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घेण्याची आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने आदिवासी समुहाच्या विकासासाठी अनेक योजना राबवणे सुरू केले आहे. या योजनांची माहिती या अंकापासून देण्यात येईल.**

### शासकीय आश्रमशाळा

अतिदुर्गम भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांचा आर्थिक शैक्षणिक व सामाजिक विकास गतीने घडवून आणण्यासाठी १९७२-७३ पासून शासनाने निवासी आश्रमशाळा समूह योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेनुसार अनुसूचित जमाती क्षेत्रात ५००० ते ७००० लोकसंख्येच्या क्षेत्रात एक आश्रमशाळा हा सर्वसाधारण निकष ठरविण्यात आला आहे. लोकवस्ती ही पाड्यापाड्यांमध्ये विखुरलेली असल्याने काही ठरावीक ठिकाणी ३००० ते ५००० लोकसंख्येच्या क्षेत्रास एक आश्रमशाळा हा निकष १९८२ पासून ठरवण्यात आला आहे.

### आश्रमशाळा व्यवस्थापन

विभागाच्या अधीन एकूण ५२९ शासकीय आश्रमशाळा आहेत. त्यापैकी प्राथमिक आश्रमशाळा ८६, माध्यमिक आश्रमशाळा ४४३, यापैकीच इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळा ११, एकूण शाळांपैकी केंद्रशाळा १४४, कन्याशाळा २५, कनिष्ठ महाविद्यालय १२५ कार्यरत आहेत.

आश्रमशाळांमधून २०१४-१५ मध्ये एकूण १,९६,३५७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच भोजन निवास, आंथरूण पांघरूण, गणवेश, वह्या पुस्तके, शालेय साहित्य आणि अन्य वस्तू जसे (खोबरेल तेल, अंघोळीचा साबण, कपड्याचा साबण, दंतमंजन, जेवणासाठी ताट-वाटी, ग्लास, बूट मोजे, लोखंडी पेटी, खेळ साहित्य, वूलन स्वेटर्स, कुडता पायजमा व नाईट गाऊन) इत्यादी सुविधा मोफत पुरवण्यात येतात.

### केंद्रीय आश्रमशाळा

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण व दर्जा उंचावणे यासाठी २३ फेब्रुवारी १९९६ अन्वये एकूण १४४ शासकीय आश्रमशाळांची केंद्रीय आश्रमशाळा म्हणून निवड करण्यात आली आहे. एकूण ५२९ शासकीय आश्रमशाळा व ५५६ अनुदानित आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी नियमित

देखरेख व मार्गदर्शन या केंद्रीय आश्रमशाळांच्या केंद्रप्रमुखांमार्फत करण्यात येते.

### कनिष्ठ महाविद्यालय

आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून ज्या शासकीय आश्रमशाळा इ. १० वी पर्यंत पोहचलेल्या आहेत त्या शाळांपैकी एकूण १२५ ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालये मंजूर केलेली आहे. त्यात कला व विज्ञान शाखेचा समावेश आहे.

### काही अन्य उपाययोजना

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्यात येते. २८ ऑगस्ट २००९ अन्वये अनुसूचित जमातीच्या २५०० विद्यार्थ्यांना, दरवर्षी जवळच्या शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. दरवर्षी इयत्ता १ ली व ५ वी या दोन टप्प्यांवर २५,००० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत निर्णय घेतला आहे. जेणेकरून जास्तीत जास्त आदिवासी मुलामुलींना



**विद्यार्थिनींसाठी खास ५२९ शासकीय आश्रमशाळांपैकी एकूण २५ आश्रमशाळांचे कन्या शाळेत रूपांतर करण्यात आले आहे. नाशिक विभागात ५, ठाणे २, अमरावती ३, नागपूर - १ अशा ११ इंग्रजी माध्यमांच्या आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या आहेत.**

इंग्रजी माध्यमामध्ये दर्जेदार शिक्षण मिळून त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील. या योजनेंतर्गत काही अटी व शर्तींची पूर्तता आवश्यक आहे.

### एकलव्य निवासीशाळा (केंद्र पुरस्कृत पब्लिक स्कूल)

शासनाने महाराष्ट्र राज्यात एकलव्य निवासी शाळा सुरू करण्यास मान्यता दिली आहे. २०००-२००१ या वर्षात अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर या प्रादेशिक कार्यक्षेत्रात एकूण ११ एकलव्य निवासीशाळा सध्या कार्यरत आहेत. या शाळांमध्ये केंद्र शासनाच्या धोरणानुसार केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या अभ्यासक्रमानुसार इयत्ता ६ वी ते १२ वीचे वर्ग सुरू आहेत.

### परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

परदेशातील शिक्षण संस्था / विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या १० विद्यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना २००५-२००६ या वर्षापासून मंजूर करण्यात आली आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा जास्तीत जास्त रुपये ४.५० लक्षपर्यंत आहे. या योजनेंतर्गत एम.बी.ए, वैद्यकीय अभ्यासक्रम, बी.टेक (इंजिनिअरिंग), विज्ञान, कृषी व इतर विषयांच्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

### सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन

आदिवासी विद्यार्थ्यांना सैनिकी शाळांमध्ये शिक्षण मिळून पुढे ते राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा या हेतूने या योजनेंतर्गत विद्यावेतन दिले जाते. ही योजना समाज कल्याण विभागाकडून राबवण्यात येत असून या अंतर्गत आदिवासी मुलांच्या शिक्षणावरील खर्चाची रक्कम समाज कल्याण विभागाकडे हस्तांतरित करण्यात येते.

### सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

राज्यातील अनुसूचित जमातीच्या १ ली ते १० वीमध्ये आश्रमशाळेव्यतिरिक्त शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक व इतर किरकोळ खर्च भागविण्यासाठी केरळ व राजस्थान राज्याच्या धर्तीवर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना इ.१ली ते ४ थी रुपये १,०००/-, इ.५वी ते ७वी रुपये १,५००/- व इ.८वी ते १० वी रुपये २,०००/- शिष्यवृत्ती मिळते. या योजनेंतर्गत काही अटी व शर्तींची पूर्तता आवश्यक आहे.

### अनुदानित आश्रमशाळा

आदिवासी लोकांच्या मुलामुलींसाठी शासनाने १९५३-५४ पासून आश्रमशाळा योजना सुरू केली. या आश्रमशाळा शासनातर्फे तसेच स्वयंसेवी संस्थांतर्फे चालवण्यात येतात. राज्यात आदिवासी विकास विभागामार्फत एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून त्यापैकी ६४ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळा व ३३७ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवल्या जातात. आदिवासी विद्यार्थ्यांची उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून आजपावेतो १५५ अनुदानित माध्यमिक आश्रमशाळासंलग्न कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालये मंजूर करण्यात आली आहेत. त्यांना दिलेल्या अनुदानातून आवश्यक सोयीसुविधा देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**टीम लोकराज्य**

**संपर्क : आश्रमशाळा, वसतिगृह व शिष्यवृत्ती संबंधित तक्रारीसाठी टोल फ्री नंबर १८०० २६७ ०००७**

**आदिवासी विकास विभागाचे संकेत स्थळ : https://tribal.maharashtra.gov.in**

# सर्व जिल्ह्यांसाठी आपले सरकार

**'आपले सरकार' वेबपोर्टलच्या माध्यमातून सामान्यांच्या तक्रारींना हक्काचे व्यासपीठ मिळाले असून सेवा हमी कायद्यातील १५६ सेवा ऑनलाइन देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या कायद्यातील सर्व सेवा २ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत ऑनलाइन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे लोकाभिमुख प्रशासनाचा तातडीचा प्रतिसाद जनसामान्यांना अनुभवायला मिळणार आहे.**




मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर लोकाभिमुख प्रशासनाचे स्वप्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बघितले. या स्वप्नपूर्तीच्या अनुषंगाने गेल्यावर्षी 'आपले सरकार' या वेब पोर्टलची निर्मिती करण्यात आली. गेल्या वर्षभरात या वेबपोर्टलला मिळालेल्या अतिशय उत्तम प्रतिसादामुळे याची व्याप्ती आता संपूर्ण राज्यभर वाढवण्यात आली आहे.

आपले सरकार वेबपोर्टलमध्ये सेवा हमी कायद्यातील १५६ सेवा ऑनलाइन केल्यामुळे राज्याच्या प्रशासनाने नवीन उंची गाठली आहे. गेल्यावर्षी शुभारंभ केलेल्या 'आपले सरकार' वेबपोर्टलने मंत्रालय स्तरावरील तक्रारींसाठी व्यासपीठ निर्माण केले होते. त्यानंतर १५ ऑगस्ट रोजी ६ विभागांचा या वेब पोर्टलमध्ये समावेश करण्यात आला. २६ जानेवारी २०१६ पासून सर्व जिल्ह्यातील तक्रारी ह्या वेबपोर्टलवर मांडता येतील.

या सेवेचा लोकार्पण सोहळा प्रजासत्ताक दिनी मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडला. या वेळी मुख्यमंत्री सचिवालय व माहिती तंत्रज्ञान संचालनालयातर्फे 'आपले सरकार' वेब पोर्टलवरील तक्रारींसाठी सर्व जिल्ह्यांचा समावेश, सेवा हमी कायद्यातील १०९ सेवांचे नव्याने ऑनलाइन लोकार्पण करण्यात आले. तसेच 'महाराष्ट्र-mygov' ही सेवाही लोकार्पण करण्यात आली. या वेळी मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव पी.एस.मीना व माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव व्ही.के. गौतम उपस्थित होते.

### घरबसल्या तक्रार निवारणाची सुविधा

आपले सरकार वेबपोर्टलमुळे नागरिकांना घरबसल्या तक्रार निवारणाची सुविधा उपलब्ध झाली आहे. वेब पोर्टलवरून तक्रार निवारणाचा दर हा ८९ टक्के आहे तो आता अधिकाधिक सुधारला पाहिजे, अशी सूचना या वेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

**सेवा हमी कायद्यातील १५६ सेवा ऑनलाइन**

राज्य शासनाने २ ऑक्टोबर रोजी सेवा हमी कायद्यांतर्गत अधिसूचित केलेल्या सेवांपैकी ४७ सेवा ऑनलाइन केल्या होत्या. त्याचे पुढचे पाऊल म्हणून २६ जानेवारीपासून या कायद्यातील १०९ सेवा ऑनलाइन करण्यात आल्या आहेत. त्यामुळे देशभरात सर्वाधिक म्हणजे १५६ ऑनलाइन सेवा देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरले आहे.

### ऑनलाइन सेवा

सेवा हमी कायदा केवळ कागदापुरता मर्यादित न राहता त्याची यशस्वी अंमलबजावणी होण्याकरिता यातील सेवा ऑनलाइन करण्यावर भर देण्यात आला आहे. येत्या २ ऑक्टोबरपर्यंत या कायद्यातील सर्वच सेवा ऑनलाइन करण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

आपले सरकार तसेच सेवा हमी कायद्यातील ऑनलाइन सेवा यांचा वापर सामान्यांना मोबाइलच्या माध्यमातून करता यावा, यासाठी या सर्व सेवांचे मोबाइल ॲप तयार करावे. जेणेकरून नागरिकांना कुठलाही अर्ज हा मोबाइलवर देखील भरता येईल आणि तो प्रशासनाकडे पाठवता येईल, असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, माहिती अधिकार कायद्याच्या सेवा विभागीय पातळीपर्यंत ऑनलाइन पद्धतीने देता येत आहेत. टप्प्याटप्प्याने या कायद्याची सेवादेखील संपूर्णपणे ऑनलाइन करण्यात येईल.

### सेवा अधिक गतिमान आणि पारदर्शक

माहिती कायद्यांतर्गत कुठल्या स्वरूपाचे जास्त अर्ज प्राप्त होतात याचे विश्लेषण करण्याची गरज असून ज्या विभागाकडून सर्वात जास्त माहिती मागवली जाते, त्याचा अभ्यास करून अशी माहिती सार्वजनिक प्रणालीमध्ये ठेवल्यास; ती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचेल, यामुळे प्रशासनात देखील पारदर्शकता येण्यासाठी मदत होईल. आपण देत असलेल्या सेवा अधिक गतिमान आणि पारदर्शक झाल्यास प्रशासनाबद्दलचा जनतेचा विश्वास वाढवण्यासाठी मदतच होईल.

प्रशासनातील बहुतांश सेवा नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने घरी बसून घेता येतील, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. हा प्रयत्न यशस्वी झाल्यास माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्र देशात पथदर्शी ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

### अर्ज सुटसुटीत आणि एकपानी असावेत

मुख्य सचिव श्री. क्षत्रिय म्हणाले की, सामान्यांच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी या सेवांचे ऑनलाइन होणे आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या वापराने शासन आणि जनता यांच्यातील दरी कमी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ऑनलाइन सेवांसाठी अर्ज आहेत ते सुटसुटीत आणि एकपानी असावेत, असे सांगून ते पुढे म्हणाले की, प्रत्येक शासकीय अधिकारी व कर्मचारी हे काम करीत असताना निरनिराळे प्रयोग करीत असतात. असा आगळावेगळा आविष्कार करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांची यशोगाथा संकलित करून ती 'आपले सरकार' वेबपोर्टलवर ठेवण्यात यावी. माहिती तंत्रज्ञान वापराच्या मोहिमेला अधिक गती मिळावी, यासाठी १७ फेब्रुवारीला सर्व सचिवांची कार्यशाळा घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**टीम लोकराज्य**

## 'आपले सरकार' वेबपोर्टल कसे वापराल ?

नागरिकांना ऑनलाइन आणि सुलभतेने तक्रारी सादर करता याव्यात, यासाठी शासनातर्फे गेल्या प्रजासत्ताकदिनी (२६ जानेवारी २०१५) 'आपले सरकार' हे पोर्टल सुरू करण्यात आले. या पोर्टलच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात विविध प्रकारच्या प्रशासकीय सेवा आता उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे जिल्ह्यातील शासकीय कार्यालयातील कामकाज पेपरलेस व डिजिटल होण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. या सुविधेमुळे नागरिकांना संबंधित विभागाकडे तक्रारी करणे सुलभ होणार असून तक्रार दाखल करण्याविषयी माहिती, त्यावरील कार्यवाही, लागणारा कालावधी आदी माहितीही त्याला याच पोर्टलच्या माध्यमातून मिळणार आहे. या यंत्रणेत नागरिकांकडून दाखल झालेल्या तक्रारींच्या कार्यवाहीचा पाठपुरावा मुख्यमंत्री कार्यालय करणार आहे.




वेब पोर्टलवर तक्रार दाखल करताना जिल्हा, विषय, तक्रारीचे स्वरूप, संबंधित विभाग, प्रशासन प्रकार आदी माहिती दिल्यानंतर नागरिकांना तक्रारीसोबत कागदपत्रेही जोडता येतील. या प्रक्रियेसाठी तक्रारदाराचा ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक आवश्यक राहणार आहे. तक्रार दाखल करण्यासाठी वन टाइम पासवर्ड मिळेल. तसेच तक्रार नोंदविल्यानंतर मिळणाऱ्या टोकन आयडीचा वापर करून तक्रारींचा मागोवा घेता येणार आहे. पोर्टलवर तक्रार निवारण, सेवा हमी, माहितीचा अधिकार आणि सहयोग असे चार विभाग असून जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, महापालिका अशा चार कार्यालयांशी संबंधित तक्रारी करता येऊ शकतील. या पोर्टलशी सर्व यंत्रणा जोडल्या असल्याने ही तक्रार संबंधित कार्यालयाबरोबरच वरिष्ठ स्तरावरील अधिकारी पाहू शकतील. तक्रारीबाबत झालेली कार्यवाही संबंधितांना २१ दिवसांच्या आत कळणार आहे.

'आपले सरकार' या संकेतस्थळावर जाण्यासाठी www.aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाणे आवश्यक आहे. मराठी आणि इंग्रजी भाषेत हे वेबपोर्टल उपलब्ध आहे. या वेबपोर्टलमुळे माहितीचा कायदा ऑनलाइन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य झाले आहे. या कायद्याचा वापर करताना कोर्ट फी स्टॅम्प वापरावे लागत होते. आता आपल्या बँक अकाऊंटमधून आवश्यक असलेले शुल्क इंटरनेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड यांचा वापर करून भरता येईल. तसेच 'आपले सरकार' हे मोबाइल ॲप्लिकेशन ॲन्ड्रॉइड, आयफोन आणि विन्डोजवरून डाऊनलोड करता येणार आहे.

## स्मार्ट सिटीच्या पहिल्या टप्प्यात पुणे व सोलापूर

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी स्मार्टसिटी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेत महाराष्ट्रातील पुणे व सोलापूर शहरांनी बाजी मारली आहे. पहिल्या टप्प्यासाठी निवड झालेल्या देशातील पहिल्या २० शहरांच्या यादीत पुणे शहराने दुसरा तर सोलापूर शहराने नववा क्रमांक पटकावला आहे.

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत शहरांचा विकास करण्यासाठी देशातील १०० शहरांची निवड करण्यात आली होती. यात महाराष्ट्रातील १० शहरांचा समावेश आहे. निवड झालेल्या शहरांना आपल्या शहराचा विकास नियोजन आराखडा तयार करण्यासाठी प्रत्येकी २ कोटी रुपये देण्यात आले. त्यानंतर केंद्राकडे आलेल्या राज्यांच्या नियोजन आराखड्यांची एक स्पर्धा घेण्यात आली. त्यानुसार स्मार्टसिटी योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात २० शहरांची निवड करण्यात आली.


पुणे


सोलापूर

पुणे शहराची निवड करताना शहराच्या नियोजन आराखड्यात भविष्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या मध्यवर्ती पायाभूत सुविधांचे नियोजन, दीर्घकालीन पायाभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करण्याबाबतचे नियोजन, पुणे शहराला देशातील सर्वोत्तम राहण्यायोग्य शहर बनवण्याचे नियोजन, रोजगार उपलब्ध करून देत शहराला मनुष्यबळाच्या दृष्टीने नवी ओळख निर्माण करून देणे, शहरातील सौंदर्यीकरणात भर टाकण्याच्या दृष्टीने नदीकिनारे विकसित करण्याच्या नियोजनासह विविध बाबींचा विचार करण्यात आला आहे.

सोलापूर शहराच्या नियोजनात स्वच्छ, कार्यक्षम आणि विकसित शहर तयार करण्यासाठी महत्त्वाच्या बाबी मांडण्यात आल्या आहेत. शहरवासीयांसाठी पायाभूत सुविधांनी सुसज्ज, शाश्वत वातावरण तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. शहराचा गौरवशाली इतिहास, येथे भेट देणाऱ्या प्रत्येकाच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनण्यासाठी शहरातील १०४० एकराचा परिसर चिन्हित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आकर्षक नगररचना, पादचाऱ्यांसाठी करून करण्यात आलेल्या रस्त्यांवरच शेतीमालाच्या विपणनाची व्यवस्था आदी बाबी उपलब्ध करून देण्याचेही नियोजन करण्यात आले आहे.

## 'महाराष्ट्र अनलिमिटेड'

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) व 'महाराष्ट्र अनलिमिटेड' हे शब्द महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे ट्रेडमार्क म्हणून शासनाच्या ट्रेडमार्क विभागाकडे नोंदणी करण्यास तसेच बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज (बीएसई) ची इमारत पर्यटकांना खुली करण्याबाबत सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

**सी-प्लेन सेवा :** जुहू चौपाटी आणि गिरगाव चौपाटी दरम्यान सी-प्लेनद्वारे हवाई सफर सुरु करण्यात येणार आहे. यासाठी मुंबई पोर्ट ट्रस्ट यांनी काही अटी व शर्तीवर मान्यता दिली आहे. पर्यटकांना प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी गिरगाव चौपाटी येथील जलक्रीडा केंद्राशेजारील जागा ताब्यात घेण्यात येणार आहे.

राज्यामध्ये जलविमान वाहतूकअंतर्गत ॲम्फीबियन एअरक्राफ्ट सेवा सुरू करण्याचा पर्यटन महामंडळाचा मानस आहे. ही सेवा महाराष्ट्रात सुरु झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पर्यटक आकर्षित होणार असून यामधून रोजगार निर्मिती होण्यासही मदत होणार आहे.

# तारांकित

## महाराष्ट्र केसरी पोलीस दलात

कुस्ती हा महाराष्ट्राचा अतिशय लोकप्रिय खेळ असून महाराष्ट्र केसरीचा किताब मिळवणाऱ्या खेळाडूला पोलीस विभागात चांगल्या पदावर थेट नियुक्ती देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. महाराष्ट्र केसरी हा महाराष्ट्राची शान असून पोलीस विभागाचा गौरव वाढवणार असल्याचे उद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले.

५९ व्या राज्य कुस्तीगीर स्पर्धेत महाराष्ट्र केसरीचा बहुमान मिळवणाऱ्या जळगावच्या विजय चौधरी याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चांदीची गदा भेट देऊन त्याचा सन्मान केला. विजय चौधरीने शेवटचे तीस सेकंद शिल्लक असताना



मुंबईच्या विक्रांत जाधवला चीतपट करून महाराष्ट्र केसरी हा किताब दुसऱ्यांदा पटकावला.

'राम राम पहेलवान...' अशी साद देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २८ वर्षांनंतर नागपूर येथे महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित होत असल्याबद्दल सर्व आयोजकांचे अभिनंदन केले. कुस्ती हा अतिशय लोकप्रिय खेळ असून या खेळामध्ये होत असलेल्या बदलाचा स्वीकार करून महाराष्ट्रातील कुस्तीपटुंनी आपले नाव जागतिक स्तरापर्यंत पोहोचवले आहे.

## शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी 'प्रधानमंत्री फसल बीमा योजना'



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेली 'प्रधानमंत्री फसल बीमा योजना' ही पथदर्शी विमा योजना असून ही योजना शेतकऱ्यांसाठी अतिशय उपयुक्त असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

'प्रधानमंत्री फसल बीमा योजना' ही योजना येत्या खरीप हंगामापासून लागू करण्यात येणार असून कर्ज न घेतलेले शेतकरीसुद्धा योजनेसाठी पात्र असतील. नवीन योजनेत हप्ता कमी असून खरिपासाठी २ टक्के तर रब्बीसाठी दीड टक्के हप्ता असेल. नवीन योजनेमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला मंडळ स्तरावर मदत देण्याऐवजी वैयक्तिक मदत मिळणार आहे. याआधी पूर्ण पिकाचे नुकसान झाल्यास मदत मिळत होती, नव्या योजनेत रोपाचे नुकसान झाले तरी मदत मिळणार असल्याने शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

नव्या विमा योजनेत व्यावसायिक आणि फलोत्पादन पिकांसाठी शेतकऱ्यांना वार्षिक ५ टक्के इतका हफ्ता भरावा लागेल. शेतकऱ्यांनी विमा हप्त्यापोटी भरायची रक्कम फारच कमी आहे आणि नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या पीक नुकसानापोटी शेतकऱ्यांना संपूर्ण विमा रक्कम देण्यासाठी विमा हप्त्यांची उर्वरित रक्कम शासनातर्फे जमा केली जाईल. सध्या १० टक्के रक्कम शेतकरी भरत असून उरलेल्या ९० टक्के रकमेतील पन्नास टक्के रक्कम राज्य तर पन्नास टक्के रक्कम केंद्र सरकार भरत आहे. या योजनेचा लाभ देताना विमा कंपन्यांना सर्वेक्षण करून ३० दिवसांच्या आत विम्याची रक्कम शेतकऱ्यांना देणे बंधनकारक राहणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नव्या योजनेत तंत्रज्ञानाच्या वापराला मोठे प्रोत्साहन मिळेल. पीक कापणीसंदर्भातील माहिती स्मार्ट फोनद्वारे करणे शक्य होईल, त्यामुळे शेतकऱ्यांना दाव्यापोटी मिळणारी रक्कम मिळवण्यात होणारी दिरंगाई टाळता येईल. 'एक देश एक योजना' या संकल्पनेवर नवी पीक विमा योजना आधारित आहे. यापूर्वीच्या सर्व योजनांमधील चांगल्या वैशिष्ट्यांचा यात समावेश आहे. तसेच यापूर्वीच्या सर्व योजनांमधील त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत.

या योजनेला खऱ्या अर्थाने विम्याचे स्वरूप असून पुढील ३ वर्षांमध्ये देशातील किमान ५० टक्के शेतकऱ्यांना विम्याचे कवच पोहोचवण्यासाठी केंद्र शासन प्रयत्नशील असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांना २११ कोटींची नुकसानभरपाई

राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत २०१४-१५ च्या रब्बी हंगामात पीक विमा संरक्षण घेतलेल्या राज्यातील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईपोटी विमा कंपनीस अदा करावयाच्या ९४ कोटी रुपयांच्या रकमेस राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील ६ लाख ८३ हजार ७०३ शेतकऱ्यांना कृषी विम्यापोटी २१० कोटी ९६ लाख रुपये नुकसानभरपाई (विमा परतावा) मिळणार आहे. मराठवाड्यातील विमा संरक्षण घेतलेल्या ६ लाख ३२ हजार शेतकऱ्यांना १९६ कोटी ५३ लाख रुपये नुकसानभरपाई मिळणार आहे. तसेच विदर्भातील ३२ हजार शेतकऱ्यांना १३ कोटी २९ लाख रुपये नुकसानभरपाई दिली जाणार आहे. नाशिक विभागातील शेतकऱ्यांना ६ लाख ५० हजार रुपये, पुणे विभागातील १९ हजार शेतकऱ्यांना १ कोटी ४ लाख ६२ हजार रुपये नुकसानभरपाई मिळणार आहे.

राज्यातील उर्वरित भागातील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईपोटी पीक विमा निधीच्या दाव्यापोटी राज्य शासनाकडून विमा हप्त्याची ९४ कोटी रुपयांची रक्कम संबंधित विमा कंपनीस अदा करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे.

# तारांकित

## 'रोबोमेट प्लस' ॲपमुळे अभ्यास करणे सोपे

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला 'डिजिटल इंडिया'चे स्वप्न दाखवले आहे. प्रधानमंत्र्यांच्या या स्वप्नाने प्रेरित होत महाराष्ट्रात शाळांच्या संगणकीकरणास सुरुवात झाली आहे. याशिवाय काही खासगी संस्थाही डिजिटल अभ्यासक्रमात चांगले काम करत आहेत. ग्लोबल एज्युकेशन ट्रस्टने तयार केलेल्या 'रोबोमेट प्लस' या मोबाइल ॲपमुळे (संगणकीय



प्रणाली) विद्यार्थ्यांना अभ्यास करणे आणखी सोपे झाले आहे. मंत्रालयात शालेय शिक्षण मंत्र्यांच्या दालनात ग्लोबल एज्युकेशन ट्रस्टने तयार केलेल्या 'रोबोमेट प्लस' या मोबाइल ॲपचे उद्घाटन शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

या मोबाइल ॲपमुळे विद्यार्थ्यांना आता कधीही आणि केव्हाही अभ्यास करता येईल, असा विश्वास श्री. तावडे यांनी व्यक्त केला. रोबोमेट प्लस हे विद्यार्थ्यांसाठी मोफत डाऊनलोड करता येणार असून विद्यार्थ्यांना ज्ञान मिळवण्यासाठी उत्तम ई मार्ग उपलब्ध झाला आहे. इयत्ता ९ वी ते १२ वीच्या अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या अभ्यासक्रमाचा यात समावेश आहे. तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिकविलेल्या सर्व विषयांचे व्हिडिओ, सोप्या भाषेत या ॲपमध्ये उपलब्ध असणार आहेत. मराठी, सेमी इंग्रजी आणि इंग्रजी माध्यमांचा अभ्यासक्रम या ॲपमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे आता विद्यार्थी हवे तिथे हवे तेव्हा अभ्यास करू शकतात.

## मुख्यमंत्र्यांच्या हाती कासरा



जलयुक्त शिवार योजना नेटाने पुढे नेणारे आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना संवेदनशीलपणे हाताळणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शाश्वत शेतीसाठी व शेतकरी स्वयंपूर्ण व्हावा यासाठी चाललेली धडपड वेळोवेळी अवघ्या महाराष्ट्राने पाहिली आहे. कधी शेतकऱ्यांच्या बांधावर तर कधी त्यांच्या घरी मुक्काम करून मुख्यमंत्री वेळोवेळी त्यांच्या अडचणी जाणून घेताना आपण पाहिलेच आहे. त्यांची शेतीविषयीची ओढ जळगाव येथेही पाहायला मिळाली. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार आधुनिक कृषी उच्च-तंत्र पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जळगाव येथे आले असताना त्यांनी जैन हिल्स येथील संशोधन केंद्राला भेट दिली. यावेळी शेतावर आल्यावर मुख्यमंत्री पद बाजूला ठेऊन ते काही वेळासाठी शेतकरी बनले. पेरणी यंत्राचा कासरा हाती घेतला आणि कांदा पेरणी केली. मुख्यमंत्री साहेब स्वत: पेरणी करताना पाहून अनेकजण अवाक् झाले.

मोसंबीच्या संशोधन केंद्रालादेखील मुख्यमंत्र्यांनी भेट देऊन तेथील माहिती घेतली. टिश्यूकल्चर लॅब, बायोटेक लॅब, संशोधन केंद्रातील केळी, डाळिंब, आंबा, पेरू, मोसंबी आदी पिकांची तसेच कांदा पेरणी यंत्राची त्यांनी सविस्तर माहिती जाणून घेतली. कांदा पेरणी यंत्राच्या साहाय्याने केवळ एक व्यक्ती २ तासात एक एकर क्षेत्रावर कांदा पेरणी करू शकतो. तर पारंपरिक कांदा पेरणीला एक एकरासाठी ४० मजूर एक दिवसाकरीता लागतात.

## मराठवाड्यात एक सीड्स व पाच टेक्स्टाइल पार्क

जालना येथे सीड्स पार्कसह मराठवाडा विभागात पाच इंटिग्रेटेड टेक्स्टाइल पार्क उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. जालना येथे पीक प्रात्यक्षिक, कृषी प्रदर्शन, प्रयोगशाळा आणि शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार रावसाहेब दानवे होते तर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री बबनराव लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

बी-बियाणांच्या नवनिर्मिती व संशोधनात जालना जिल्हा अग्रेसर असून जालना येथे सीड्स पार्कची उभारणी करण्यात येईल. या पार्कमुळे मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची अर्थिक उन्नती होईल. या पार्कच्या उभारणीसाठी राज्य शासन ५० टक्के निधी देईल आणि उर्वरित ५० टक्के निधी पीपीपीच्या माध्यमातून उभारण्यात येईल.

## तारांकित

### 'नॉट आऊट १००९'

दहावीत शिकणाऱ्या कल्याणच्या के. सी. गांधी शाळेच्या प्रणव धनावडे याने शालेय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत क्रिकेटमध्ये ५ जानेवारी २०१६ रोजी नाबाद १००९ धावा बनवून एक नवा विक्रम रचला. यात त्याने ५९ षटकार तर १२९ चौकार फटकावले. प्रणवचा एक हजार धावांचा विश्वविक्रम ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. प्रणवच्या विश्वविक्रमामुळे फक्त महाराष्ट्राचा नव्हे तर देशाचा गौरव झाला आहे. प्रणवच्या या कामगिरीचा राज्य



शासनाच्या वतीने सन्मान करण्यासाठी क्रीडा विभागाच्या वतीने प्रणवच्या क्रिकेट प्रशिक्षणाकरिता आवश्यक सर्व मदत करण्यात येईल. प्रणवच्या पुढील शिक्षणासाठी राज्य शासनामार्फत मदत केली जाईल, असे शालेय शिक्षण आणि क्रीडा मंत्री विनोद तावडे यांनी स्पष्ट केले आहे.

प्रणवच्या या विश्वविक्रमी खेळाबद्दल क्रीडामंत्र्यांनी त्याच्या वडलांशी बोलून प्रणवचे अभिनंदन केले. प्रणवच्या क्रिकेट आणि शिक्षणासाठी कशा प्रकारे मदत करता येईल हे त्याच्या वडलांशी बोलून ठरवण्यात येईल, असेही श्री. तावडे यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री साहाय्यता निधीमधून मिळणाऱ्या वैद्यकीय अर्थसाहाय्याच्या रकमेत वाढ

मुख्यमंत्री साहाय्यता निधीमधून नागरिकांना वैद्यकीय उपचारासाठी देण्यात येणाऱ्या वैद्यकीय अर्थसाहाय्याच्या रकमेत वाढ करण्याबरोबरच नव्याने काही शस्त्रक्रियांचा समावेश देखील करण्यात आला आहे. लिव्हर ट्रान्सप्लांट, बोन मॅरो ट्रान्सप्लांट, हॉर्ट ट्रान्सप्लांट, कृत्रिम अवयव रोपण, नवजात बालकांवरील अतिदक्षता विभागातील उपचाराचा या अर्थसहाय्यात नव्यानेच समावेश करण्यात आला आहे.



मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून गरजू नागरिकांना यापूर्वी दोन लाखांपर्यंत मदत देण्यात येत होती, त्यात सुधारणा करून आता ही रक्कम तीन लाखांपर्यंत देण्यात येणार आहे.

लिव्हर ट्रान्सप्लांट, बोन मॅरो ट्रान्सप्लांट, हॉर्ट ट्रान्सप्लांट यासाठी अंदाजित खर्च दहा लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास तीन लाख रुपये, कृत्रिम अवयव रोपणासाठी अंदाजित खर्चाच्या ५० टक्के किंवा एक लाख रुपये यापैकी कमी असलेली रक्कम, नवजात बालकांवरील अतिदक्षता विभागातील उपचारासाठी अंदाजित खर्चाच्या ५० टक्के किंवा एक लाख रुपये यापैकी कमी असलेली रक्कम मदत म्हणून देण्यात येणार आहे.

२० हजार रुपयांपर्यंत खर्चासाठी पूर्वी पाच हजार रुपये मदत देण्यात येत होती, ती डिसेंबर २०१४ मध्ये वाढवून दहा हजार रुपये करण्यात आली. २० ते ४० हजार रुपयांच्या खर्चासाठी पूर्वी साडेसात हजार रुपये मदत देण्यात येणारी रक्कम १५ हजार करण्यात आली. ५० हजार ते एक लाख रुपयांपर्यंतच्या खर्चासाठी पूर्वी दहा हजार रुपये मदत देण्यात येत होती. या मदतीत सुधारणा करून आता दहा हजार ते एक लाखापर्यंतच्या खर्चासाठी ५० हजार रुपये किंवा अंदाजित खर्चाच्या ५० टक्के रक्कम यापैकी कमी असलेली रक्कम मदत म्हणून देण्यात येणार आहे.

एक लाख ते तीन लाखापर्यंतच्या खर्चास पूर्वी १५ हजार रुपये मदत देण्यात येत होती, ती डिसेंबर २०१४ मध्ये वाढवून ३० हजार करण्यात आली होती, आता ही मदतीची रक्कम खर्चाच्या ५० टक्के किंवा एक लाख रुपये यापैकी कमी असेल. तीन ते पाच लाखापर्यंत पूर्वी २० हजार रुपये मदत देण्यात येत होती, ती वाढवून ४० हजार करण्यात आली, आता दीड लाख किंवा खर्चाच्या ५० टक्के रक्कम मदत म्हणून देण्यात येणार आहे. पाच लाखांच्यावर खर्च असल्यास पूर्वी २५ हजार रुपये मदत देण्यात येत होती, ती डिसेंबर २०१४ मध्ये ५० हजार करण्यात आली होती. आता दोन लाख रुपयांपर्यंत मदत मिळणार आहे.

## ६० हजार ऑटोरिक्षा परवान्यांचे फेरवाटप



शासनाने राज्यामध्ये ६० हजार ऑटोरिक्षा परवान्यांचे फेरवाटप करण्याचा निर्णय घेतला असून ऑनलाइन पद्धतीने लॉटरी प्रक्रिया सुरू केली असल्याचे परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी सांगितले.

ऑटोरिक्षा परवान्यासाठी महाऑनलाइनच्या संकेतस्थळावर लॉटरीसाठी अर्जदारांनी अर्ज करणे आवश्यक आहे. हे अर्ज पहिल्यांदाच मराठीतून उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आतापर्यंत यासाठी २३,५४८ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ९७ अर्ज महिलांनी केले आहेत. यामध्ये महिलांना पाच टक्के परवान्यांचे आरक्षण ठेवण्यात आले आहे. तसेच महिलांना ऑटोरिक्षा परवाने मिळवण्यासाठीची एक वर्ष अनुज्ञप्ती अनुभवाची अटदेखील काढून टाकण्यात आली आहे.

### तारांकित ★★★★★★

## गौरव सहस्त्रबुद्धेचा मरणोत्तर 'भारत पुरस्कार'ने गौरव

देशातील २५ बालकांना शौर्य पुरस्काराने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २४ जानेवारी रोजी गौरवण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील ४ बालकांचा समावेश आहे. शौर्य पुरस्कारामधील सर्वोच्च 'भारत पुरस्कार' नागपूरच्या गौरव सहस्त्रबुद्धे याला मरणोत्तर देण्यात आला. जळगाव जिल्ह्यातील कोथळीच्या निलेश भील, वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वेच्या वैभव घंगारे आणि मुंबईतील वाळकेश्वरच्या मोहीत



दळवीला राष्ट्रीय शौर्य पुरस्काराने गौरवण्यात आले.

दहावीत शिकणारा नागपूरचा गौरव सहस्त्रबुध्दे याने अंबाझरी तलावात बुडणाऱ्या ४ मित्रांचा प्राण वाचवला. तीन मित्रांना पाण्यातून बाहेर काढल्यानंतर चौथ्याला बाहेर काढत असतानाच गौरव पाण्यात बुडाला. गौरवच्या या साहसी कर्तृत्वासाठी त्याला 'भारत पुरस्कार' प्राप्त झाला. गौरवची आई रेखा सहस्त्रबुध्दे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. शौर्य पुरस्कार प्राप्त निलेश भिल याने कोथळी येथे संत मुक्ताईच्या दर्शनासाठी आलेल्या भागवत उगले ११ वर्षांच्या मुलाला पाण्यात बुडताना वाचवले. वैभव घंगारे याने पुरात वाहून जाणाऱ्या सुहास बोरकर या मित्राचे प्राण वाचवले. आठवीतील मोहीतने मुंबईतील वाळकेश्वर भागातील तलावात बुडत असलेल्या मुलीचे प्राण वाचवले. मोहीतच्या आई-वडलांचे निधन झाले असून तो आत्याकडे राहतो.

कुलाबा किल्ला



# सरखेल कान्होजी आंग्रे

**शिवाजी महाराजांच्या आरमारात मायनाक भंडारी आणि दौलतखान यासारखे कसलेले दर्यावर्दी होते. या दोघांनी मराठी आरमाराची मदार सांभाळत खांदेरी हा भक्कम किल्ला बांधून काढला. त्या वेळी परिस्थिती अशी होती की, गवंडी खांदेरी बेटावर किल्ला बांधत होते आणि समुद्रात महाराजांचे आरमार इंग्रजांशी लढा देत होते. इंग्रजांचे प्रयत्न निष्फळ ठरले आणि अनुभव नसलेल्या महाराजांच्या आरमाराने इंग्रजांच्या अनुभवी आरमाराचा दणदणीत पराभव केला. त्यानंतर इंग्रजांनी अनेकवेळा हल्ले करून खांदेरी घेण्याचे प्रयत्न केले पण त्यांचा वेळोवेळी मराठ्यांनी पराभव केला.**

पोर्तुगीज, इंग्रज, डच या परकीय शक्तींना थोपवण्यासाठी शिवाजी महाराजांनी पश्चिम किनाऱ्यावर मराठी साम्राज्याच्या आरमाराची उभारणी १७ व्या शतकात केली. या तीनही युरोपियन सत्ताधीशांकडे उच्च तंत्रज्ञानाने सुसज्जित असे आरमार होते. याउलट मराठ्यांकडे आरमार उभे करण्याचा कोणताही अनुभव नव्हता. तरीही जिद्द आणि प्रखर इच्छाशक्तीच्या जोरावर शिवाजी महाराजांनी कल्याण, संगमेश्वर यासारख्या ठिकाणी बोटी बांधण्यास सुरुवात केली. याचा उपयोग महाराजांना खांदेरी, जंजिरा यासारख्या सागरी मोहिमांमध्ये झाला. खांदेरी हे बेट कोणाचे यावरून इंग्रज आणि मराठे यांच्यात कलह सुरू झाला. त्याचवेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी खांदेरी या बेटावर किल्ला बांधण्याचा निर्णय घेतला. महाराजांच्या आरमारात मायनाक भंडारी आणि दौलतखान यासारखे कसलेले दर्यावर्दी होते. या दोघांनी मराठी आरमाराची मदार सांभाळत खांदेरी हा भक्कम किल्ला बांधून काढला. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या निधनानंतर मराठ्यांचे आरमार थोडे विस्कळित झाले.



अलिबाग येथील कान्होजी आंग्रे यांचा पुतळा.

पण याच सुमारास कोकणात सुवर्णदुर्ग येथील सिद्दीविरुद्ध झालेल्या लढाईमध्ये एका तरुण योद्ध्याचा उदय झाला. त्याचे नाव होते कान्होजी आंग्रे. कान्होजी हे राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या किल्लेदाराकडे काम करीत होते.

### मराठी आरमाराचे मुख्य अधिकारी

कान्होजींचा पराक्रम पाहून राजाराम महाराजांनी त्यांना सुवर्णदुर्गावर मोठे जबाबदारीचे काम दिले. पुढे साधारणतः इ.स. १६९८ मध्ये सिदोजी गुजर यांच्या मृत्यूमुळे कान्होजी आंग्रे मराठी आरमाराचे मुख्य अधिकारी झाले. कान्होजींच्या काळात मराठी आरमाराचा मुख्य तळ हा कुलाबा किल्ला येथे असायचा. कुलाब्याचे बांधकाम छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरीस सुरू झाले आणि महाराजांच्या मृत्यूपूर्वी ते पूर्ण झाले होते. पुढे कान्होजींनी जेव्हा मराठी आरमाराची सूत्रे हाती घेतली, तेव्हा ते महाराणी ताराबाई यांच्या आधिपत्याखाली काम करीत होते. पुढे छत्रपती शाहू महाराजांच्या सुटकेनंतर बाळाजी विश्वनाथ भट आणि कान्होजी आंग्रे यांच्यात तह झाला. या तहातील अटीनुसार कान्होजी, शाहू महाराजांच्या पक्षात सामील झाले. खांदेरी, कुलाबा, सागरगड यांसारखे किल्ले

**डॉ. सचिन जोशी**

आणि आसपासचा मुलूख तहामध्ये कान्होजींना देण्यात आला. शाहू महाराजांनी कान्होजी आंग्रेंना 'सरखेल' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. कान्होजींच्या कारकिर्दीत त्यांचे अनेक वेळा सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज यांच्याशी लढाईचे प्रसंग आले. या सगळ्यांवर मात करून त्यांनी कुलाबा, खांदेरी, सागरगड हे किल्ले राखले.


## कान्होजी आंग्रे द्वीप

कुलाबा इतकाच कान्होजी आंग्रे यांचा अत्यंत महत्त्वाचा किल्ला म्हणजे खांदेरी. हा किल्ला ज्या बेटावर आहे त्या बेटाला मुंबईकर इंग्रजांनी 'केन्री' असे नाव दिले होते. शिवाजी महाराजांनी बांधलेला हा किल्ला इंग्रजांना टक्कर देत कान्होजीच्या काळात मोठ्या दिमाखात उभा होता. इ.स. १७१८ साली हा किल्ला जिंकण्याचा पुन्हा एकदा इंग्रजांनी प्रयत्न केला. पण इंग्रजांकडील एका नोकराने त्यांच्याशी फितुरी करून कान्होजींना पत्र पाठविले. खांदेरीवर कधी आणि कसा हल्ला होणार आहे, याची आगाऊ सूचना या नोकराने पत्राद्वारे कान्होजींना कळवली. त्यामुळे पुन्हा एकदा इंग्रजांचा पराभव झाला. इ.स. १७४० मध्ये इंग्रज आणि सिद्दी यांनी संयुक्तपणे खांदेरी जिंकण्याचे प्रयत्न केले. तरीही त्यांनासुद्धा पराभवाचे तोंड पाहावे लागले. इ.स. १७५५ च्या मराठे-इंग्रज तहामध्ये काही काळ किल्ला इंग्रजांकडे गेला होता पण लगेचच मराठ्यांनी तो जिंकून घेतला. याचाच अर्थ खांदेरी किल्ला जवळजवळ १३९ वर्षे मराठ्यांकडे होता. कान्होजींच्या या ऐतिहासिक कामगिरीचे स्मरण राहावे म्हणून खांदेरी या बेटाचे नामकरण 'कान्होजी आंग्रे द्वीप' असे केले आहे.

## अष्टागर

'अष्टागर' ही संज्ञा महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील रेवसच्या किंवा धरमतर खाडीपासून दक्षिणेला कुंडलिका नदीच्या खाडीपर्यंतच्या परिसराला वापरली जाते. अष्टागर हा भाग दक्षिणोत्तर पसरला असून त्याची लांबी साधारणतः ३० किमी आहे. या अष्टागरामध्ये खांदेरी, उंदेरी, थळ, हिराकोट, कुलाबा, सर्जेकोट, सागरगड, चौल( राजकोट), रेवदंडा हे किल्ले येतात. कुलाबा हा आंग्रेकालीन अष्टागरामधील मुख्य किल्ला सध्याच्या अलिबाग गावाजवळील समुद्रात एका बेटावर आहे. श्री शिवछत्रपतींनी बांधलेल्या या किल्ल्यावर फक्त ओहोटीच्या वेळेसच जाता येते. भरतीच्या वेळी किल्ला सर्व बाजूने पाण्याने वेढलेला असतो आणि किनाऱ्यावरून तेथे पोहोचण्यासाठी सध्या बोटीची सुविधा नाही. भरतीच्या वेळी कोणीही किल्ल्याकडे जाण्याचा प्रयत्नही करू नये. २९ ऑगस्ट १८५७ रोजी भरतीच्या वेळी एक भीषण घटना किल्ल्याजवळ घडली. अलिबाग येथील आणि आंग्रे यांच्या राजघराण्यातील काही स्त्रिया व पुरुष भरतीच्या वेळी कुलाबा किल्ल्यावर जाण्यासाठी बंदरावर जमले. बोटीत एकूण ७५ स्त्री-पुरुष होते. बोट किल्ल्याजवळ आली आणि अचानक आलेल्या वादळामुळे ती उलटली. या अपघातात ७५ पैकी ५० व्यक्ती बुडून मृत्यू पावले.

कुलाबा किल्ला याची बांधणी समुद्रातील एका खडकावर केलेली असून किल्ला पूर्वपश्चिम पसरलेला आहे. गडाचा मुख्य दरवाजा किंवा महादरवाजा पूर्वाभिमुख आहे. महादरवाज्याच्या मधोमध श्री गणेशाचे शिल्प असून त्याच्या दोन्ही बाजूला हत्तींचे शिल्प आहे. याच दरवाज्याच्या सर्वात वरच्या भागात दोन शरभ शिल्पे दाखवलेली आहेत. किल्ल्यात प्रवेश केल्यावर प्रथम महिषासुरमर्दिनी या देवीचे देऊळ दिसते. स्थानिक लोक याला गुळबाईचे मंदिर असे म्हणतात. मंदिराजवळून पायवाट पश्चिमेकडील यशवंत दरवाज्याकडे जाते. याच वाटेवर डावी-उजवीकडे किल्ल्यातील मुख्य वाड्याचे, सदरेचे आणि इतर वसाहतीचे अवशेष दिसून येतात. इ.स. १८३९ मध्ये कुलाबा संस्थानच्या अस्तानंतर किल्ल्यातील वाड्यांच्या बांधकामातील दगड आणि लाकूड याचा लिलाव झाला. हे दगड अलिबाग गावातील पाणीपुरवठा योजनेसाठी वापरले गेले. किल्ल्यामध्ये गणेश पंचायतन हे सर्वात मोठे मंदिर आहे. या मंदिराच्या मूळ बांधकामाबद्दल निश्चित माहिती मिळत नाही. या मंदिरात श्री गणेश ही मुख्य देवता असून त्याच्या बाजूने शिव, विष्णू, सूर्य, देवी अशा चार इतर देवतांच्याही मूर्ती आहेत. मंदिरासमोर एक मोठे तलाव बांधलेला आहे आणि त्यात उतरण्यासाठी सर्व बाजूने पायऱ्या बांधलेल्या आहेत. किल्ल्याच्या पश्चिमेकडील टोकाकडे 'यशवंत दरवाजा' नावाचा एक उत्तम बांधणीमधला दरवाजा आहे. कुलाबा आणि सर्जेकोट य दोन किल्ल्यांमधील भागात भरतीच्या वेळी पाणी येत असे आणि दोघांमधील संपर्क तुटत असे. यावर पर्याय म्हणून दोन किल्ल्यांना जोडणारा एक दगडी पूल बांधला गेला. आजही महादरवाज्यासमोरील भागात या पुलाचे अवशेष दिसून येतात. पश्चिम किनाऱ्यावर पराक्रम गाजवणाऱ्या कान्होजी आंग्रे या शूरवीराची समाधी अलिबाग गावात आहे. कुलाबा आणि खांदेरी ही खऱ्या अर्थाने कान्होजीच्या पराक्रमाची स्मारके आहेत असे म्हणता येईल.





**(लेखक पुणे येथील डेक्कन महाविद्यालयात पुरातत्त्व विभागात संशोधक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**




## कान्होजी आंग्रे बेटावर प्रवासी जेट्टीची पायाभरणी

२०१७ हे वर्ष 'व्हिजिट महाराष्ट्र' वर्ष असून यानिमित्ताने मुंबईलगतच्या समुद्रातील बेटांवर पर्यटन विकासाच्या तसेच या ठिकाणी सुरक्षेचा चोख बंदोबस्त करण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्यात येत आहे. गेट वे ऑफ इंडियापासून ९ सागरी मैलांवर, कान्होजी आंग्रे बेटावर उभारण्यात येणाऱ्या प्रवासी जेट्टीच्या पायाभरणी कार्यक्रमाच्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. केंद्रीय नौकानयन मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय अवजड उद्योग मंत्री अनंत गीते, रायगडचे पालकमंत्री प्रकाश महेता यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री या वेळी म्हणाले की, मुंबईलगतच्या कान्होजी आंग्रे बेटासारखी काही बेटे पर्यटनासाठी विकसित केली जाऊ शकतात. इथे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणासुद्धा उभारली जाऊ शकते. केंद्राने पर्यटनासाठी द्वीपगृह विकसित करण्याचे ठरवले आहे. ही योजना चांगली असून प्रवासी जेट्टीच्या माध्यमातून पर्यटकांना अशा ठिकाणी उतरण्याची सोय करता येईल.

लवकरच राज्याचे नवे बंदर धोरण जाहीर करण्यात येईल. जलवाहतुकीला चालना देण्यासाठी वेस्टर्न फ्रंटलाइनचा प्रस्ताव लवकरच पाठवण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# स्वर्ग पक्ष्यांचा...

**गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव बांध हे अभयारण्य प्राण्यांसाठी कमी आणि पक्ष्यांसाठीच अधिक ओळखले जाते. १३४ किलोमीटरचा विस्तार असलेल्या या जंगलातील इटिया डोह धरण आणि नवेगाव बांध तलाव अशा दोन मोठ्या जलाशयाची साथ या अभयारण्याला आहे. या जलाशयांव्यतिरिक्त मुबलक पाण्याचे साठे आहेत. माधवझरी, राणी डोह, श्रृंगारबोडी यासारखे अनेक जलाशयसुद्धा आहेत. परिसरातील वृक्षराजीमुळे असंख्य पक्षी येथे येतात. संपूर्ण महाराष्ट्रात आढळणाऱ्या निम्म्या अधिक प्रजाती नवेगाव बांध परिसरात आढळत असल्याने हा पक्ष्यांचा स्वर्ग तर पक्षीप्रेमींचे आवडते डेस्टिनेशन झाले आहे.**

**राखी चव्हाण**

भरतपूर सोडले तर नवेगांव बांधइतके पक्षी कुठेच दिसून येत नाहीत. या अभयारण्यात दरवर्षी हिवाळ्यात जगभरातील स्थलांतरित पक्षी भेट देतात. नवेगाव तलावावरील निवांत आणि निरव शांततेत पक्षी निरिक्षणाचा आनंद आणखी अवर्णनीय आहे. परदेशी पक्ष्यांसाठी हे आवडते ठिकाण आहे. कारण येथे त्यांना आवश्यक असलेले खाद्य आणि वातावरण उपलब्ध होते. मात्र, अलीकडच्या काळात परदेशी सैबेरियन पक्षांचे आवडते देवधान याठिकाणी नाही. बेशरम वनस्पतींनी त्याची जागा व्यापल्यामुळे आणि त्यांचे जाळे विस्तारले गेल्यामुळे हे पक्षी येथे आता क्वचितच पाहायला मिळतात. कधीकाळी लाखाहून अधिक पक्षी या ठिकाणी येत होते, ही संख्या आता अतिशय कमी झाली आहे. या वनस्पतीमुळे तलावाच्या काठावर असणाऱ्या झाडांमध्ये व दलदलीत अंडी देण्यासाठी येणाऱ्या पक्ष्यांचे प्रमाणही खूप कमी झाले आहे. त्यामुळे कुठेतरी हे पक्षी पुन्हा परततील या












### कसे जाल?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ नागपूर (१५० कि.मी.)
गोंदिया रेल्वे स्थानक (६५ कि.मी.)
नवेगाव बसस्थानक (अभयारण्यापासून १० कि.मी.)
जवळचे प्रेक्षणीय ठिकाण
नागझिरा अभयारण्य (६० कि.मी.)
इटिया डोह धरण (२० कि.मी.)
तिबेटीयन कॅम्प आणि प्रतापगड (१५ कि.मी.)

### कुठे राहाल?

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि वनविकास महामंडळाची निवासस्थाने याठिकाणी पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत. याशिवाय यूथ होस्टेलसुद्धा आहे. हिवाळ्यात येथे थंडी तर उन्हाळ्यात तापमान ४० अंशापेक्षाही अधिक असल्याने त्यानुसार कपडे सोबत ठेवणे योग्य असते.

### केव्हा जाल?

नवेगाव बांध या पर्यटन स्थळाच्या भेटीसाठी केव्हाही जाता येते. मात्र या पर्यटन स्थळाच्या भेटीसोबतच पक्षी निरीक्षण करण्याचा अमर्याद आनंद घ्यायचा असेल तर नोव्हेंबर ते फेब्रुवारी हा काळ अतिशय योग्य आहे, कारण या कालावधीत देश-विदेशातून अनेक दुर्मीळ पक्षी येथे येतात. त्यावेळी त्यांचे दर्शन घडू शकते.

दृष्टीने गेल्या काही वर्षात पक्षीप्रेमींनी सुरू केलेल्या प्रयत्नांना आता यश येऊ लागले आहे. पक्ष्यांचे थवे पुन्हा परतायला लागले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा पक्षिनिरीक्षक आणि पर्यटकांचा ओघ या ठिकाणी सुरू झाला आहे.

नवेगाव बांधची ओळख म्हणजे सारस पक्षी! तोही गेल्या काही वर्षात जवळजवळ नाहीसा झाला होता. एकत्रित येऊन हे पक्षी नृत्य करायचे आणि आपला जोडीदार निवडायचे. त्याला 'सारसनाची' असे म्हटले जात. आता ही सारसनाची येथे पाहायला मिळत नाही, पण सारस संवर्धनासाठी मानद वन्यजीव रक्षक सावन बाहेकर यांच्या पुढाकाराने सुरू असलेल्या प्रयत्नांना हळूहळू यश यायला सुरुवात झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात केवळ गोंदिया जिल्ह्यात सारस पाहायला मिळतात. सावन बाहेकर यांनी गावकऱ्यांच्या सोबतीनेच सारस संवर्धनासाठी सुरू केलेले प्रयत्न आता प्रगतिपथावर आहेत. सारसांच्या जोड्या या जिल्ह्यातील काह्री ठिकाणांवर पाहायला मिळत आहेत. सारसनाचीत पूर्वी ४० ते ५० सारस एकत्रित पाहायला मिळायचे. आता एवढ्या मोठ्या संख्येने नाही, पण अर्ध्याअधिक प्रमाणात दोन वर्षापूर्वी एकत्रित सारसांचे अस्तित्व या ठिकाणी दिसून येते. त्यामुळे नवेगांव बांधसाठी हे एक सुचिन्ह मानले जात आहे. त्यामुळे पर्यटकांनी आता नवेगाव बांधला येण्यास काहीच हरकत नाही. नवेगाव बांधचे अस्तित्व आणि वैभव आता पुन्हा परतायला लागले आहे. नवेगाव हे पक्ष्यांसाठी ओळखले जात असले तरीही वाघांची संख्या या ठिकाणी बऱ्यापैकी होती. या वाघांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. वाघाशिवाय बिबट, अस्वल, राजगवा, सांबर, नीलगाय, चौसिंगा, रानडूकर, चितळ, रानकुत्रे यासारखे प्राणी अजूनही काही प्रमाणात येथे दिसून येतात. याशिवाय क्रेस्टेड सर्पंट ईगल, क्रेस्टेड हॉक ईगल, ग्रे जंगल फाऊलर, रेड क्रेस्टेड पोचार्ड असे अनेक प्रकारचे पक्षी येथे पाहायला मिळतात. नवेगाव बांधला जंगल सफारी करताना वाघ डोळ्यासमोर ठेवून जाऊ नका, कारण तो दृष्टीस पडेलच असे नाही, मात्र, हे जंगल अनुभवण्यात एक वेगळीच मजा आहे.

### अभयारण्याची वैशिष्ट्ये

नागपूरहून सुमारे २०० किलोमीटर अंतरावर असलेले आणि १३५ किलोमीटर अंतरावरील क्षेत्रात पसरलेले नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान ! घनदाट जंगलांनी वेढलेल्या या उद्यानात सर्वात मोठा मानवनिर्मित तलाव ! त्यापासून जवळच इटिया डोह धरण, नवेगाव बांध अभयारण्याची ही खास वैशिष्ट्ये, नवेगाव तलावाच्या बाजुला असलेल्या 'संजय कुटीर' मध्ये राहणे एक आगळावेगळा अनुभव ठरतो. इथल्या खोल्या झाडावर आहेत. त्यामुळे खरे जंगलाचे 'फील' येथे अनुभवायला मिळते. येथून अंदाजे २ किलोमीटर अंतरावर यूथ होस्टेल आहे. या संजय कुटीरमधून तलावाच्या काठावर रात्री हरणांचे लकाकणारे डोळे निरखणे हा अत्यंत रोमहर्षक अनुभव असतो.

### ऐतिहासिक नवेगाव तलाव

विदर्भात सुमारे सात शतकांपूर्वी पाण्याचा दुष्काळ जाणवू लागला. तेव्हा तत्कालीन गोंड राणी दुर्गावतीने तलावनिर्मितीत निपुण असलेली राजस्थानातील कोहली समाजाची माणसे बोलावली. या लोकांनी गोदियांच्या आसपास बरीच तळी खोदली. त्यातलाच एक तलाव म्हणजे नवेगाव तलाव! या अभयारण्याचा प्राण असलेले माधवराव डोंगरवार पाटील यांचे हे पूर्वज. नवेगाव तलावाने पूर्वी गोंड आदिवासी राज्य त्यानंतर ब्रिटिश राज्य आणि भारताचे स्वतंत्र राज्यही अनुभवले आहे. माधवराव डोंगरवार पाटील आणि अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या मैत्रीचे किस्से या अभयारण्यात हमखास ऐकायला मिळतात.



**(लेखिका या वन्यजीव अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९५२७७०७१००**

# तिकीट कलेक्टर ते डिस्ट्रिक्ट कलेक्टर

माझा जन्म कर्नाटक राज्यातील रायचूर जिल्ह्यातील जवलगेरा या अत्यंत दुर्गम आणि मागासलेल्या गावात झाला. घरी थोडीफार शेती आणि छोटे किराणा मालाचे दुकान होते. घरी शेती असल्यामुळे लहानपणी शेतीतही काम करावे लागायचे. पण शिक्षणाची आवड होती. त्यामुळे शाळेतही जात होतो.

दहावी झाल्यावर घरच्या परिस्थितीमुळे पुढच्या शिक्षणाचा प्रश्नच नव्हता. पण नोकरीची मात्र नितांत आवश्यकता होती. अशातच मला भारतीय रेल्वेतर्फे चालवल्या जाणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमाची (व्होकेशनल कोर्स)ची माहिती मिळाली. यासाठी दहावी उत्तीर्ण एवढी पात्रता पुरेशी होती. १५व्या वर्षीच माझी यासाठी निवड झाली. व्होकेशनल कोर्स इन रेल्वे कमर्शियलचे प्रशिक्षण नांदेड या रेल्वे विभागात दोन वर्ष घेतले. सकाळी कॉलेज आणि दुपारी नोकरी असे स्वरूप असायचे. प्रशिक्षणानंतर १७व्या वर्षी, दि. ७ ऑक्टोबर २००२ रोजी महाराष्ट्रातील नांदेड रेल्वे विभागातील पुर्णा येथे तिकिट कलेक्टर म्हणून माझी नेमणूक झाली. या नेमणुकीपासूनच मला महाराष्ट्राविषयी आत्मीयता वाटू लागली.

## अस्वस्थतेतील भारत दर्शन

तिकिट कलेक्टर म्हणून वेगवेगळ्या दूरपल्ल्यांच्या प्रवासी गाड्यांमुळे मला संपूर्ण भारत पाहता आला. एकीकडे तिकिटासाठी दहा रुपयेही नाहीत म्हणून नाईलाजाने विनातिकिट प्रवास करणारे गरीब प्रवासी भेटत तर कधी वातानुकूलित डब्यात विनातिकिट प्रवास करणारे श्रीमंत प्रवासी दंडापोटी हजाराची नोट अक्षरश: अंगावर फेकत. एकाच गाडीत आढळणारी प्रवाशांमधील ही तफावत मला अस्वस्थ करीत असे. आपण काहीतरी करायला पाहिजे, असे सारखे वाटू लागले. आणखी काही करायचे म्हणजे पुढे शिक्षण घ्यायला हवे होते आणि नोकरीचीही गरज असल्यामुळे नोकरी सोडणेही शक्य नव्हते. म्हणून मग मी आंध्रप्रदेशातील उस्मानिया विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाच्या बी.कॉमच्या अभ्यासक्रमासाठी नाव नोंदवले. तिकिट कलेक्टर म्हणून नोकरी करत करतच दूरशिक्षणाद्वारे मी बी.कॉमची पदवी प्राप्त केली. या पदवीनंतर मी एम.कॉमचे एक वर्षदेखील पूर्ण केले.



**अकोल्याचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असणारे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी जी.श्रीकांत यांचा तिकिट कलेक्टर ते डिस्ट्रिक्ट कलेक्टर या पदापर्यंत झालेला प्रवास अत्यंत प्रेरणादायी असाच आहे. जाणून घेऊ या त्यांचा प्रवास कसा होत गेला, ते कसे घडत गेले आणि अधिकारी झाल्यावर त्यांनी कशा उर्मीने कामाला सुरूवात केली याविषयी...**

**देवेंद्र भुजबळ**

## दिशा सापडली

मनाप्रमाणे निश्चित दिशा सापडत नव्हती. ही दिशा दाखविण्याचे काम माझ्या कमल या मित्राने केले. त्याने मला केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांविषयी माहिती दिली. तो स्वत:ही या स्पर्धा परीक्षांची तयारी करीत होता. त्याच्या मार्गदर्शनानुसार मी या परीक्षांची चांगली ओळख व्हावी, मार्गदर्शन मिळावे म्हणून सहा महिने बिनपगारी रजा घेतली आणि दिल्ली गाठली. दिल्लीत स्पर्धा परीक्षांविषयक शिकवणी वर्गांमध्ये नाव नोंदवून मी सहा महिने प्रशिक्षण घेतले. २००७ पासून मी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली. दर्जेदार वाचन साहित्य वाचले. भुगोलसाठी माजीद हुसेन यांचे तर मानस शास्त्रासाठी मुकुंद पाटील यांचे पुस्तक अभ्यासले.

आपल्याला गावातील गरिबी, गावाचे प्रश्न सोडवायचे असतील, प्रवासात भेटणाऱ्या गरीब–श्रीमंत प्रवाशांमधील फरक मिटवायचा असेल, समाजातील गरिबी, अस्वच्छता, अज्ञान दूर करायचे असेल तर आपण आय.ए.एस. झालेच पाहिजे, असा मी निर्धार केला. एखाद्या प्रश्नाचा भाग होण्यापेक्षा आपण उत्तराचा भाग बनले पाहिजे, असे मला वाटू लागले होते. शेवटी अथक प्रयत्नांनी २००९ मध्ये दुसऱ्या प्रयत्नात ९७ वी रँक मिळवून आणि मी आय.ए.एस. झालो. मी गरीब शेतकऱ्याचा मुलगा तिकीट चेकर ते आयएएसपर्यंतचा प्रवास केवळ परिश्रमातून करू शकलो. आपणही ते करू शकता. मी स्वामी विवेकानंदांचे एक वाक्य सदैव मन:चक्षूसमोर ठेवले,

Arise, awake and don't stop till the goal is achieved.

आपणही या वाक्याचे सदैव स्मरण ठेऊन या परीक्षेची तयारी करावी.

## नवी संधी

आयएएसचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर योगायोगाने माझी नेमणूक नांदेड येथेच असिस्टंट कलेक्टर म्हणून झाली. ११ महिने काम केल्यावर नांदेड जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकर परदेशी यांच्या सोबत काम केले. त्यांच्याकडून खूप शिकता आले. नंतर नांदेड वाघाळा महानगरपालिका आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. मी अडीच वर्ष तेथे आयुक्त म्हणून काम पाहिले. त्या ठिकाणी नांदेड सेफ सिटी जेएनएनयूआरएमचे कार्यक्रम, बीएसयूपी अंतर्गत १५ हजार घरकुलांचे बांधकाम, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट मैदान आदी महत्त्वपूर्ण कामे केली.

त्यानंतर माझी नेमणूक सातारा जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून झाली. तेथे जवळपास मी साडेनऊ महिने काम केले. स्वच्छ भारत अभियानमध्ये सातारा जिल्हा प्रथम आला. त्यात प्रारंभी माझे योगदान राहिले याचा मला आनंद आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ग्रामीण पाणीपुरवठा योजना, अंगणवाड्यांची निर्मिती, डिजिटल शाळा निर्मिती, कुमठे ब्लॉकवर आधारित ज्ञानरचना पॅटर्न सुरू केला. आज संपूर्ण महाराष्ट्रात तो कुमठे पॅटर्न म्हणून प्रसिद्ध झाला.

प्रारंभीची नेमणूक मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यात झाल्याने आणि नंतरची नेमणूक पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात झाल्याने या दोन्ही भागातील तफावत लक्षात आली. या दोन पूर्णपणे वेगळ्या भागात काम

केल्याचा फायदा मला विदर्भातील अकोला जिल्हाधिकारी पदाची सूत्रे स्वीकारल्यावर अधिक झाला. दि. २५ मे २०१५ रोजी मी जिल्हाधिकारी, अकोला या पदाची सूत्रे स्वीकारली. दुसऱ्याच दिवशी जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या पात्र/अपात्र शेतकऱ्यांची यादी निश्चित करण्याची बैठक आयोजित करण्यात आली होती. काही प्रकरणे अपात्र जरी ठरलेली असली तरी त्यांच्याही घरातील कर्ता पुरुष गेल्याने त्यांच्या घरी काय परिस्थिती असेल हा विचार अस्वस्थ करीत होता.

## ठोस व नियोजनपूर्ण प्रयत्न

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत काही आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची भेट घेतली. एका घरी ज्यावेळेस आक्रोश करुन कुटुंबीयांनी सांगितले की, आम्हाला पैसे नकोत पण आमचा माणूस हवा. यावरून या कुटुंबीयांची मन:स्थिती समजून येत होती. केवळ आर्थिक मदत देऊन हा प्रश्न सुटू शकत नाही हे लक्षात आले. एकतर घरातील कर्ता पुरुष गेलेला, त्या घरातील बाईने घराबाहेर कधी पाऊलही टाकलेले नसते, मुले लहान असतात अशावेळेस केवळ आर्थिक मदतच न देता त्यांना धीर दिला पाहिजे, दिलासा दिला पाहिजे, त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी मदत व मार्गदर्शन केले पाहिजे यासाठी ठोस व नियोजनपूर्ण प्रयत्नांची गरज भासली. त्यातूनच 'मिशन दिलासा' उदयास व आकारास आले.

## मिशन दिलासा

'मिशन दिलासा' ची आम्ही दशसूत्री आखली आहे. यामध्ये १) अन्नसुरक्षा योजना २) शेतकऱ्याच्या आरोग्यविषयक अडचणी सोडवण्यासाठी आरोग्य शिबिर (राजीव गांधी जीवनदायी योजनांची प्रभावी अंमलबजावणी) ३) संरक्षित जलसिंचन (मागेल त्याला विहीर व शेततळ्याची योजना) ४) वीज जोडणी - मागेल त्याला वीज जोडणी/ सौर ऊर्जेसाठी प्रयत्न ५) सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन ६) शेतकऱ्यांचे प्रबोधन ७) प्रत्येक गावाकरिता अधिकारी / कर्मचारी दत्तक योजना ८) पशुसंवर्धन योजनांची प्रभावी अंमलबजावणी ९) आत्महत्यामुक्त गावांसाठी पुरस्कार / शपथ घेणे १०) शेतकरी कुटुंबातील सदस्यांसाठी कौशल्यविकास कार्यक्रम यांचा समावेश आहे. प्रत्येक संवेदनशील गावासाठी आम्ही एकेक अधिकारी / कर्मचारी नेमलेला आहे.

त्यांनी दर पंधरा दिवसांनी संबंधित कुटुंबीयांची भेट घ्यायची, त्यांना दिलासा द्यायचा, त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा म्हणून कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मदत करायची असे 'मिशन दिलासा' चे स्वरूप आहे. मी स्वत: अकोला तालुक्यातील डोंगरगाव दत्तक घेतले आहे.

## नवे संकल्प

आपण वर्षाच्या प्रारंभी नवीन वर्षासाठी काही संकल्प करत असतो. त्यानुसार आम्ही १ जानेवारी रोजी विविध गावांमध्ये विशेष ग्रामसभांचे आयोजन केले. या गावांमध्ये कितीही संकट आले तरी खचून न जाता आम्ही आत्महत्या करणार नाही, अशी शपथ ग्रामस्थांनी घेतली. मी स्वत: उगवा, मांडवा, डोंगरगाव येथील ग्रामसभांना उपस्थित राहिलो आणि ग्रामस्थांना शपथ दिली. त्यांना समजावून सांगितले की, या राज्यात परराज्यातून लोक येतात आणि त्यांचा चरितार्थ चालव-तात, असे असताना या राज्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्या करावी, ही बाब अत्यंत दु:खदायक आहे असे समजावले.




### यशाची सूत्रे

- **युपीएससीच्या उमेदवारांनी कठोर परिश्रमांची तयारी ठेवावी**
- **गरिबीचा बाऊ न करता जिद्दीने प्रयत्न करा.**
- **मोठी स्वप्न बघा, स्वप्नपूर्तीसाठी जीवाचे रान करा.**
- **आपल्यासमोर काही उदाहरण नसेल तर आपण स्वत:चेच उदाहरण इतरांसाठी निर्माण करा.**
- **टार्गेट ठेवून वाचन करा.**
- **यशाचा निर्धार करून प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करा.**
- **भरपूर वाचन व विश्लेषणात्मक क्षमता निर्माण करावी.**

## शेतकऱ्यांना मदत

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना ते शासनाच्या निकषानुसार मदत मिळण्यास पात्र असल्यास संबंधित कुटुंबीयांना शासनाची मदत मिळते. पण अपात्र ठरणाऱ्या कुटुंबीयांच्या समस्यादेखील तेवढ्याच गंभीर आहेत. त्यामुळे अशा कुटुंबीयांना मदत मिळावी म्हणून याबाबतीत ज्या व्यक्ती, संस्था मदत करू इच्छितात त्यांची मदत अशा कुटुंबीयांना दिली जाते. जेणेकरून या कुटुंबीयांनाही काही प्रमाणात मदत मिळेल. तसेच अशाही कुटुंबीयांचे समुपदेशन करण्यात येते. संवेदनशील गावांमध्ये संबंधित सरपंचांच्या अध्यक्षतेखाली 'बळीराजा समिती' नेमण्यात आली आहे. ही समिती संबंधित कुटुंबीयांना शोधून परिस्थितीशी सामना करण्यासाठी प्रेरित करण्याचे काम करते. उच्च न्यायालयाने 'मिशन दिलासा' या उपक्रमाची दखल घेऊन प्रशंसा केली आहे. असे जरी असले तरी जेव्हा जिल्ह्यातील आत्महत्या पूर्णपणे थांबतील, एकही आत्महत्या होणार नाही, अशी परिस्थिती निर्माण होईल तेव्हाच 'मिशन दिलासा' यशस्वी झाले असे म्हणता येईल आणि तो खराखुरा पुरस्कार असेल.

**(लेखक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात संचालक प्रशासन या पदावर कार्यरत आहेत.)**
**संपर्क: ०९८६९४८४८००**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्राकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने राज्यासाठी बरेच प्रकल्प मंजूर झाले व विविध योजनांसाठी निधी उपलब्ध झाला. सरत्या वर्षाअखेर महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी केंद्राकडून ३ हजार ५० कोटी रुपयांची मदत जाहीर झाली. हाच सकारात्मक उत्साह कायम राहत महाराष्ट्रासाठी देशाच्या राजधानीत वर्ष २०१६ ची सुरुवात यशस्वी ठरली.**



# गौरव महाराष्ट्राचा

**दयानंद कांबळे**

तेल व वायू संवर्धनासाठी महाराष्ट्राला देशातील सर्वोत्तम राज्याच्या पुरस्काराने गौरवण्यात आले. पुण्यातील मुळा-मुठा नद्यांच्या शुद्धीकरणासाठी जपानच्या जायका कंपनीसोबत केंद्र शासनाचा करार झाला. रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांनी 'मुंबई-काझीपेट'या वर्षातील पहिल्या रेल्वेगाडीचा व्हीडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून शुभारंभ केला. पंतप्रधानांच्या हस्ते महाराष्ट्रातील चार बालकांचा 'राष्ट्रीय बाल शौर्य' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. 'स्वीप' कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याचे उपमुख्य निवडणूक अधिकारी शिरीष मोहोड यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान करण्यात आला, तर राज्यशासनाच्यावतीने दिल्ली हाट येथे आयोजित महाराष्ट्राची संस्कृती, लघुउद्योग, हस्तकला यांचा अनोखा संगम असणाऱ्या 'महा-जत्रा' महोत्सवाला उदंड प्रतिसाद लाभला. वर्षारंभीच महाराष्ट्राचा असा वैविध्यपूर्ण गौरव राजधानीत दिसून आला.

### तेल व वायू संवर्धनासाठी महाराष्ट्राला सर्वोत्तम राज्याच्या पुरस्कार

देशात १६ ते ३१ जानेवारी हा 'तेल व वायू संवर्धन' पंधरवाडा म्हणून साजरा केला जातो. केंद्रीय पेट्रोलीयम व गॅस मंत्रालयांतर्गत कार्य करणाऱ्या पेट्रोलियम संवर्धन संशोधन मंडळाच्यावतीने येथील डीआरडीओ भवनात आयोजित समारंभात खनीज तेल व वायू मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते या पंधरवाडयाचे उद्घाटन झाले. मागील वर्षी 'तेल व वायू संवर्धन' पंधरवाड्यापासून देशभर सुरू झालेल्या जनजागृती कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाराष्ट्राला देशातील सर्वोत्तम राज्याच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याचे मुख्य सचिव स्वाधिन क्षत्रिय आणि अन्न व नागरी पुरवठा तथा ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव दीपक कपूर यांनी श्री. प्रधान यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

गेल्या वर्षभरात तेल व वायू संवर्धनासाठी उत्तम कार्य करणाऱ्या राज्यांचा अभ्यास करून हा पुरस्कार महाराष्ट्राला प्रदान करण्यात आला.

### 'मुळा-मुठा'साठी करार

पुण्यातील मुळा व मुठा नदीच्या शुद्धीकरणासाठी केंद्र सरकारने जपानमधील जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (जायका) या कंपनीशी सांमजस्य करार केला.

### दुष्काळ निवारणासाठी केंद्राकडून ३ हजार ५० कोटी रुपयांची मदत

गेल्या वर्षीच्या शेवटच्या आठवड्यात राज्यातील दुष्काळ निवारणासाठी केंद्रशासनाने ३ हजार ५० कोटी रुपयांची मदत जाहीर केली. नैसर्गिक आपत्तीमुळे दुष्काळाला सामोरे जाणाऱ्या राज्यांसाठी गठित करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीने ही घोषणा केली. केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या समितीच्या बैठकीत कृषिमंत्री राधा मोहन सिंग, नीती आयोगाचे उपाध्यक्ष अरविंद पांगरिया, केंद्रीय वित्त राज्यमंत्री जयंत सिन्हा, केंद्रीय गृहसचिव राजीव मेहरीश उपस्थित होते.

महाराष्ट्रात गेल्या ३ वर्षांपासून सतत दुष्काळी परिस्थिती आहे. केंद्रीय पथकाने राज्यातील दुष्काळ भागाची पाहणी करून आपला अहवाल केंद्र शासनाला सादर केला. त्यानंतर राज्याला ३ हजार ५० कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा करण्यात आली.

### आतापर्यंतची सर्वात मोठी मदत : मुख्यमंत्री

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मदतीसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे जाहीर आभार मानले. केंद्राडून राज्याला मिळालेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी मदत आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी ही अतिशय महत्त्वाची घोषणा असून दुष्काळाच्या सावटाखालील शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळाला असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.



नुकत्याच पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या कराराला मंजुरी देण्यात आली. येथील इंदिरा पर्यावरण भवनात केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर व जपानचे भारतातील राजदूत केंजी हिरामत्सु यांनी या करारावर सह्या केल्या. या करारानुसार मुळा आणि मुठेच्या शुद्धीकरणासाठी जपानची जायका कंपनी एक हजार कोटींचे कर्ज देणार आहे. ही शुद्धीकरणाची योजना जानेवारी २०२२ पर्यंत पूर्ण करण्यात येईल असे या करारात नमूद करण्यात आले आहे.

### ‘मुंबई–काझीपेट आनंदवन एक्सप्रेसचा’ शुभारंभ

रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी ‘मुंबई–काझीपेट आनंदवन एक्सप्रेस’ या साप्ताहिक एक्सप्रेस रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. मुंबईतील लोकमान्य टर्मीनस ते तेलंगानातील काझीपेट रेल्वे स्थानका दरम्यान ही रेल्वे धावणार आहे. मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनसहून आठवड्याच्या प्रत्येक सोमवारी सकाळी ११.३० वाजता ही रेल्वे गाडी तेलंगनातील काझीपेट रेल्वे स्थानकासाठी सुटेल. लोकमान्य टर्मिनसहून सुटल्यानंतर ठाणे, कल्याण, नाशिकरोड, भुसावळ, मलकापूर, अकोला, बडनेरा, धामनगांव, वर्धा, हिंगणघाट, वरोरा, चंद्रपूर, बल्लरशा या रेल्वे स्थानकांवर थांबेल. तेथून सिरपूर रेल्वे स्थानकाहून ही रेल्वे तेलंगनात प्रवेश करेल मंगळवारी पहाटे ६.४५ वाजता काझीपेट रेल्वेस्थानकावर ही रेल्वे पोहोचेल. एकूण १,११० कि.मी.चे अंतर १९ तासात ही गाडी पूर्ण करेन. परतीच्या प्रवासात मंगळवारी सायंकाळी ५.३० वाजता काझीपेटहून निघून बुधवारी १.४५ वाजता ही रेल्वे मुंबईतील लोकमान्य टर्मिनसवर पोहोचेल.



**(लेखक हे नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रामध्ये उपसंचालक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**

## नागपूर शहराच्या विकासासाठी फ्रान्ससोबत महाराष्ट्राचा करार

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी स्मार्ट सिटी योजनेंतर्गत नागपूर शहराचा विकास करण्यासाठी फ्रान्सीसी विकास संस्था (एएफडी) आणि महाराष्ट्र सरकार यांच्यामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष फ्रान्सीस्को ओलांद यांच्या उपस्थितीत चंदीगढ येथे आयोजित भारत–फ्रान्स व्यापार परिषदेत महत्त्वपूर्ण करार झाला. या परिषदेत महाराष्ट्रासोबतच पॉण्डेचेरी आणि चंदीगढ शहराच्या विकासासाठी असा करार करण्यात आला.

या करारानुसार नागपूर शहरातील वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, वास्तुशिल्प व वारसा क्षेत्राचा विकास, नवीन व नवीकरणीय ऊर्जाक्षेत्र विकास आदी क्षेत्रांमधे फ्रान्स तांत्रिक मदत देणार आहे. फ्रान्समधून या कामासाठी येणाऱ्या तंत्रज्ञ व तज्ज्ञांचा सर्व खर्च फ्रान्सीसी विकास संस्था उचलणार आहे.

### पंतप्रधानांनी मानले आभार

भारत–फ्रान्स व्यापार परिषदेला संबोधित करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात आधुनिक शहर निर्माण करण्याच्या दिशेने उचलण्यात आलेल्या पावलांची माहिती दिली. तसेच, नागपूरसह देशातील तीन शहरांमध्ये स्मार्टसिटी निर्माण करण्यासाठी फ्रान्सने घेतलेल्या पुढाकाराबाबत आणि उभय देशांमध्ये याबाबत झालेल्या द्विपक्षीय कराराबाबत फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांचे आभार मानले. या परिषदेत भारत व फ्रान्सच्या कंपन्यांमध्ये एकूण १६ करार झाले.





दैनिक लोकसत्ताच्या ६८ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात अभिनेते जितेंद्र जोशी यांच्या प्रश्नांना सामोरे जाताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

# खुर्चीपलीकडचे मुख्यमंत्री

**'लोकसत्ता'च्या ६८ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते ते म्हणजे जितेंद्र जोशी यांनी घेतलेली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत! मुलाखतीचा विषयच 'खुर्चीपलीकडचे मुख्यमंत्री' असा असल्याने उपस्थित श्रोत्यांनाही एक माणूस म्हणून देवेंद्र फडणवीस कसे आहेत, हे जाणून घ्यायची उत्सुकता होतीच. मुलाखतीच्या सुरुवातीलाच जितेंद्र जोशी यांनी, 'आता पुढील तासाभरासाठी तुम्ही मुख्यमंत्री नाही', असे सांगत फडणवीस यांना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली...**

लहानपणापासूनच तुम्ही चळवळ्या स्वभावाचे होतात का या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री नागपूरमधील त्यांच्या शाळेच्या आठवणींत हरवले. 'लहानपणी किंबहुना लहानपणापासूनच मी शांत स्वभावाचा आहे. शाळेतही एक शांत विद्यार्थी म्हणून माझी ओळख होती. म्हणजे, एखाद्या मित्राला शिक्षकांनी विनाकारण पकडले, तर तो माझी साक्ष काढायचा. म्हणजे, 'सर, आपण खरंच काही केलेलं नाही. वाटल्यास देवेंद्रला विचारा!', असं त्याचं उत्तर असायचं. मला आठवतं, माझा खूप चांगला मित्र आणि मी एका बेंचवर बसायचो. त्या वेळी इतर मुलं मस्ती करत असल्याने आमच्या वर्गशिक्षकांनी एक निर्णय घेतला. या निर्णयानुसार दोन मुलांच्या मध्ये एका मुलीला बसवण्यात आलं. पण माझ्या या मित्राने आम्हा दोघांच्या मध्ये बसलेल्या मुलीला इतका त्रास दिला की, शेवटी तिने शिक्षकांकडे जाऊन आपली जागा बदलून घेतली होती.' या आठवणीवर प्रेक्षकांमध्येही हशा पिकला.

'माझे वडील आमदार होते. त्यांचा लोकसंग्रह आणि लोकप्रपंचही प्रचंड होता. त्यामुळे ते कामानिमित्त सतत फिरत असायचे. रात्री कितीही उशिरा आले, तरी सकाळी लवकरच त्यांचा दरबार लागायचा. मग त्या दरबारात येणाऱ्या प्रत्येकाला चहा आणि पाणी नेऊन देण्याचे काम माझ्याकडे होते. मग कधीतरी आम्हाला ते सांगत की, आज रात्री आपण सिनेमाला जायचं! आम्ही सगळे तयार होऊन बसायचो. सिनेमा रात्री नवाला असायचा आणि वडील रात्री दहाच्या सुमारास घरी यायचे. मग आमची वरात चित्रपटगृहात जायची आणि दहा मिनिटांत मध्यंतर व्हायचा. आई त्यांच्यावर खूप वैतागायची. म्हणायची, 'कशाला उगाच मुलांना नसत्या आशा लावून ठेवता?' त्यावर वडिलांचं उत्तरही ठरलेलं असायचं. 'अगं, अशामुळे चित्रपटातला सस्पेन्स वाढतो.', आपल्या वडिलांबद्दलची ही आठवण त्यांनी उलगडली.

मुख्यमंत्री झाल्यानंतर तुमच्या मुलीच्या हट्टापायी तुम्ही तिला शाळेत सोडायला गेलात, ते नेमकं काय होतं, या प्रश्नाचं उत्तर देताना फडणवीस यांनी एक वडील म्हणून स्वतः आणि त्यांचे वडील यांची तुलनाच केली. 'आपण माझ्या वडिलांच्या १० टक्केही नाही. ते जनतेचा माणूस होते. त्यांचा जनसंपर्क दांडगा होता. तुमचे वडील आमच्याकडे दर दिवसाआड यायचे, असे सांगणारे अनेक लोक आजही नागपुरात भेटतात,' असे सांगताना ते पुन्हा आठवणींत हरवले.

आईबद्दल बोलताना त्यांच्या स्वरात आदर आणि कौतुक ओसंडून वाहत होतं. 'लहानपणी वडील जवळ नसायचे, तेव्हा तिनेच दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळल्या. तिचा माझ्यावर खूप विश्वास आहे. मुलगा जे काही करेल, ते चांगलंच करेल, असं तिला ठामपणे वाटतं. त्याचा गैरफायदा कधीच घेतला नाही. आईचं वैशिष्ट्य म्हणजे ती चालतीबोलती टेलिफोन डिरेक्टरी आहे. तिला अक्षरश: शेकडो टेलिफोन नंबर पाठ होते. तसंच तिची राजकीय समज आणि तिने बांधलेले आराखडेही खूप बरोबर असतात. त्यामुळे आजही तिच्याशी बोलणं माझ्यासाठी 'विचार कसा करावा,' याचा वस्तुपाठ असतो,' असे सांगत त्यांनी आपल्या यशातील आईचा वाटा किती मोलाचा आहे, हे अधोरेखित केलं.

वक्तृत्वकलेबद्दल त्यांनी भाषण विसरल्याचा एक किस्सा सांगितला. 'भाषण विसरल्याच्या प्रसंगानंतर दोन महिने मी अक्षरश: स्वत:ला कोंडून घेतलं. मला बोलता येत नाही, म्हणजे काय!' बोलण्याची कला अवगत असलेल्या एक-दोन शिक्षकांना भेटून त्यांच्याशी बोललो. त्यापैकी एकांनी एक सल्ला दिला होता. ते म्हणाले होते की, 'आपल्यासमोर बसलेले सगळे मूर्ख आहेत, असं समजून बिनधास्त बोलायचं.' आता हा सल्ला अमलात आणत नाही. पण त्या वेळी हा सल्ला खूपच उपयोगी पडला आणि दोन महिन्यांच्या तयारीनंतर एका मोठ्या स्पर्धेत भाग घेऊन उत्कृष्ट वक्त्याचं बक्षीस मिळवल्याची आठवणही त्यांनी सांगितली. वक्तृत्व कलेबद्दल बोलताना माझे फोटो काढलेही. त्यानंतर एके दिवशी त्याने मला सांगितलं की, ते फोटोज एका शोरूमच्या जाहिरातींसाठी काढले होते. ते मला खरंच वाटत नव्हतं. ती जाहिरात नागपुरात सर्वत्र लागणार, त्याच दिवशी मी गाडी काढून नागपुराबाहेर पसार झालो. अनेक दिवस हिंडत होतो. तीन दिवस मोबाइल बंदच करून ठेवला. मग ज्या वेळी चालू केला, त्या वेळी दुसऱ्या एका मित्राचा फोन आला. तो खूप कौतुक करत होता त्या जाहिरातीचं! ते ऐकून जरा हायसं वाटलं आणि नागपुरात परत गेलो.

आपल्या वेगाच्या वेडाबद्दलही त्यांनी जितेंद्र यांच्या प्रश्नाला भरभरून उत्तर दिलं. 'वेगाने गाडी चालवणे, ही गोष्ट मला नेहमीच खूप आवडत होती. अजूनही आवडते. ८-१० वर्ष मी नागपूरहून मुंबईला माझ्या उघड्या टपाच्या जीपनेच यायचो. संध्याकाळच्या सुमारास नागपूर सोडलं की, सकाळी नाश्त्याला मुंबईत हजर! पण त्या वेळी माझ्या या शौकाचा फटका माझ्या जवळच्या मित्रांना अनेकदा बसला होता. रात्रीच्या वेळी ४०-५० किलोमीटरची रपेट तर अगदीच ठरलेली. मग मी कोणाला तरी माझ्याबरोबर घेऊन जायचो. एकदा आम्हा दोन-तीन मित्रांचं कटकला जायचं ठरलं. मग आणखी एका मित्राला बरोबर घ्यायची टूम निघाली. कटकला जायचंय म्हटल्यावर तो नाही म्हणेल, म्हणून त्याला काही सांगायचंच नाही असं ठरलं. रात्री रपेट मारायची नेहमीची सवय म्हणून तोदेखील अगदी हसत-खेळत गाडीत येऊन बसला. शंभरएक किलोमीटर झाल्यानंतर त्याला जराशी

**'महाविद्यालयीन दिवसांनीही मला आयुष्यातील खूप मोठा धडा दिला. माझी संभाषणकला तिथेच विकसित झाली. पण त्याचीही एक गंमत आहे. मी फर्स्ट इयरपर्यंत एकाही स्पर्धेत भाग घेतला नव्हता. एका स्पर्धेच्या वेळी माझा मित्र मुकुल कानेटकर याची नेहमीची पार्टनर नव्हती तेव्हा त्याने मला विचारलं. मीदेखील होकार दिला. 'भाषावार प्रांतरचना' वगैरे असा काहीतरी विषय होता. पाच दिवस चांगली भाषणाची तयारी वगैरे केली. स्पर्धेच्या दिवशी तिथे दोनच संघ आले होते. पहिले मुकुल बोलला. नंतर दुसऱ्या संघातील एक मुलगा बोलला. मग माझी वेळ आली. मी पाठ केलेलं भाषण दणक्यात सुरू केलं. पहिल्या दोन मिनिटांतच अपेक्षित ठिकाणी लोकांनी टाळ्या वाजवल्या. त्या टाळ्या कानात गेल्या आणि मी पुढलं भाषण विसरलो. चांगली ४०-४५ सेकंद तसाच स्तब्ध उभा होतो. प्रेक्षकांतील काहींनी आपली हुर्यो उडवायला सुरुवात केली. मग जे सुचेल, ते बोलत सुटलो. अर्थात आम्हाला दोन संघात दुसरं बक्षीस मिळालं, केवळ माझ्यामुळेच!**



प्रमोद महाजन यांच्या एका सभेची आठवणही फडणवीस यांनी सांगितली. 'त्या वेळी महाजन नावारूपाला येत होते. नागपुरात त्यांनी अटलजींबरोबरच्या सभेत भाषण केलं होतं. पण मला आठवतेय ती त्यांची नागपुरातील पहिली स्वतंत्र सभा! मी १३-१४ वर्षांचा होतो. ते आमच्याकडेच उतरले होते. भाषणाला निघाले तेव्हा मला म्हणाले की, टेपरेकॉर्डर असेल, तर भाषण रेकॉर्ड कर! मीसुद्धा टेपरेकॉर्डर घेऊन त्यांच्या मागोमाग गेलो आणि त्या भोंग्याच्या बरोबर खाली बसलो. आपल्या सभेला गर्दी होईल की नाही, याचं त्यांना दडपण होतं. त्या सभेत त्यांनी खूपच उत्तम भाषण केलं आणि सभा खिशात टाकली. त्या पहिल्या स्वतंत्र सभेचं ध्वनिमुद्रण असलेली कॅसेट त्यानंतर अनेक वर्ष मी ऐकत होतो,' असे ते म्हणाले. राजकारणी झाला नसतात, तर.. या जितेंद्र जोशी यांच्या प्रश्नाला मुख्यमंत्र्यांनी क्षणाचाही विलंब न लावता 'वकील' असं उत्तर दिलं. पण त्याच वेळी तुम्ही मॉडेलिंगही केलं होतं, हे आपल्याला माहिती आहे, असं जितेंद्रने विचारल्यावर तो किस्सादेखील त्यांनी अगदी तपशीलवार सांगितला. 'विवेक रानडे नावाचा माझा मित्र नागपुरात फोटोग्राफी करतो. एका निवडणुकीनंतर त्याने मला तुझे फोटो काढायचे आहेत, असं सांगितलं. मीदेखील फार आढेवेढे न घेता त्याच्याबरोबर गेलो. मला चार-पाच वेगवेगळे कपडे घालायला देऊन त्याने कुणकुण लागली. त्याने विचारल्यावरही आम्ही 'रायपूर' असं उत्तर देऊन त्याला गप्पं केलं. पुढे रायपूरला पोहोचल्यानंतर त्याला आम्ही कटकबद्दल सांगितलं. असा त्रास माझ्या मित्रांना अनेकदा सहन करावा लागला आहे,' असे सांगताच प्रेक्षकांमध्येही जोरदार हशा फुटला. मुलाखतीच्या शेवटच्या टप्प्यात राजकारणाबाबत काही प्रश्न विचारताना जितेंद्र यांनी मुख्यमंत्र्यांच्या शांतपणाबद्दल भाष्य केलं. त्याबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, 'राजकारणात शांत राहणं हा मोठा सद्गुण मानला जातो. काय बोलावं, यापेक्षाही 'कुठे काय बोलू नये', हे आमच्या क्षेत्रात महत्त्वाचं असतं,' असा मंत्रही त्यांनी दिला. त्याचप्रमाणे राजकारणात आक्रस्ताळेपणापेक्षाही आक्रमकतेला महत्त्व आहे. या दोन्ही गोष्टी भिन्न असून त्याचं भान बाळगलंच पाहिजे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. मुलाखतीच्या शेवटी जितेंद्र जोशी यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचा आणखी एक पैलू लोकांसमोर मांडला. त्यांना दोन हजारांपेक्षा जास्त गाणी पाठ आहेत, असं सांगताच टाळ्यांचा कडकडाट झाला. याच दोन हजारांमधील 'जीना इसी का नाम हैं..' हे गाणं म्हणत मुख्यमंत्र्यांनी मुलाखतीची सांगता केली.

साभार: लोकसत्ता (२४ जानेवारी २०१६)

# लोकराज्यला उदंड प्रतिसाद

**महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात लोकराज्यचा अमीट ठसा उमटला आहे. राज्याच्या कान्याकोपऱ्यात होणारे साहित्य संमेलन, शैक्षणिक मेळावे, सामाजिक उत्सव, यात्रा महोत्सव या सर्वच ठिकाणी लोकराज्यचे स्टॉल उभारण्यात येतात. महाराष्ट्राच्या स्थापनेपासून आणि त्याहीपूर्वीपासून लोकराज्य हा ज्ञानाचा खजिना महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचला आहे. गेल्या महिनाभरात पिंपरी-चिंचवडचे साहित्य संमेलन, नांदेड माळेगाव यात्रा, मुंबई मंत्रालय, सरस महालक्ष्मी प्रदर्शनी मुंबई, रायगड महोत्सव, दिल्ली हाट येथे लोकराज्य स्टॉल लावण्यात आले होते. त्याला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला.**

## साहित्य संमेलन

पिंपरी चिंचवड येथील ८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील पुस्तक प्रदर्शन दालनात महाराष्ट्र शासनाच्या लोकराज्य या मासिकासही प्रचंड प्रमाणात वाचकांनी पसंतीची पोच दिल्याचे या संमेलनातून स्पष्ट जाणवले. लोकराज्यचा अंक हा शासन आणि सामान्य माणूस यांच्यातील दुवा आहे. याची प्रचिती या संमेलनादरम्यान विविध स्तरावरील वाचकांनी लोकराज्यच्या दालनास भेट दिल्यावरून, त्यांनी नोंदविलेल्या अभिप्रायावरून आली. अगदी उच्चशिक्षित तरुणांपासून साहित्यिक, लेखक, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांपासून, ग्रामीण भागातून आलेल्या सुशिक्षित शेतकरी आणि शासकीय, इतर नोकरदारांनीही या स्टॉलला भेट दिली.

लोकराज्यच्या दालनास भेट देणाऱ्या वाचक, रसिकांच्या प्रश्नांची येथोचित उत्तरे कर्मचारी श्रीमती सुरेखा जाधव, सुहास सत्वधर देत होते. चार दिवस चाललेल्या साहित्य संमेलनात शंभर रुपये भरून ३६२ वाचक वर्गणीदार झाले, तर मोठ्या प्रमाणावर अंकांची विक्री झाली. महाराष्ट्र अहेड आणि उर्दू लोकराज्य अंकाचीही विचारणा होत होती. या संमेलनात मराठी भाषिकांची संख्या मोठी असल्याने मराठी अंकांनाच मागणी अधिक होती.

विशेष म्हणजे लोकराज्यच्या दालनात लहान मुलांचीही लक्षणीय गर्दी होती आणि ते आवडीने अंक चाळत होते. पाठीवर दप्तर सांभाळत विद्यार्थी लोकराज्यचा अंक चाळून खाऊच्या पैशातून अंकही विकत घेत होते. शासनाची वचनपूर्तीची पुस्तिका पाहणे हे वाचकांना आकर्षित करणारे होते. त्यातून शासनाच्या लोककल्याणाची तळमळ लोकांपर्यंत पोहोचत होती.

काही लेखक/वाचक आमच्या कविता/लेख लोकराज्यात छापणार काय अशीही विचारणा करीत होते. विशेष म्हणजे अनेक वाचनालयाच्या किमान २० वाचनालयांनीही पुन्हा लोकराज्यच्या वर्गणीसाठी नोंदणी केली. संमेलनादरम्यान अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. त्यात प्रामुख्याने संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, त्यांच्या सौभाग्यवती श्रीमती भाग्यश्री पाटील, त्यांच्या कन्या, चिरंजीव, अंदमान येथे झालेल्या विश्व साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. प्रा. शेषराव मोरे, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक वीरा राठोड, गुजराथी लेखक-विचारवंत कानजी पटेल, ज्येष्ठ संपादक-लेखक-पत्रकार महावीर जोंधळे, ज्येष्ठ विचारवंत, प्रकाशक प्रा. विलास वाघ, स्वयंसिद्ध फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. बेबीताई गायकवाड, कवी गणेश मरकड, पत्रकार जितेंद्र अष्टेकर, अशा कितीतरी जणांची नावे नोंदविता येतील. याबरोबरच लोकराज्यचे प्रबंध संपादक व संचालक (माहिती)(प्रशासन) देवेंद्र भुजबळ यांनी संमेलनादरम्यान या दालनास भेट देऊन वाचकांशी संवाद साधला.



**पिंपरी-चिंचवड साहित्य संमेलन**




**नांदेड माळेगाव यात्रा**

## श्री क्षेत्र माळेगाव

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील श्री क्षेत्र माळेगाव येथील श्री खंडेरायाची यात्रा दक्षिण भारतातील ग्रामीण यात्रांपैकी सर्वात मोठी यात्रा

मानली जाते. सर्वात मोठी याचसाठी की, या यात्रेत दक्षिण आणि उत्तर भारतातील शेतकरी आणि शेतीशी निगडित गरजेच्या अशा अनेक गोष्टींची खरेदी-विक्री होते. पशुधनासह, शेती अवजारांच्या विक्रीतून मोठी उलाढाल होते. या यात्रेसाठी महाराष्ट्रासह, कर्नाटक, आंध्रप्रदेशातील भाविक येतात. त्यांच्यासाठी यात्रा ही मोठी संधी ठरते. त्यामुळेच यात्रेत अनेकविध गोष्टींचा समावेश असतो. यंदा ही यात्रा ८ ते १२ जानेवारी या कालावधीत भरवण्यात आली. यात्रेचे स्वरूप आणि महत्त्व ओळखून नांदेड जिल्हा परिषद यात्रेच्या नियोजनात-व्यवस्थापनात पुढाकार घेते. लाखो शेतकरी भाविक म्हणून यात्रेत येतात. त्यांच्यापर्यंत बदलत्या कृषी तंत्रज्ञानाचा आणि आरोग्यापासून-शिक्षण, महिला, ग्रामविकास यातील महत्त्वाच्या घटकांची माहिती पोहोचवण्याचा, त्यामध्ये सक्रिय सहभागी वाढवण्यासाठी आवाहन करण्याची संधी साधली जाते. कृषिप्रदर्शन हा त्याचाच एक भाग असतो. यात्रेला साजेसे भव्य कृषिप्रदर्शन आणि पशुप्रदर्शन भरवले जाते. कृषी प्रदर्शनात विविध प्रकारची दालने असतात.

या प्रदर्शनात नांदेड जिल्हा माहिती कार्यालयानेही लोकराज्य प्रदर्शन-विक्रीच्या निमित्तानेही एक दालन थाटले. या प्रदर्शनात भाजीपाला, फळे, खते, अवजारे आदी विषयी माहिती देणारे ६६ दालने होती. त्यामध्ये लोकराज्यचे दालन लक्षवेधी ठरले. या ठिकाणी लोकराज्य मासिकाचे



रायगड महोत्सव

विविध विशेषांक ठेवण्यात आले. त्यामध्ये दुर्मीळ व वाचनीय अंकांचेही प्रदर्शन करण्यात आले. तसेच वार्षिक वर्गणीदार नोंदणीची व विक्रीची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आली. बदलत्या कृषी-तंत्रज्ञानाची माहिती घेण्यासाठी येणाऱ्या होतकरू-तरुण शेतकऱ्यांनी सजगपणे लोकराज्य दालनाला आवर्जून भेट दिली. लोकराज्यचे अंक पाहण्यासोबतच काहींनी वार्षिक वर्गणीचीही चौकशी केली आणि नोंदणीही केली. आकर्षक रंगसंगती, आशयपूर्ण अशा लोकराज्य अंकाबाबत अनेकांनी कौतुकास्पद प्रतिक्रियाही व्यक्त केल्या.

या दालनाचे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई गुंडले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दिलीप धोंडगे तसेच विविध विषय समित्यांचे सभापती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी अभिमन्यू काळे उपस्थित होते. जिल्हाधिकारी सुरेश काकाणी, पोलीस अधीक्षक परमजितसिंह दहिया यांच्यासह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनीही लोकराज्य स्टॉलला सदिच्छा भेट दिली. यात्राकाळात लोकप्रतिनिधी, विविध माध्यम प्रतिनिधी तसेच अनेक मान्यवरांनी लोकराज्य दालनाला आवर्जून भेट दिली. जिल्हा माहिती अधिकारी दिलीप गवळी, माहिती अधिकारी निशिकांत तोडकर, छायाचित्रकार विजय होकर्णे यांनी या दालनासाठी सुनियोजन केले, तर एस. जी. शेळके, एस. सी. सुर्यवंशी, अशोक बोर्डे, चंद्रकांत आराध्ये यांनी व्यवस्था पाहिली. यात्रेत येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी कृषिप्रदर्शन जसे आकर्षण ठरले, तसेच या प्रदर्शनातील लोकराज्यचे दालनही त्यांच्यासाठी आकर्षण ठरले.

## मंत्रालय

राजभाषा मराठी पंधरवडानिमित्त मंत्रालयात दि. ११ ते १३ जानेवारी २०१६ रोजी ग्रंथ प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन मराठी भाषा विभागाचे मंत्री श्री. विनोद तावडे यांनी केले. या प्रदर्शनामध्ये लोकराज्य, महाराष्ट्र अहेड आणि उर्दू लोकराज्यचाही स्टॉल लावण्यात आला. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यावेळी १००हून अधिक वर्गणीदार झाले.




दिल्ली हाट, नवी दिल्ली

## सरस महालक्ष्मी

ग्रामविकास विभागामार्फत सरस महालक्ष्मी प्रदर्शनीचे आयोजन मुंबई येथे १६ ते २८ जानेवारी २०१६ रोजी आयोजित करण्यात आले. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी या विशेष प्रयत्न करण्यात येतात. या प्रदर्शनाचे उद्घाटन राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत केले. या प्रदर्शनामध्येही लोकराज्य, महाराष्ट्र अहेड आणि उर्दू लोकराज्यचा स्टॉल उभारण्यात आला. त्यास हजारो लोकांनी भेट दिली. या प्रदर्शनात १०० हून अधिक वर्गणीदार झाले.

**यशवंत भंडारे, उपसंचालक, पुणे**
**निशीकांत तोडकर, माहिती अधिकारी, नांदेड आणि टीम लोकराज्य**




**शासनाने घेतलेले निर्णय व योजनांची माहिती तातडीने देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ट्विटर माध्यमाचा अत्यंत प्रभावीपणे वापर करतात. यामुळे नागरिकांना शासनामध्ये चाललेल्या विविध घडामोडींची तत्काळ माहिती मिळते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

श्री ज्ञानेश्वरी सप्तशतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त (७२५ वर्षे) आळंदी येथे जाण्याचा आज योग आला.

दुरितांचे तिमिर जावो...जो जें वांछील तो ते लाहो...महाराष्ट्राच्या, भारताच्या, अखिल विश्वाच्या कल्याणाची कामना यावेळी माऊलींच्या चरणी केली...

'स्वच्छ महाराष्ट्र' अभियानाच्या ट्विटर व फेसबूकवरील पानाचे उद्‌घाटन करताना...

Launched SwachhMaha on social media platforms of twitter facebook for more communication people's participation

पत्रकार दिनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करताना...

Salutations to the pioneer of journalism in Maharashtra, 'Darpan'kar -Acharya Balshastri Jambhekar on PatrakarDin'!

आयसीआयसीआयसीएमधील प्रशिक्षणार्थींसोबत संवाद साधल्यानंतर...

It was a pleasure to interact with the young trainees with bright minds at ICICI-cademyForSkills

'फसल बीमा योजने'च्या लोकार्पणानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानताना...

Grateful to Hon narendramodi ji for the most awaited gift of new crop insurance for farmers. PradhanMantriFasalBimaYojana

८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला पिंपरी येथे उपस्थित आहे.

ट्विटरसंमेलन - साहित्याने अनेक भिंती ओलांडल्या, ग्रंथातून पुस्तकात-पुस्तकातून वेबवर! तेथून ट्वीटरसारख्या शब्दमर्यादेच्या व्यासपीठापर्यंतचा हा प्रवास अनोखाच!

मुंबई मॅरेथॉनला हिरवा कंदील दाखवताना...

Flagged off the Dream Run of 13th edition of SCMM² with 50K+ people from across the globe. What a spirit! StanChart

कोकणातील तेलशुद्धीकरण प्रकल्पाबाबत...

More than 1 lakh crore investment will generate an employment of 1,00,000;will give boost to down stream industries

संयुक्तराष्ट्र सुरक्षा परिषदेच्या कायमच्या सदस्यत्वासाठी देश कसा पात्र आहे हे सांगणाऱ्या आपल्या भाषणाची लिंक शेअर करताना...

My speech on why and how India is the most deserving nation to be a permanent member of the UN Security Council. https://www.youtube.com/watch?v=qKI4PuuMLR0

टाटा ट्रस्टसोबत कौशल्य विकासाबाबत करार केल्यानंतर...

Witnessed the MoU signing between Skill Devpt Entrepreneurship Dept tatatrusts to skill100000youth in Maharashtra

**जय हिंद!**

**प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !**

**Happy RepublicDay to all !**

**Jai Hind !**




रायगड महोत्सवादरम्यान शिवरायांनी दिलेल्या सुशासनाच्या शिकवणीविषयीचे भाषण शेअर करताना...

Chhatrapati Shivaji Maharaj taught us good governance what govt for the people is.. Sharing Raigad Mahotsav speech- https://youtu.be/niKMWU4MQ-8

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित

# शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...

सर्वत्र : सर्वोत्तम

**लोकराज्य**

४ लाख खप ४० लाख वाचक

ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in

रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा

لوک راجیہ
उर्दु लोकराज्य

ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२५००
राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार,
सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम

लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
जय महाराष्ट्र
नाबाद...८२७ भाग
दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.१५ ते ८ या वेळेत
प्रसारित होणारा कार्यक्रम



बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@१ कोटी ७३ लाख
www.mahanews.gov.in

MAHARASHTRA
Ahead
English Magazine

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
http://dgipr.maharashtra.gov.in

## माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th February 2016
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य




सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक